# पाचवा शिक्का

आपण आपली मस्तके प्रार्थनेसाठी आता झुकवूया.

2 कृपावंत स्वर्गीय पित्या, सर्वसमर्थ देवा, ज्याने येशू ख्रिस्ताला मेलेल्यांतून पुन्हा आणले, आणि या अंतिम दिवसांत त्याला आमच्यासमोर सादर केले आहे, पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यात, आम्ही फार आभारी आहोत अविनाशी देवाच्या या महान भेटीबद्द्ल. आणि आता, पित्या, आम्ही दुसऱ्या एका घडीला तोंड देत आहोत, अशी घडी जी पुष्कळ लोकांचे सार्वकालिक मुक्कामाचे ठिकाण बदलून टाकील.

3 आणि प्रभू, त्याला हाताळण्यास, आम्ही अपुरे आहोत. कारण हे शास्त्रलेखात आहे की, "कोकऱ्याने पुस्तक घेतले आणि त्याचे शिक्के उघडले."

4 हे देवाच्या कोकऱ्यापुढे ये, अशी प्रार्थना करतो. प्रभू, महान मुक्तीदात्या, आम्ही तुला बोलावितो. तू ये आणि मुक्तीची योजना आम्हाला दाखव जी अनेक वर्षांपासून लपलेली होती, आज रात्री पाचवा शिक्का आमच्यासाठी उघड, पित्या, आणि तू शिक्क्याखाली काय आहे ते तू आम्हासाठी प्रगट कर; म्हणजे आम्ही आज जसे ख्रिस्ती आहोत त्यापेक्षा अधिक चांगले ख्रिस्ती बनण्यास जाऊ यासाठी की जे अवघड काम आमच्यापुढे आहे त्यासाठी लायक ठरु. आम्ही हे येशूच्या नावाने मागतो. आमेन.

आपण बसू शकता.

5 शुभ संध्याकाळ, मित्रांनो, मी असे मानतो की ही एक भव्य संधी आहे की या रात्री, या ठिकाणी या कार्यक्रमात असणे. मला नाही वाटत अजून कुठे मला चांगले वाटेल, शिवाय राजाच्या कामात असण्यापेक्षा. आणि आता आपण विशेषत: या धड्याकडे ज्याची आपण वाट पाहत आहा; जर तो ते मला प्रगट करित नाही तर मी ते देऊ शकत नाही. मी माझे विचार किंवा काहीही वापरण्याचा प्रयत्न करित नाही, जसे तो देईल तसेच. हे खरे आहे. आणि मला—मला खात्री आहे, जर मी माझे स्वतःचे विचार वापरले नाहीत, आणि ते तसेच येतात जसे आहेत. आणि माझ्या संपूर्ण जीवनभर ते कधी चुकीचे ठरले नाही. आणि यावेळी सुध्दा ते चुकीचे ठरणार नाही.

6 आता, आम्ही त्याच्यासाठी अत्यंत आनंदीत आहोत, आणि फार फार आभारी आहोत जे त्याने जीवंत देवाच्या महान रहस्यमय हाताने हे आम्हासाठी केले आहे! काय यापेक्षा अधिक महान गोष्ट काय होऊ शकते, किती तरी अधिक भाग्यवान लोक आम्ही असू शकतो, की आम्ही राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू याच्या उपस्थितीमध्ये आहोत?

7 देशाच्या राष्ट्रपतीचे शहरात आगमन होण्याच्या हेतूने आम्ही कदाचित शिट्या वाजवू आणि—आणि झेंडे फडकवू, गालिचे पसरु आणि असे सर्व काही करु. परंतु जरा विचार करा, ते सर्व काही करणे योग्य ठरेल आणि त्या शहराकरिता हा सन्मान ठरेल.

8 परंतु विचार करा. आमच्या या छोट्या आराधनालयात, आज रात्री, आम्ही निमंत्रित करतो राजांच्या राजाला, जो देव आहे. आणि आम्ही करीत नाही...त्याची अपेक्षा नाहीए की आम्ही त्याच्यासाठी गालिचे पसरावे, आणि अशाप्रकारे. त्याची इच्छा आहे की नम्र हृदये त्याच्यापुढे उपडी पडावी, म्हणजे तो ती नम्र हृदये घेईल व चांगल्या गोष्टी त्यांना प्रगट करिल, जे त्याच्यावर प्रेम करतात त्यांच्यासाठी त्याच्याकडे भांडार आहे.

9 आता, आम्ही विचारतो...आणि माझ्याकडे एक साक्ष आहे जी मला देण्यास आवडेल. आता, जर मी त्याबाबत चुकलो असेन; मी असे ऐकले, आणि मी चुकीचा असूही शकतो. परंतु मला असे वाटते की लोक येथे आहेत आणि साक्ष त्यांना लागू होवो.

10 आणि, मग, काही दिवसांअगोदर, जेव्हा मी माझ्या घरापासून बाहेर ॲरिझोना येथे होतो, तेथे एक—एक टेलिफोन आम्हास आला आणि असे सांगितले गेले की एक लहान मुलगा संधीवाताच्या तापाने आजारी झाला आहे. आणि ते त्याच्या हृदयापर्यंत पोहचले होते. आणि तो तसा होता...त्याचे आई–वडिल माझे प्रेमळ व अमूल्य मित्र आहेत. त्याचे वडिल आमच्या मंडळीतील, डिकनांमधील एक आहेत आणि त्याचे नाव भाऊ कोलिन्स आहे. त्याचा लहान मुलगा, छोटा मिक्की, जे बरोबर खेळत असतो, त्याला हृदयाचा संधीवात ताप भरला होता. आणि डॉक्टरांनी त्याला घरी पाठवले होते, आणि अंथरुणावर खिळून ठेवले होते, आणि डॉक्टरांनी त्याच्या आईवडीलांस असे सांगितले होते की त्याला पलंगावरुन उठू देऊ नये, आणि डोकेसुध्दा वर करु देऊ नये, त्याला फक्त पाणी देत राहावे. ते नळीतून घेत होता, त्याची परिस्थिती फार फाईट होती. आणि त्याचे आई–वडिल, जे विश्वासयुक्त असून, येथे आराधनालयात येतात आणि विश्वास करणारे आहेत.

11 काही रात्री अगोदर, थांबू इच्छित नव्हतो, आम्ही रविवारच्या आरोग्यसभेसाठी घोषणा केली. परंतु प्रश्न उत्तराचा समय आहे असे ओळखून, आम्हाला आरोग्य सभा वगळावी लागली होती.

12 आणि तेव्हा एक लहानशी गोष्ट जी माझ्या हृदयात मी राखून ठेवली होती.

13 आणि आई आणि वडिल हे जाणू इच्छित होते की ते मुलाला त्यांच्या खोलीत आणू शकतील का. आणि ते त्या छोट्या मुलाला त्या खोलीत घेऊन आले, आणि पवित्र आत्म्याने त्याला बरे झालेला घोषित केले.

14 आणि म्हणून, आई वडिल, त्याबद्दल सुनिश्चित होते, ते त्या छोट्या मुलाला घेऊन घरी गेले आणि त्यांनी त्याला शाळेत पाठविले, त्यांनी त्याला शाळेत पाठविले,

15 डॉक्टरला जेव्हा ही गोष्ट कळली, तेव्हा याविषयी डॉक्टर फार असा खूश नव्हता. म्हणून त्याने त्याच्या आईला सांगितले होते की त्या मुलाला निश्चितरित्या पलंगावर ठेवायला हवे. आणि त्या मुलाच्या आईने त्याला संपूर्ण हकीकत सांगितली. आणि मला वाटते की, तो डॉक्टर कोणत्यातरी सांप्रदायिक मंडळीचा, ख्रिस्ती विश्वासी होता. तो डॉक्टर, एक—एक सेवन्थ डे ॲडवान्टिस्ट आहे. आणि म्हणून त्याने म्हटले, "अच्छा तुम्ही असे करायला हवे...मी त्या मुलाला तपासावे अशी वेळ आहे," म्हणाला. "तुम्ही किमान, त्याची तपासणी तरी करायला हवी होती."

ती म्हणाली, "ठिक आहे चालेल."

16 ते त्या छोट्या मुलाला घेऊन गेले, आणि डॉक्टरने तपास केला, जेथे तो संधीवाताच्या तापाने पिडीत होता. आणि मला कळले की डॉक्टर फार अचंबित झाला होता व त्याला काही कळेना काय करावे म्हणून. तो छोटा मुलगा पूर्णतः सामान्य झाला, पूर्णपणे बरा, काही...?...सापडले नाही.

17 आता, येथे कॉलिन्स परिवार आहेत? असे असू शकते की मी ते योग्य रितीने सांगू शकलो नसेन. बहिण कॉलिन्स, हे बरोबर आहे ना? होय. बरोबर आहे. तो छोटा मिक्की कॉलिन्स जोस हा, सहा, सात वर्षाचा आहे.

18 आणि हे तीन रात्री अगोदर, त्या खोलीत घडले होते. ओह...त्या खोलीत मनुष्य व्यतिरिक्त कोणी असले पाहीजे! महान आणि सामर्थ्यवान यहोवा, होय हे खरे आहे, जो आपल्या वचनाचा सन्मान करण्यास येतो. आणि मी—मी फार आभारी आहे हे ऐकून. समजले? मी जाणतो की आम्ही सगळेच त्याविषयी आभारी आहोत. केवळ मीच नव्हे, तर आपण सर्वजण, त्याविषयी आभारी आहांत, कारण जर तो तुमचा किंवा माझा छोटा मुलगा असला असता?

19 आणि, लक्षात ठेवा, मी तर केवळ त्याविषयी जे ऐकले आहे, इतरांकडून त्याविषयी साक्ष देत आहे. परंतु असे सर्व ठिकाणी घडत आहे, परंतु मी हे यासाठी सांगितले की—की माझी खरी जी सेवकाई आहे ती दैवी आरोग्याची आहे. मी येथे शिक्क्यांसाठी आहे. कारण तुम्ही थोड्याच वेळात समजून जाल की का बरे, मला असे करावे लागते. आणि म्हणून मी काही शिक्षक नाहीए, मी काही दैवीशास्त्र अभ्यासक नाही मी—मी फक्त आजाऱ्यांसाठी प्रार्थना करतो, आणि मी प्रभूवर प्रेम करतो. आणि आता, ह्यांमध्ये, जरी...

20 कालच्या रात्री आम्ही एक साक्ष लहान मुलीबद्दल दिली होती...मला तिचे नाव कळले. आणि बिली येथेच कुठे, तिच्या आई-वडिलांस भेटला होता आणि, ते कोण आहेत असे. आणि ही लहान मुलगी रक्ताच्या कर्करोगामुळे शेवटच्या अवस्थेत होती... त्या मुलीची स्थिती एवढी वाईट होती की ते तिला तोंडाने काहीही भरवू शकत नव्हते; तिच्या नसांद्वारे तिला रक्त चढविले गेले होते. आणि ती खूप चांगली, छोटी मुलगी होती. ती मुलगी वयाने तर लहान होती, मला वाटते की या छोट्या तरुणीसारखी होती जशी येथे एक आहे. परंतु तिची उंची *एवढी* होती...ते आमच्यांतील अनेकांसारखे होते. त्या मुलीच्या वेशभुषेवरुन सांगू शकू की...तिचे आईवडील हे खूप गरिब होते, अत्यंत गरीब होते आणि ते त्याप्रकारे होते; परंतु फार आदरभावाचे होते. आणि पवित्र आत्म्याने घोषित केले की ती मुलगी बरी झाली आहे.

21 आता, तुम्ही जरा या छोट्या मुलीविषयी विचार करा, जिला रक्ताचा कर्करोग झाला होता. आणि तिच्या रक्ताची स्थिती एवढी खराब होती की ते तिला तोंडाने काहीही अन्न भरवू शकत नव्हते. तिला इस्पितळात नेऊन रक्त चढवण्याची गरज होती, किंवा तिला भरवावे या कारणाने तिला नसांच्याद्वारे रक्त चढवायचे होते, मला वाटते ग्लूकोस किंवा अजून काही असेल. मला माहीत नाही की वैद्यकीय भाषेत त्या आजाराला काय म्हणतात, परंतु, ते जे काही असेल, तीला त्या प्रकारेच भरवले जात होते. आणि तीने ते ठिकाण सोडण्यापूर्वी, ती एका हॅमबर्गरसाठी रडली होती.

22 आणि आई-वडिल, पवित्र आत्म्याकडून त्यांनी ते ऐकल्यानंतर, की **प्रभू परमेश्वर असे म्हणतो**, असे, पाहा...आणि ते त्यांना अपरिचित होते, ते तेथे अगोदर कधीच आले नव्हते. परंतु...एका—एका वृध्द जोडप्यांनी त्यांच्यासाठी खुर्चीवर जागा ठेवली होते, ते भाऊ आणि बहिण किड, त्यांना काही वेळेपूर्वी त्यांना सुचित केले होते की काय करावे, आणि काय ऐकावे. आणि ती मुलगी आपल्या घरी जाताना रस्त्यामध्ये भोजन खाऊ लागली.

23 त्यानंतर दोन किंवा तीन दिवसांनंतर, ती शोळेत गेली. आणि जेव्हा तिला डॉक्टरकडे नेले, आणि डॉक्टर फार आश्चर्य चकित झाला. तो म्हणाला, "मुलीमध्ये रक्ताच्या कर्करोगाचा अंशही सापडत नाहीए." पाहा? आता, हे सर्व क्षणार्धात घडणारे आहे, जे सर्वसमर्थ परमेश्वराचे सामर्थ्य दर्शविते, जे रक्तप्रवाहाचे शुध्दीकरण करते, खरेपणामध्ये, आणि—आणि नविन जीवनाचे कंपन परत घालते. कारण, तुमचा—तुमचा रक्तप्रवाह हे तुमचे मर्त्य जीवन आहे. आणि नवीन पेशीची उत्पत्ती करणे, आणि जुन्यापेशी साफ करणे!

आणि—आणि काय आहे; ते पूर्णतः...मी असे म्हणेन की ती सर्व शक्तीमान परमेश्वराची सृष्टी करण्याचे कार्य आहे. तो एक—एक रक्तप्रवाह जो कर्करोगाने दूषित झाला होता, इतपर्यंत की एक ती लहान मुलगी जी पिवळी, आणि सुजलेली, आणि मात्र थोड्याच क्षणात, एक नवीन रक्तप्रवाह सुरु झाला!

24 मी विश्वास करतो...मी त्या परमेश्वराच्या नावाने हे म्हणण्यास जात नाहीए; मी तर माझ्या...विश्वासाच्या प्रकटीकरणाने म्हणत आहे, की त्या दिवशी सबीनो कनानमध्ये काय घडले होते. मी विश्वास करतो की वेळ येत आहे की शरीराचे अंग जे नाश पावले आहेत, त्याची पुर्नस्थापना करण्यात येईल, उत्पन्न करण्याचे गौरवी सामर्थ्य दिसेल. मी—मी विश्वास करतो, जर तो खार निर्माण करु शकतो जी दिसू शकते, जीला नाही...येथे एक पुरुष किंवा स्त्री आहे, ज्याचे अंग नाश पावलेले आहे. आणि ती खार तर आपल्या आपण पूर्ण पशू होती. तो परमेश्वर आहे, मी—मी त्याच्यावर प्रेम करतो.

25 अच्छा, आता, पाहा, मी त्या विषयांवर बोलण्यास सुरुवात केली आहे, आणि आम्ही त्यावर बोलत राहिलो आहो. आणि लोक त्या भिंतीच्या आधारावर, आणि खोल्या आणि हॉल्सच्या आधारावर उभे आहेत, तर आता मी सरळपणे संदेशाविषयी बोलेन.

26 आणि मला असे सांगायचे आहे, आणि मला परमेश्वराचे आभार व्यक्त करण्यास वाटते जो सर्वव्यापी आहे. आणि आजपर्यंत मी या पाच शिक्क्यांविषयी मी काहीच जाणत नव्हतो, जेव्हा मी आज सकाळी प्रार्थनेत होतो, तेव्हा सुर्योदय होण्याच्या एक तास अगोदर. माझ्याकडे त्याच प्रकारच्या रहस्यमयरितीने तो आला. आणि आज...

27 मी या मागच्या पाच ते सहा दिवसांपासून, एका छोट्या खोलीमध्ये होतो, आणि मी कोणालाच पाहिले नाही. मी फक्त बाहेर जात होतो आणि आपल्या एक मित्रा समवेत–आपल्या काही मित्रांसमवेत—समवेत भोजन करीत होतो. आणि, निश्चितपणे, तुम्ही जाणता की, माझे ते मित्र कोण आहेत, ते भाऊ वुड आणि बहिण वुड आहेत. होय, आणि—आणि तुम्हाला माहीत आहे आणि मी त्याच्याजवळ गेलो आणि त्यांच्याजवळ राहिलो, आणि प्रत्येकजण माझ्याशी चांगला राहिला. आणि तेथे काही झाले नव्हते, फक्त सामान्यतः...

28 मी त्या सात शिक्क्यांच्या संदेशावरच राहण्याचा प्रयत्न करीत आहे. ते महत्त्वाचे आहे. मी विश्वास करतो की ते—ते त्याच्या प्रकटीकरणातील प्रकाशन प्राप्त होण्याचा समय आहे.

29 आणि आता पाचव्या शिक्क्याविषयी बोलण्याअगोदर मी तुमच्यावर हे सुनिश्चित करु इच्छितो की जर तुमच्याकडे या सात शिक्कयांविषयी कोणत्याही प्रकारे जर अनिश्चित समज असेल, तर तुम्ही त्याला जेवढे शक्य तेवढे लवकर लिहा आणि त्याविषयी या टेबलवर ठेवा. आणि कदाचित भाऊ नेव्हिल किंवा कोणीतरी एक पेटी येथे ठेवतील [कोणीतरी म्हणाला, "येथे ती पेटी आहे."—सम्पा.] ओह, येथे—येथे आहे. मी येथे ती पेटी पाहत आहे. चांगले झाले. आज रात्री मी आपल्या ह्या प्रश्नांना घेईन. यासाठी की रविवारी सकाळसाठी, त्यावर काही वेळ अभ्यास करु शकेन. आता पाहा, यावेळी नाही, ह्यावेळीच तुम्ही यावर विनंती करु नका. "काय *हा* पवित्र आत्म्याचा पुरावा आहे"? समजले? तुम्ही पाहा की मी—मी या विषयाबद्दल जाणू इच्छितो, ज्याबद्दल मी शिक्षण दिले आहे. शेवटी आम्ही त्याचा (मंडळी युगांप्रमाणेच) सरळपणे एकाच विषयावर अभ्यास करता येईल, कारण तेच आहे हे ज्यावर आम्ही बोलत आहोत.

30 आता, पाहा, जसे आम्ही कोणा आजारी व्यक्तीसाठी प्रार्थना करण्यास जातो, तेव्हा हे होऊ शकते की ही एक—एक वेगळ्या प्रकारची प्रार्थना होवो. आणि तुम्ही जाणता

की तुम्ही अभिषिक्त आहा आणि त्या वेगळ्या कारणासाठी आत येता. आणि तुम्ही देवाचा शोध करता हे जाणण्यासाठी, “प्रभू, काय आज रात्री कोणी येथे आहे का?”

31 “होय, उजव्या हाताच्या कोपऱ्यात, कोणीतरी तेथे आहे ज्याने पिवळे वस्त्र नेसलेले आहे. आणि तुम्ही जेव्हा तिला बोलवाल, तर तिला *ह्या* नावाने बोलवा. आणि म्हणा की तिने *असं, असं* केले आहे. आणि ती *अमुक-अमुक* आहे.” तेव्हा तुम्ही तेथे जाता आणि पाहता आणि ती तिथे असते. समजले? असेच होते. पाहा?

32 आणि मी याप्रकारे, प्रार्थना करीत आहे, “प्रभू येशू, याचा काय अर्थ आहे? मला ते प्रगट कर?” आमेन.

33 आता या, आम्ही पुन्हा आपल्या—आपल्या तलवारी म्हणजे वचनाला बाहेर काढू.

34 आणि मी भाऊ नेविल यांची आत्मिक मदत, आणि बंधुप्रिती याविषयी त्यांचे कौतुक करतो, जे माझ्यामागे येथे, प्रार्थना करीत आहेत. आणि तुम्ही जे तेथे बाहेर आहात, तुम्हीही, माझ्यासाठी प्रार्थना केलेल्या आहेत. आणि, यावेळी, आज रात्री, शुक्रवारची रात्र असल्यामुळे, आम्ही फक्त ते करण्याचा प्रयत्न करीत आहोत...आम्ही...

35 शक्यतो, तुम्ही सर्व गोष्टींविषयी नाही सांगु शकत...कारण तुम्ही या शिक्क्यांपैकी एकच मात्र शिक्का घेऊ शकता, आणि त्यावरच राहू शकता, आणि तुम्ही त्याविषयी शेवटपर्यंत वचनातून सांगत जाऊ शकता. समजले? मी फक्त एकच शिक्क्यावर महिने आणि महिने आणि महिने घेऊ शकतो, आणि तरीही ते समजणार नाही, कारण शिक्का स्वत: वचनामध्ये बांधलेला आहे, तो तर उत्पत्तीपासून घेऊन प्रकटीकरणापर्यंत वचनांशी जोडलेला आहे, त्याचा एक शिक्का.

36 म्हणून मी आपल्याला त्यापासून इकडेतिकडे होण्यापासून वाचविण्याचा प्रयत्न करित आहे, मी वचनांतून एक विषय घेतो, किंवा—किंवा शास्त्रभाग, आणि...त्यावर राहतो मी फक्त केवळ त्या एका विषयावर राहतो, मला मागील गोष्टीही पाहाव्या लागतात, कारण मी केवळ...बोलत राहून, मी ह्या तऱ्हेने बोलतो...मला—मला आशा आहे की ही योग्य प्रेरणा आहे. आणि जेव्हा मी—जेव्हा मी पाहण्यासाठी खाली पाहतो...आणि मी—मी बोलायला सुरुवात करतो आणि जर मी अनुभव करतो की मी स्वत: विषयापासून दूर जातो आहे, तेव्हा मी परत तेथे येतो, आणि अजून काही शास्त्रभाग मिळवण्याचा प्रयत्न करतो या हेतूने की पुन्हा त्याकडे वळावे, तुम्ही पाहा यासाठी की आपल्या विषयावर मी यावे, आणि मग मी त्याऐवजी मी आपल्या विषयातून बाहेर निघून जाईन, मी त्यावर कोणत्या दुसऱ्या दृष्टीकोनांतून थोडा अधिक प्रकाश टाकिन.

37 आणि आता आज रात्री आम्ही परमेश्वराच्या अनुग्रहाने, आणि त्याच्या साहाय्याने, पाचव्या शिक्क्याचा अभ्यास करु. आणि हा लहान आहे. परंतु हा दुसऱ्यापेक्षा मोठा आहे. आता, पाहा, चार घोडेस्वार, ज्याविषयी वचने दोन-दोन ओळींची होती आणि यामध्ये तीन ओळीचे वचन आहे. आता पाहा, पाचवा शिक्का, हा प्रकटीकरणाचा, सहाव्या अध्यायाच्या 9व्या वचनापासून सुरु होतो.

38 आणि, आता, पाहा, जर तुम्ही याविषयी अपरिचित असाल आणि ज्यांनी या चार घोडेस्वाराविषयी कधी ऐकले नसेल, ठीक आहे...पाहा, कधी-कधी तुम्ही—तुम्ही मागे राहता आणि—आणि एका तऱ्हेने तुम्ही एका गोष्टीवर राहता, आणि, जेव्हा तुम्ही असे करता, तेव्हा तुम्ही लोकांकडून आशा करता की ते त्यांना समजले जावे. म्हणून तेथे अशी लहानशी कोणती गोष्टी आहे जी समजत नाही, तर तुम्ही त्याविषयी थोडे सहन करा. किंवा टेप घ्या आणि ते ऐका. आणि—आणि मला खात्री आहे की आहे की तुम्ही—

तुम्ही त्याद्वारे आशिर्वादीत व्हाल. मी झालो आहे. मला—मला आशा आहे की तुम्ही—की तुम्ही तसेच कराल.

39 आता, प्रत्येक व्यक्ती तैयार व्हा, 9व्या वचनापासून 11व्या वचनांपर्यंत किंवा 11व्या वचनाचासुध्दा समावेश करुन.

*त्याने पाचवा शिक्का फोडला तेव्हा मी वेदीखाली आत्मे पाहीले, ते आत्मे देवाच्या वचनामुळे व त्यांनी जी साक्ष दिली होती तिच्यामुळे जिवे मारलेल्या लोकांचे होते.*

*ते मोठ्याने ओरडून म्हणाले, हे स्वामी, तू पवित्र व सत्य आहेस. तू कोठपर्यंत...न्यायनिवाडा करणार नाहीस आणि पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांपासून आमच्या रक्ताचा सूड घेणार नाहीस?*

*तेव्हा त्या प्रत्येकांस एक एक शुभ्र झगा देण्यात आला आणि त्यांस असे सांगण्यात आले की, तुमच्या सोबतीचे दास...व तुमचे बंधु तुम्हासारखे जीवे मारले जाणार, त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत तुम्ही आणखी थोडा वेळ विश्रांती घ्या.*

40 आता, हे काहीसे रहस्यमय आहे. आणि आता मी हे टेप करिता तसेच जे धर्मगुरु आणि शिक्षकांसाठी हे बोलत आहे जे येथे हजर असलेल्यांत बसलेले आहेत, आता जर तुमचा दुसरा काही दृष्टीकोन या व्यतिरिक्त असेल, असे असू शकेल जसा माझा ही होता. परंतु ते मी प्रेरणेद्वारे घेतो ज्याने माझा दृष्टीकोन त्याकडे पाहण्याचा पूर्णपणे बदलला आहे. समजले?

41 आणि मला असे आढळले की जसेजसे आपण या शिक्क्यांचे प्रगट होणे पाहतो तसे तसे तुम्हाला हे कळेल की हे शिक्के भुतकाळातील घटनेशी जोडलेली आहेत आणि त्या मंडळीच्या युगांना आणि शास्त्रवचनांला एकत्रितरित्या जोडते. पाहा? आणि त्याच कारणामुळे मी विश्वास करतो की ते देवापासून येते. आता. आम्हाला त्याचा अनुभव येतो.

42 आणि मी असा विचार करतो की कधीकधी यावर एवढे अवलंबुन राहतो की कोणा महान शिक्षकाने ह्याविषयी सांगितले असेल. समजले? आणि हे—हे खरे आहे. मी कोणत्याही प्रकारे कोणा शिक्षकाची निर्भत्सना करीत नाही. आणि मी कोणाला ही दोष देत नाही. मी तर फक्त पापाला, अविश्वासाला दोष देतो, आणि कोणालाही नाही.

43 आणि काही लोकांनी सांगितले होते, "तुम्ही संस्थेला दोष देता," नाही, मी नाही देत. मी—मी तर केवळ संस्थेची जी प्रणाली आहे त्याला दोष देतो, त्यातील लोकांना नाही दोष देत. परंतु तुम्ही पाहा, की हा लोकांचा समुदाय आहे जे संस्था बनवितात. परंतु ही तर एक प्रणाली आहे ज्याद्वारे त्यांना चालविण्यात येते तसे चालतात, आणि तेच आहे, ज्याची मी निर्भत्सना करतो, कॅथलिक आणि प्रोटेस्टंट, हे एकाच प्रणालीतून आहेत. बापरे!...

44 माझे काही चांगले मित्र ज्यांना—ज्यांना—ज्यांना मी ओळखतो, ते कॅथलिक आहेत...?...काय तुम्हाला जाणीव होते...आणि होऊ शकते आज रात्री कदाचित असा कोणी व्यक्ती येथे बसलेला असेल. आम्ही या प्रार्थना गृहाचे बांधकाम यासाठी करु शकलो, कारण एक रोमन कॅथलिक व्यक्ती दृढपणे कोर्टात माझ्या पक्षाने उभा राहीला. आणि त्या रोमन कॅथलिक व्यक्तीने माझ्यासाठी जे केले ते कोणीही करु शकणार नाही. हे सत्य आहे. आणि ते कोणीही नाकारु शकणार नाहीत. हे खरे आहे.

आणि सांगितले, "त्यांनी 'अनेक लोकांची' मोजणी केली आहे."

45 त्याने सांगितले, “ओह, ह्याप्रकारे मंडळीत गणती ऐंशी सुध्दा होणार नाही.” त्याने सांगितले, “परंतु मंडळी तेथेच आहे. आणि मी पाळकाला ओळखतो, आणि सर्वप्रकारे. मंडळी तेथे राहीली आहे. जेव्हा तुम्ही मंडळीत लोकांची संख्या वाढवू शकता, तर ते का नाही वाढवू शकत?” एक रोमन कॅथलिक, एक माझा चांगला मित्र. पाहा? होय, महाशय.

46 तो व्यक्ती एक—एक रोमन कॅथलिक, आहे आणि माझा तो एक खरा पहिल्याप्रतीचा मित्र आहे, जो माझ्याशी बोलत होता. मी तेथून सोडताना, त्याचे एक हार्डवेयरचे दुकान होते. त्याने म्हटले, “बिली, मला—मला माहीत आहे की तू आमच्या धर्माच्या प्रणालीवर विश्वास करित नाहीस.” तो म्हणाला, “परंतु मी तुला आता सांगत आहे,” म्हणाला, “परमेश्वराने आमच्यासाठी तुझ्या प्रार्थनेला सन्मानीत केले आहे! आणि मी विश्वास करतो की तू देशात कुठेही कोणत्या संकटात असशील तर देशाचा प्रत्येक कॅथलिक तुझ्या मदतीसाठी तुझ्या जवळ येईल.” शेवटी तुम्ही पाहा, हे असे...

47 तो म्हणाला, “प्रत्येक पाठीमागे वधस्तंभाचे चिन्ह ठेवणारा,” त्याने असेच म्हटले होते. मी तुम्हाला याविषयी सांगणार होतो की त्याने असे का म्हटले होते. निश्चितच ते याविषयी दावा करतात की तेच ते होते कारण आधीचे ख्रिस्ती लोक हे जेथे कुठे जात ते आपल्या पाठीवर क्रुस वाहून नेत असत. आम्ही हे इतिहासावरुन जाणतो. आणि ते मूळचे ख्रिस्ती लोक असण्याचा दावा करीत होते आणि ते निश्चितच प्राचीन ख्रिस्ती लोक होते. परंतु तुम्ही पाहा, त्यांची प्रणाली जी होती तिच्याद्वारे ते त्या मार्गातून विचलित झाले.

48 आणि ते लोक कॅथलिक असो किंवा यहुदी किंवा कोणीही असो, ते त्याच वृक्षाचे मनुष्य आहेत ज्यांतून आम्ही आलो आहोत. समजले. हे खरे आहे. ते—ते लोक असे लोक आहेत जे प्रेम करतात, खातात-पितात आणि झोपतात, आणि कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीसारखे आहेत. आणि म्हणून आम्ही कोणाही व्यक्तीला वैयक्तिकरित्या कधी दोषी ठरवू नये. परंतु, आम्ही वैयक्तिकरित्या कोणालाही दोषी ठरवू नये.

49 परंतु, एक सेवक, ह्या नात्याने, मला त्या सर्पाला तडाखा द्यावा लागतो, जो त्या लोकांना दंश करतो, तुम्ही पाहा. आणि मी—आणि मी नाही करत...जर मला परमेश्वराने ते करण्याचा अधिकार दिला नसता तर करुच शकलो नसतो, परंतु पाहा. मी तसे करण्यासाठी कर्तव्यदक्ष आहे. आणि मी खरेपणाने व विश्वासयुक्त पणाने ते पकडून राहायलाच पाहिजे.

50 परंतु येथे कोणी कॅथलिक, यहुदी किंवा तो कोणीही का असेना, जर तो मुसलमान, हेल्लेणी, किंवा कट्टरपंथी, जर तो प्रार्थना केली जावी म्हणून येतो, तर मी त्याच्यासाठी सात्विकतेने प्रार्थना करिन जसे मी माझ्या लोकांसाठी करतो. हे खरे आहे. निश्चितच मी तसे करीन कारण ते सुध्दा मनुष्य आहेत. आणि तुम्हाला माहीत आहे की मी बौध्द आणि सिख, जैन, मुसलमान आणि—आणि हरएक धर्माच्या अनुयायासाठी त्याचप्रमाणे प्रार्थना करितो. आणि मी त्यांना काहीही प्रश्न विचारित नाही; मी फक्त त्याच्यासाठी प्रार्थना करतो, कारण ते कोणी एक आहेत ते कोणी मनुष्य आहेत जे बरे होऊ इच्छितात आणि आपले जीवनाचे मार्ग थोडे सोपे करण्याचा प्रयत्न करत असतात.

51 आता आम्हाला असे लक्षात आले, की जो येथे आहे त्यांच्यातील अनेकांना मी ओळखतो आणि मला माहीत आहे येथे दोन किंवा तीन धर्मशास्त्राचे विद्वान बसलेले आहेत. आणि—आणि ते चलाख बुध्दीचे लोक आहेत. आणि त्यांनी या विषयावर दुसऱ्या लोकांच्या शिक्षणाचे वाचन केले आहे. आणि मी त्या भावांना हे सांगू इच्छितो की मी—मी या लोकांना दोष देत नाही. मी तर फक्त ते प्रगट करण्याचे काम करतो जे प्रभूने मला दाखविले आहे. आणि तेच सर्व आहे जे मी ओळखतो.

52 आता पाहा, आम्ही हे कधीच विचार करु शकत नाही की कपडे धुणारी कोणी साधी स्त्री किंवा—किंवा नांगर चालविणाऱ्या लहान मुलाला परमेश्वराकडून प्रकटीकरण मिळू शकत नाही. कारण तुम्ही पाहता, वास्तविकरित्या, परमेश्वर स्वतःला साधेपणात प्रगट करतो. तेच आहे जे आम्ही सुरवातीलाच रविवारी पाहिले होते. परमेश्वर कसे आपल्याला साधेपणात प्रगट करतो तेच काय ते परमेश्वराला महान बनविते.

53 आता, मला—आता मला...एका मिनिटासाठी त्याचे चिंतनासाठी परिक्षण करु द्या. परमेश्वराला काय महान बनविते, कारण तो स्वतःला अगदी साधेपणात ठेवतो, तेच त्याला महान बनविते. परमेश्वर यासाठी महान आहे कारण तो आपल्या स्वत:ला एवढे साधेपणाच्या स्वरुपात ठेवतो की या जगाचे ज्ञानी त्याला शोधू शकत नाहीत. ते त्याला शोधू शकत नाहीत, कारण तो स्वतःला फारच साधेपणात ठेवतो. आता पाहा, आपल्यातच ते जो आपल्याला परमेश्वरापेक्षा महान बनविल असे काहीच नाही. आणि तुम्ही कोणालाही साधेपणात आणू शकत नाही जेवढा की परमेश्वर स्वतःला साधेपणात आणू शकतो. पाहा? हेच काय ते आहे जे त्याला महान बनविते.

54 आता पाहा, की एक व्यक्ती जो महान आहे, आणि अजून थोडा अधिक महान बनू शकतो किंवा असे असू शकते की त्याचा थोडासा अधःपात झाला आणि म्हणेल, “तुम्ही कसे आहात?” किंवा तो तुम्हाला ह्या तऱ्हेने काही बोलेल. कारण तो आपल्या स्वत:ला लहान बनवू शकत नाही. त्याच्याविषयी हीच ती एक गोष्ट आहे. तो मनुष्यच आहे. आणि तो आपल्या स्वत:ला लहान बनवू शकत नाही. कारण जेव्हा तो स्वतःला अत्यंत अल्प करण्यास खाली होतो, तेव्हा, पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, तो दुसऱ्या गोष्टींचा उल्लेख करु लागतो जे त्याने कोणा दुसऱ्यांसाठी केले होते. आणि तो अशाच प्रकारच्या गोष्टी सांगतो. आणि तुम्ही पाहा, की तो पुन्हा आपल्या स्वतःला वरती उठवू लागतो, तुम्ही पाहिले.

परंतु परमेश्वरामध्ये वर जाण्याचा मार्ग खाली जाणे आहे. होय.

55 या जगातील ज्ञानवान लोक परमेश्वराला आपल्या बुध्दीने, शोधण्याचा प्रयत्न करतात. असे करुन ते परमेश्वरापासून दूर वरती चढत जातात. पाहा, या जगातले ज्ञानवान, जर तुम्ही काहीतरी समजावून सांगण्याचा प्रयत्न करता गणित शास्त्राद्वारे किंवा असेच काही. लक्षात ठेवा, परमेश्वराने ते...बायबलमध्ये ठेवले आहे, प्रकटीकरणाद्वारे... नाही मला माफ करा.

56 मला वाटते ते यशया 35 आहे, की ते एवढे—ते एवढे साधे आहे की एक—एक—एक दोषी व्यक्ती सुध्दा ते समजू शकेल. समजले? ओह, “मूर्ख जरी असतील तरी मार्ग भटकणार नाही.”

57 ज्ञानवान लोक आपल्या ज्ञानाद्वारे त्याला हरवून बसतात, ते आपल्या ज्ञानाद्वारे त्याला शोधण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे त्यापासून दूर निघून जातात. आता, तुम्ही हे विसरु नका. पाहा, ते टेप केले जात आहे. ज्ञानवान लोक त्याला आपल्या ज्ञानाने शोधण्याद्वारे त्यापासून फार दूर निघून जातात की ते त्याला हरवून बसतात. जर खूप महान बनण्यासाठी त्यांना खूप साधेही बनावे लागेल, त्याला शोधण्यासाठी. जर तुम्ही तेवढे महान आहात तेवढे साधे बनण्यासाठी! समजले तुम्हाला? आणि, तुम्हाला माहीत आहे, की—की हे खरोखर सत्य आहे.

58 मी लोकांमध्ये गेलो आहे, त्यांच्या कार्यालयात, आणि इत्यादी मध्ये गेलो आहे, जे राजे, सत्ताधीश, सम्राट आणि ते मोठेमोठे पदाधिकारी आहेत. मग मी त्या व्यतिरिक्त काही ठिकाणी सुध्दा गेलो आहे; जेथे व्यक्ती आपले कपडे बदलतो आणि कोणी सेवक माझ्याशी

थोडा विवाद करु इच्छितो, आणि तुम्ही—तुम्ही विचार कराल की तुम्ही त्याशिवाय जगाला चालवू शकत नाहीत. आणि अशाप्रकारे आपल्या विचारांमध्ये फुगले जातात. परंतु एक—एक महान व्यक्ती, एक महान व्यक्तीखाली बसतो आणि तो असा प्रयत्न करतो तुम्ही असे विचार करावेत की तुम्ही एक महान व्यक्ती आहात. समजले? पाहा, एक महान व्यक्ती आपल्या स्वतःला लीन बनवू शकतो.

59 आणि, तुम्ही पाहा, देव फार महान आहे तो आपल्या स्वतःला इतके लीन बनवून, एका अशा स्थितीत, आणतो की मनुष्य एवढा खाली उतरु शकणार नाही. तुम्ही पाहा त्याच्या महानतेच्या विषयी हेच सर्व काही आहे.

60 आणि ते त्याला शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. आता पाहा, की ते प्रयत्न करित आहेत आपल्या मुलांना शाळेत पाठवून, आणि कलेचे पदवीधर बनवू इच्छित आहेत. आणि ते प्रयत्नशील आहेत दैवशास्त्राच्या परिभाषेद्वारे बायबल शोधू इच्छित आहेत. आणि ते शिक्षण कार्यक्रम आणि संस्थेचे कार्यक्रम आणि वस्तूंच्या सुशोभिकरणाद्वारे त्याला शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. तो तर त्यामध्ये कदापि नाहीए. तुम्ही फक्त वाऱ्याशी लढत आहात, तुम्ही—तुम्ही तर त्यापासून दूर चालले आहात.

61 ते खूप साधे बनण्याद्वारे खूप महान बनवू शकतात, ते त्याला त्या दिशेत केवळ साधेपणातच शोधू शकतात. परंतु जीतपर्यंत तुम्ही त्या दिशेत आपल्या ज्ञानाने जाल तर तुम्ही त्याच्यापासून दूर जात राहता.

62 आता तुम्ही हे घेऊ द्या यासाठी की तुम्ही ते चुकवू नये. जितपर्यंत तुम्ही परमेश्वराला ज्ञानांद्वारे शोधण्याचा प्रयत्न करता, जसे ते एदेन बागेत झाले होते, जसे ते मोशेच्या दिवसात केले गेले, जसे नोहाच्या दिवसात, जसे ते ख्रिस्ताच्या दिवसांत केले गेले होते, जसे ते योहानाच्या दिवसांत केले गेले होते, जसे ते प्रेषितांच्या दिवसांत केले गेले होते, आणि जसे ते आजही केले जात आहे. जेव्हा जेव्हा आपण त्याचे चित्रण आपल्या ज्ञानाद्वारे करण्याचा प्रयत्न करीत असतो तेव्हा प्रत्येक वेळी तुम्ही त्याच्यापासून दूरच जात राहता. तुम्ही फक्त त्याला समजण्याचा प्रयत्न करीत आहात, जेव्हा त्याला समजण्याचा कोणताच मार्ग नाही. फक्त स्विकार करा. समजले? फक्त विश्वास करा. ते समजण्याचा प्रयत्न करु नका.

63 पाहा, मी पुष्कळश्या गोष्टी समजू शकत नाही. मी पुष्कळ गोष्टी समजू शकत नाही किंवा मी पुष्कळश्या गोष्टी नाही समजू शकत. मी हे समजू शकत नाही की—की येथे समोर बसलेला मुलगा कसे तेच अन्न खाऊ शकतो जे मी खाऊ शकतो. मी हे नाही समजू शकत की का त्याच्या डोक्यांवर पुष्कळ केस आहेत. ते मला म्हणतात, कॅल्शिअमपासून ते तयार होतात; आणि मी माझी नखे कापण्याच्या उद्देशाने ते लांब वाढवू शकत नाही आणि केस कापण्याच्या उद्देशाने माझ्याकडे केस नाहीत. मी—मी हे समजू शकत नाही, जसे एक जूनी म्हण आहे...

64 असे नाहीए की मी आपल्या गंभीरतेच्या स्थितीला, बदलले आहे, हे गंभीर आहे, परंतु मी अजूनपर्यंत शिक्क्यापर्यंत आलो नाहीए.

65 मी निश्चितच हे समजत नाही की कशी काळी गाय हिरवा चारा खाते, आणि सफेद दूध देते, आणि तिच्या दूधातून पिवळ्या रंगाचे तूप बनते. कारण, तुम्ही पाहा, की प्रत्येक वस्तु ही दुसऱ्या वस्तुचा परिपाक आहे. आणि ते कसे होते, मला ते स्पष्ट करता येणार नाही.

66 मी हे स्पष्टच करु शकत नाही की दोन्ही लिली फुले कशी उभे राहतात, किंवा दोन्ही फूले, एकाच जातीची, आणि त्यातील एक लाल, आणि दुसरे पिवळ्या रंगाचे, आणि एक

तपकिरी रंगाचे, आणि एक निळ्या रंगाचे मी ते समजू शकत नाही. एकच सूर्य त्याच्यावर प्रकाशतो. कुठून बरे त्यांचा रंग येतो? पाहा? मी ते स्पष्ट करुच शकत नाही, परंतु तरीही तुम्हाला ते स्विकारावे लागेल.

67 मी इच्छा करतो की कोणा धर्मशास्त्र विद्वानाने हे स्पष्ट करावे की हे जग कसे बरे कक्षेत परिभ्रमण करते. मी इच्छा करतो की तुम्ही शास्त्रीय दृष्ट्या एक चेंडू जो हवेत फिरतो तो फेकावा आणि तो त्याचे दुसऱ्यांदा परिभ्रमण त्याच ठिकाणी करिल. तुम्ही ते करु शकणार नाहीत. आणि तरीसुध्दा वैज्ञानिक तुम्हाला सुर्यग्रहणाच्या विषयी वीस वर्षानंतरची वेळ अगदी संपूर्णत: सांगु शकतात. त्यांनी त्या सुर्यावर काही समय सूचक किंवा घड्याळ, किंवा अशाप्रकारचे काही यंत्र लावलेले नाही, सूर्याचे ग्रहण तर सिध्द आहेच. आणि तरीही सुर्य तेथेच राहतो. आणि नंतर ती थोडीशी मागे केली तर. काय होईल. जर पृथ्वी आपल्या अक्षात सरळ उभी राहील? होय. तुम्ही हे करण्याचा प्रयत्न कराल तर आपल्या स्वत:ला मुर्ख बनवाल.

68 म्हणून, तुम्ही पाहा, समजण्याच्या दृष्टीने, ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करु नका. फक्त परमेश्वरावर विश्वास करा, तो जे काही सांगतो. आणि जेवढे साधे तुम्ही व्हाल तेवढे तुम्ही त्याला प्राप्त कराल. आता, मी त्याविषयी फार आभारी आहे, तो आहे याविषयी आभारी आहे, आणि त्याने स्वतःला एवढे साधेपणात ठेवले आहे म्हणून. आता, आम्ही शोधू – या, 6वा अध्याय आणि 9वे वचन. मला सुरुवात करु द्या.

> *त्याने पाचवा शिक्का फोडला तेव्हा मी वेदीखाली आत्मे पाहिले, ते आत्मे देवाच्या वचनामुळे व त्यांनी जी साक्ष दिली होती...तिच्यामुळे जिवे मारलेल्या लोकांचे होते.*

69 आता लक्ष द्या, येथे कोणत्याही प्राण्याचा उल्लेख केलेला नाहीए किंवा जीवंत प्राणी, जेव्हा हा पाचवा शिक्क्याविषयी घोषणा केली तेव्हा. आता लक्ष द्या, चौथ्या शिक्क्याच्या घोषणेच्या वेळी, तेथे एक प्राणी होता. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या शिक्क्याच्या घोषणेच्यावेळी तेथे एक एक प्राणी होता, परंतु येथे नाही समजले?

70 आता, येथे लक्ष द्या. येऊ या आणि मागिल शिक्क्यांपैकी एक फक्त वाचूया, या आपण पुन्हा चौथ्या शिक्क्याकडे जाऊ, पाहा. ते 7वे वचन आहे.

> *त्याने चौथा शिक्का फोडला, तेव्हा चौथा प्राणी, ये, असे म्हणाला, ते मी ऐकले. ये...पाहा.*
>
> *...त्याने...तिसरा शिक्का फोडला, तेव्हा तिसरा प्राणी, ये, असे म्हणाला, ते मी ऐकले.*
>
> *...दुसऱ्या प्राण्यापैकी...ये...आणि पाहा.*
>
> *...आणि पहिला प्राणी म्हणाला, ये आणि पाहा.*

71 परंतु तेव्हा जेव्हा आम्ही पाचव्या शिक्क्याकडे येतो, तेथे कोणी प्राणी नाहीए. आता हे ध्यानात घ्या.

> *त्याने पाचवा शिक्का फोडला तेव्हा मी वेदीखाली आत्मे पाहिले...*

72 आता आपण लवकरच ते पाहू! पाहा, येथे पाहा कोणीही प्राणी नाह—नाही. आणि एक प्राणी शक्तीला दर्शवितो. पाहा, आम्हाला हे ठाऊक आहे. येथे कोणी जीवंत प्राणी नाहीए.

73 आता, पाहा, या मंडळीच्या काळाच्या प्रकटीकरणाचा अभ्यास करताना आम्ही त्या प्राण्यांना पाहीले होते, जो त्या प्राण्यांपैकी एक होता...एक सिंह; आणि दुसरा—दुसरा गोऱ्हा, आणि तीसरा प्राणी मनुष्यासारखा, आणि चौथा प्राणी हा गरुड होता. आणि आम्ही सात मंडळ्यांच्या काळाच्या अभ्यासात हे पाहिले होते की त्या चार प्राण्यांविषयी जे प्रेषितांच्या कृत्याच्या चारही बाजूला, ते उभे राहिले होते जसे अरण्यात ते त्या तम्बू सभोवती उभे होते. या चार प्राण्याचा अर्थ चार सामर्थ्य आहेत. आणि तुम्ही त्याविषयी समजले आहात, कारण मी आता अधिक वेळ त्यामध्ये जाण्यास घेणार नाही. आम्ही त्याचे चित्रण येथे केले होते आणि तंतोतंत ते दाखविले होते! ते कोकरा आणि शब्द यांकडे दृष्टी लावून होते, वचनाचे कर्तव्य पूर्ण करण्याच्या उद्देशाने ते होते जसे पवित्र स्थानातील कराराच्या कोशाविषयी जसे त्या अरण्यात केले होते.

74 आता, आम्ही ते इस्त्राएलाच्या वंशांना रंगाद्वारे ते त्याच्या ठिकाणी दाखविले होते... किती जणांनी सात—सात मंडळीच्या काळांविषयी ऐकले होते? मला वाटते आपल्यातले सर्वच अर्धेतरी, दोन तृतीयांश. लक्ष द्या की, इथपर्यंत की प्रत्येक प्राण्याचा स्वभावसुध्दा आपल्या वंशाच्या चिन्हाप्रमाणेच होता, आणि त्या प्रमाणे बारा वंश आहेत आणि प्रत्येक त्या बाजूने चार किंवा—किंवा तीन वंश होते आणि हे चारही कोपऱ्यात बसलेले आहेत आणि चारही कोपऱ्यांतून ह्या वंशावर ते दृष्टी लावून आहेत.

75 आणि जेव्हा आम्ही त्याच्यापुढे अभ्यास केला होता आणि शुभवर्तमान ते अगदी बरोबर दाखविले. जेव्हा तुम्ही कराराच्या कोशात प्रवेश करता, तेव्हा ते तेथे कराराच्या कोशाची रखवाली करणारे होते. आणि मग आपल्याला नविन मंडळीला करार आढळतो, जो पृथ्वीवर दर्शक स्वरुपात आहे आणि तो पवित्र आत्मा आहे. आमच्यासाठी रक्ताने पवित्र आत्म्याला पुन्हा पृथ्वीवर पाठविले आहे. आणि ते चार प्राणी जे दर्शविलेले आहेत जे इस्त्राएलाच्या बारा वंशाकडे दृष्टी लावून आहेत, हे आम्ही पाहतो. आणि आम्ही त्यांच्या स्वभावाला पाहिले आणि आम्ही त्याच्या स्वभावावरुन त्यांतील प्रत्येक शुभवर्तमानाचा अभ्यास केला होता. आणि प्रत्येक शुभवर्तमान अगदी बरोबर त्यांतील प्रत्येक प्राण्यांच्या स्वभावासारखा होता. एक सिंहाविषयी सांगतो, तर दुसरा गोऱ्हांविषयी आणि तिसरा...हे चार शुभवर्तमान आहेत. ते पवित्र आत्म्याची सुरक्षा आहेत. आमेन.

76 मी सदैव आश्चर्य चकित होत असे...ही गोष्ट मला नेहमी त्रास देत असे. आता, मला वाटते त्याला जवळजवळ सहा वर्षे झाली असावी, जेव्हा मी एका महान व्यक्तीला हे म्हणताना ऐकले होते की..."प्रेषितांची कृत्ये ही केवळ बांधकामासाठी केवळ मांडणी होती." मी त्याला बरेच वेळा बोलताना ऐकले आहे. परंतु एका व्यक्तीला ज्याला अशाप्रकारची प्रतिष्ठा आहे, जो एक प्रचारक आणि शिक्षक दोन्हीही आहे ज्याने काही अशी प्रसिध्द पुस्तके लिहीली आहेत, त्याला सर्व ठिकाणी लोक वाचत आहेत, अशा व्यक्तीला हे बोलताना ऐकले, की प्रेषितांची कृत्ये ही वास्तविकरित्या मंडळीच्या शिकवणुकीसाठी सोयीस्कर नाहीयेत!

77 जेव्हा, प्रेषितांची कृत्ये ही तर त्याचा वास्तविक पाया आहे; आणि त्याचे बांधकामासाठी केलेली मांडणीत नाहीए. तर मंडळीचा पाया आहे! कारण, बायबल म्हणते की परमेश्वराचा पाया, "प्रेषितांच्या शिकवणुकीवर बांधला आहे, ख्रिस्त जो कळसाचा धोंडा आणि कोनशिलाही."

78 आणि जेव्हा व्यक्ती तेथे उभा होता, आणि अशाप्रकारचा शेरा दिला, मी—मी—मी—मी तर...माझे हृदय जणू बंद झाल्यासारखे भासले. आणि मी विचार केला, "यात

काही आश्चर्य नाही." परंतु मी ह्या शिक्क्यांमध्ये खरेपणा पाहत आहे. तेव्हा ते मला प्रगट केले गेले नव्हते. त्याविषयी हेच सर्व काही आहे. समजले?

79 म्हणून, ते तेथे उभे होते, परंतु कोणीतरी काही म्हणत होता. आता, हे रक्षण करणारे, त्यांवर लक्ष द्या.

80 आणि, जेव्हा आम्ही मत्तय 28:19 चा अभ्यास केला, आणि त्याला मत्तय शुभवर्तमानाद्वारे जो सिंहाला दर्शवितो, बारकाईने त्याचा अभ्यास केला, तेव्हा आम्ही अशा निष्कर्षावर पोहचलो व आम्हाला आढळले की त्यांनी का येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा दिला. आणि तेथे तो येशू ख्रिस्ताच्या नावाच्या बाप्तिस्म्याविषयी पवित्र विश्वासाचे रक्षण करण्यासाठी उभा होता. हे खरे आहे. ठिक आहे, आता मी ह्या मंडळी युगांना सोडत आहे.

81 लक्ष द्या. आता जेव्हा आम्ही पाचव्या शिक्क्याकडे येतो, तेव्हा—तेव्हा—तेव्हा पाचव्या शिक्क्यामध्ये कोणी घोडेस्वार बाहेर निघत नाहीए आणि त्याविषयी घोषणा ही करण्यासाठी कोणी प्राणी नाही. योहानाने...कोकऱ्याने ते उघडले, आणि योहानाने पाहिले. पाचवा शिक्का उघडल्यावर तेथे बोलण्यास कोणीही नाहीए. "ये आणि पाहा." लक्ष द्या. येथे जीवंत प्राण्यांचे काही सामर्थ्य नाहीए. किंवा तेथे...

82 आणि सहाव्या शिक्क्याविषयी, त्याची घोषणा देण्यासाठी कोणीही प्राणी नाहीए. आणि सातव्या शिक्क्याविषयी सुध्दा त्याची घोषणा देण्यासाठी कोणी प्राणी नाहीए. त्याची घोषणा करण्यासाठी काही सामर्थ्य नाही...पाहा, चौथ्या शिक्क्यानंतर तेथे काहीही घोषणा कोणा प्राण्याच्या शक्तीद्वारे नाहीए, पाच पासून, सहा किंवा सातवा शिक्क्यांपर्यंत, कोणतीही घोषणा होत नाही.

83 आता लक्ष द्या. मला ही गोष्ट फार आवडते; कि चार घोडे स्वाराच्या समयी वेगवेगळ्या चार घोड्यांचा (एकच स्वार आहे), एक प्राणी होता जो सामर्थ्याच्या विषयी बोलतो. प्रत्येक वेळी स्वार कोणा दुसऱ्या घोड्यावर स्वार होऊन पुढे जातो. तर एक दुसऱ्या प्रकारचा प्राणी बाहेर येतो आणि अशी घोषणा करा, "हे एक महान रहस्य आहे." समजले? "हे एक रहस्य आहे." का? रहस्याची घोषणा देत आहे.

84 पाचव्या शिक्क्याच्या समयी त्याची घोषणा करण्यासाठी का बरे कोणी नाहीए? या प्रकटीकरणानुसार जे प्रभू येशूने आज दिले म्हणजे आज सकाळी पहाटे दिले आहे, त्यानुसार त्याचे कारण हे आहे की त्या समयापर्यंत (पाचव्या शिक्क्याच्या समयापर्यंत) मंडळी युगांचे रहस्य पहिलेच समाप्त झाले आहेत. या समयी ख्रिस्तविरोधकाचे रहस्य प्रगट केले गेले आहे. आम्ही पाहिले होते की ख्रिस्तविरोधक आपल्या फिक्कट घोड्यावर अनेक रंगाच्या, मिश्रणाच्या रंगाच्या घोड्यावर स्वार होता तो आपल्या शेवटच्या स्वारीवर होता, आणि तो स्वारी करीत सरळ नाशात चालत जातो.

85 आम्ही तुतारी आणि दुसऱ्या गोष्टीत त्याला पाहतो, जेव्हा आपण त्याविषयी शिकवतो. मी आता ते घेतो, परंतु आता मला तो पाचवा शिक्का पाहिला पाहिजे, परंतु आम्ही पुन्हा आपल्या विषयावरुन दूर गेलो आहोत. आणि आम्ही—आम्ही पाहिले होते की ...तो स्वार होतो...

86 हेच कारण आहे की तेथे कोणी ही नाहीए. आता आम्ही कारणाशिवाय काहीही लिहत नाही. कोणत्याही गोष्टीचे काहीना काही कारण असते. आता, तुम्ही लक्षात ठेवा, मी सुरुवातीलाच म्हणालो होतो की कारणाविना काहीही होऊ शकत नाही. त्या शाईच्या लहान थेंबाचे आठवते काय? समजले? तुम्हाला त्याचे कारण शोधले पाहिजे. तेथे काही कारण आहे ज्यामुळे तेथे ते प्राणी नाहीए, किंवा सामर्थ्य हा शिक्का फोडल्यावर त्याची

घोषणा करण्यासाठी. आणि फक्त देवच प्रगट करु शकतो, कारण ते सर्व—सर्व काही परमेश्वरात आहे.

87 परंतु परमेश्वराला ते प्रगट करण्याचे कारण हे आहे जसे आम्ही समजू शकतो, हे आहे, मुक्तीच्या पुस्तकाचे रहस्य जितपर्यंत की ख्रिस्त विरोधक प्रगट केला जात होता आणि या समयातील मंडळी निघून गेली आहे, आणि ह्या गोष्टी मंडळीच्या युगांत घडल्याच नाही. हे खरे आहे. ते—ते लोक मंडळीच्या युगांपासून वेगळे आहेत. ह्या समयात मंडळी पूर्णतः लोकांतरी गेली आहे. मंडळी प्रकटीकरणाच्या चौथ्या अध्यायातच वर घेतली जात जाते. आणि ती तितपर्यंत परत येत नाही जितपर्यंत ती 19व्या अध्यायात आपल्या राजाबरोबर परत येत नाही. परंतु हे शिक्के हे प्रगट करीत आहे की काय झाले आहे, काय होणार आहे आणि काय होणार. समजले, आणि आता, या शिक्क्याद्वारे हे प्रगट केले आहे की मंडळी युगात काय काय घडले पाहिजे होते. आणि आता पाहा की काय घडणार आहे.

88 स्वाराचे चार टप्पे प्रगट केले गेले आहेत. ख्रिस्त विरोधकाचे चारही टप्पे, जे स्वार होते, या समयापर्यंत प्रगट करण्यात आले आहेत, म्हणून अधिक घोडेस्वार होऊ शकत नाही.

89 आणि जसे ते घोडे बाहेर निघतात तेव्हा त्यांच्या स्वाराविषयी घोषणा करण्यासाठी परमेश्वराचे चार जिवंत प्राणी होते. हे चार प्राणी चार सामर्थ्य आहेत. आता, आम्ही बायबलच्या चिन्हांची संज्ञेद्वारे त्याचा अर्थ समजतो की *प्राणी* हे "सामर्थ्य" दर्शवितात. आता आम्ही ते अधिक खोलवर समजू या. बायबलमध्ये जे चार प्राणी दिले आहेत, ते लोकांच्यामध्ये सामर्थ्याला दर्शवितात.

90 आता, जर आम्ही दानिएलाच्या पुस्तकात पाहिले तर आम्हाला आढळते की जेव्हा त्याने कोणत्या राष्ट्राचा उदय होताना पाहीले, तर ते प्रतिकात्मकरित्या असे होते की एक अस्वल एका फासळीला पकडून आहे. मग त्याने पाहीले की दुसरे सामर्थ्य उदय पावले, एक बकरा. ते काहीतरी दर्शविते. मग त्याने पाहिले अजून एक सामर्थ्य उदय पावले, आणि—आणि ते चित्ता होते, अनेक मस्तकांसह. ते एका राज्याला दर्शविते. मग तो अजून एक उदय पावताना पाहतो, एक मोठा सिंह ज्याला दात आहेत आणि तो अवशेष तुडवितो. ते पूर्णपणे वेगळ्या राज्याला दर्शवित आहे. एक—एक राज्य जे नबुखद्देसराचे होते. आणि दुसरे आम्ही पाहतो स्वप्नाचा प्रकार. दानिएलाने दृष्टान्त पाहिला होता आणि नबुखद्देसराने स्वप्न पाहिले होते. परंतु दानिएलाने त्याच्या स्वप्नाचा अर्थ सांगितला, आणि ते पूर्णतः दृष्टान्ताप्रमाणेच बरोबर होते.

91 आमेन! वाह! ओह! [भाऊ ब्रॅन्हम एक वेळा आपल्या हातांनी टाळ्या वाजवितात—सम्पा.] जर तुम्हाला माहित झाले असते की काय घडले होते? आपण येथून पुढे जाण्याअगोदर काय तुम्हाला समजले काय की काय घडले होते? का ते सहा स्वप्न जे एका मागून एक असे दाखविले गेले जे दृष्टांन्ताने दाखविले गेले. आमेन. समजले? स्वप्नाचा, केलेला अनुवादच, दृष्टांत आहे. कारण असे नाही होऊ शकत की एक व्यक्ती जो सुप्त मनासह जन्मलेला आहे, दृष्टान्त जागे असताना पाहत असतो. आणि परमेश्वर त्याच्या सुप्त मनाचा वापर करतो आणि त्या व्यक्तीशी तो बोलतो. ज्याविषयी परमेश्वराने अभिवचन दिले आहे की शेवटच्या दिवसांत तो लोकांस स्वप्न व दृष्टान्तांद्वारे भेट देईल. समजले?

92 आता, दृष्टान्तात तुम्ही पूर्णतः जागे असता, अशा प्रकारे उभे असता, आणि काही गोष्टी प्रगट केल्या जातात. आणि तुम्ही उभे राहून लोकांना त्या वेळी एकदम योग्य ते सांगता, काय घडले आणि काय घडणार आहे आणि असेच काही.

93 परंतु, आता, एक स्वप्न जे असते तेव्हा तुम्ही झोपलेले असता, आणि तुमचे पाच इंद्रीय हे अकार्यशील असतात, आणि तुम्ही—तुम्ही तुमच्या सुप्त मनात असता. पाहा. तुम्ही कुठेतरी असता कारण जेव्हा तुम्ही सुप्त मनात परत येता तेव्हा आठवण येते की तुम्ही कुठे होता. आणि तुम्ही त्या स्वप्नाला संपूर्ण जीवनभर आठवणीत ठेवता पाहा? म्हणूनच, हे तुमचे सुप्त मन असते. मग त्या क्रमात...

94 जसा क्रॉगेसमेन अप्शॉ म्हणत असे, "तुम्ही ते असू शकत नाहीत जे वास्तवात नाहीयेत," आणि ही गोष्ट जवळजवळ योग्य आहे, समजले.

95 आणि, मग, जर तुम्ही एक संदेष्टा म्हणून जन्मला आहात. आता, पाहा, तुमची दोन्ही मने ही एकत्रित असायला हवीत, असे नाही की एक *येथे* पाच इंद्रियासहीत कार्यरत आणि दुसरे *येथे* जेव्हा तुम्ही झोपलेले आहात, आणि पाच इंद्रीय हे कार्यरत नाहीत. परंतु, तुम्ही पाहा, जेव्हा हे दोन्ही सहीत, तुम्ही जन्मलेले आहात, तर ते एकत्रीत असतात आणि तुम्ही झोपी जाऊ शकत नाहीत. फक्त एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत निघून जाता. आणि तुम्ही त्या अवस्थेत झोपी जाऊ शकत नाहीत. झोपण्याची काही आवश्यकताच वाटत नाही आणि तुम्ही स्वतःला असे नाही बनवू शकत.

96 म्हणून "वरदाने आणि बोलावणे ही देवाकडून पूर्वनियुक्त आहेत." ते—ते देवाची वरदाने आणि बोलावणे, ती देखील "पश्चातापविना" असे बायबल म्हणते. पाहा? ते त्यासाठी जगाच्या स्थापनेअगोदरच नेमलेले आहेत. समजले?

97 आता, आता, आम्हाला आढळते...एक पशु, जो दानिएलात, दिसतो ते एक सामर्थ्याला दर्शवितो ज्याचा उदय लोकांमधून होत आहे. ठिक आहे. आणि—आणि योहानाच्या दृष्टांन्तामध्ये येथेही सामर्थ्याला दाखविते, राष्ट्रे उदयात येताना दिसतात. जसे, अमेरिका ही प्रकटीकरण 13 मध्ये दिसते, एका कोंकऱ्याच्या स्वरुपात. आणि मग जर तुम्ही जाणू इच्छिता, त्याच्यातील फरक...

तुम्ही म्हणाल, "बरे, तो तर राष्ट्राच्या ताकदीविषयी बोलत आहे."

98 ते एक पवित्र सामर्थ्य ही दर्शविते, एक पशु. म्हणून काय तुम्हाला हे माहित आहे?

99 लक्ष द्या, रिबकेकडे; जेव्हा—जेव्हा अब्राहामाचा सेवक, एलियेजर...जेव्हा तो बकेला—रिबकेला नेण्यासाठी आला ती...त्याने तिला त्या उंटावर बसविले, ज्याला तिनेच पाणी पाजले होते. आणि ती त्या उंटावर स्वार झाली, तिच्या न पाहिलेल्या वरास भेटण्यासाठी. ज्याला तिने पाणी पाजले होते, तीच वस्तू तिला घेऊन भविष्यातील पती व घराकडे नेते.

100 आणि हीच गोष्ट आजही आहे, समजले. ज्याला आज मंडळी पाणी घालत आहे ते बीज आहे, वचनाचे बीज. तेच वचन जीवंत बनून आणि आम्हाला न पाहिलेल्या वराकडे वाहून नेते. समजले? समजले?

101 आणि पाहा किती हुबेहूब. इसहाकाने घर सोडले आहे, आणि तो बाहेर शेतामध्ये आहे, तो घरापासून दूर होता, जेव्हा रिबकेने त्याला पाहीले.

102 आणि मंडळीही ख्रिस्ताला अवकाशात भेटते, आणि मग तो तिला घरी घेऊन जातो, पित्याच्या घरी जेथे राजवाडे तयार आहेत. इसहाक ही रिबकेला तसाच घेऊन जातो.

103 आता, लक्ष द्या, येथे पहिल्या दृष्टीतच प्रेममिलन होते. ओह, बापरे! ती तर त्याला भेटायला धावत गेली.

104 आणि तशाचप्रकारे मंडळीही ख्रिस्ताला भेटेल, अवकाशात, आणि कायम त्याच्याबरोबर राहिल.

105 आता, बायबलमधील संज्ञा, हे पशू सामर्थ्याला दर्शविते. लक्ष द्या, आता माझी इच्छा आहे की तुम्ही लक्ष द्यावे.

106 सैतानाकडे चार बदलणाऱ्या रंगाचे श्वापद होते ज्यांच्यावर स्वार होऊन, तो पुढे निघून जातो. त्याच्याजवळ चार श्वापद होते, आणि त्यांच्यातील तीन श्वापदांनी पांढऱ्या घोड्याने, लाल रंगाच्या घोड्याने आणि काळ्या रंगाच्या घोड्याने, आपआपले रंग एकत्रित करुन, फिकट घोडा बनविला होता. आणि आम्ही हे पाहिले आहे, की त्यांतील प्रत्येक घोडा सेवकाईची अवस्था होती, ही सुरुवातीच्या मंडळीची अवस्था होती जी नायसियामध्ये सांप्रदायिक मंडळी बनली होती. मूळ पेन्टेकॉस्टल मंडळीने ज्याच्यावर पवित्र आत्मा ओतला गेला होता, ख्रिस्तविरोधी आत्म्याचा स्विकार केला. आणि संघटनेची स्थापना केली, आणि तिने काही संघटीत मुलींना जन्म दिला. तिन वेळा आपले सामर्थ्य बदलत गेले आणि ते एकातच टाकले, आणि फिकट घोडा बनला. आणि मग त्याला नाव देण्यात आले मृत्यु आणि तो स्वार होत सार्वकालिकतेत गेला. ही गोष्ट एकदम सरळ आहे जशा असायला हवी! आता, आता लक्ष द्या, त्याला हा—हा घोडा दिला गेला, व तो त्यावर स्वार आहे.

देव परमेश्वराकडे ही प्रत्येक वेळी...

107 आता पाहा, जेव्हा ख्रिस्तविरोधक पहिल्यांदा दिसू लागला, तो कशात दिसत होता? पांढऱ्या घोड्यावर. पाहा, साधा भोळा वाटावा, ते एका सिधान्ताच्या स्वरुपात मंडळीत आला. त्यांना सहभागिता हवी होती. तुमची सहभागिता ही ख्रिस्ताशी आहे. परंतु त्यांना सहभागिता हवी होती. ते ख्रिस्ताबरोबर आपली सहभागिता स्थिर ठेऊ शकले नाहीत, त्यांची इच्छा होती...

108 बरे, तुम्ही जाणता, जसे मंडळीमध्ये समान हितसंबंध असलेल्या लोकांचा गट उठेल. तुम्ही जाणता, पाळक हो. समजले? जसे ते, म्हणतात की "एकाच चारित्र्याची व रस असलेले." परंतु नापसंत असून एकत्रित होऊन वेळ घालविणारे एकाच माळेतील मणी. परंतु जर आम्ही नविन जन्म प्राप्त केलेले बंधुजन, आहोत तर—तर अशाप्रकारची वृत्ती धारण करु नये, पाहा. नाही. आता, आम्ही—आम्ही—आम्ही...

109 जर आम्ही आमच्या बंधुजनात काही चुकीचे पाहतो, तर त्यासाठी प्रार्थना करा आणि देवा पुढे ते ठेवा, आणि त्या मनुष्यावर प्रेम करा जीतपर्यंत आम्ही त्याला देवाच्या उपस्थितीत घेऊन नाही येत. समजले? हाच मार्ग आहे, वास्तविकरित्या हाच एक मार्ग आहे.

110 तुम्ही जाणता, येशूने म्हटले, "तेथे निंदण असेल," कारण येशूने म्हटले आहे असे होईल, "परंतु त्यांना उपटले जाईल." पाहा. "त्यांना एकटे राहू द्या." तो...ते करिल. त्याला विभक्त करु द्या. जेव्हा वेळ येईल. पाहा त्यांना एकत्र वाढू द्या.

111 लक्ष द्या, जसा तो पशु बाहेर गेला, ख्रिस्तविरोधकही त्यावर सामर्थ्याने स्वार होऊन गेला.

112 ओह, मला हे फार आवडते. मी धार्मिक असल्याचे भासण्यास सुरुवात झाली आहे. पाहा. कदाचित उत्तेजनामुळे असेल. लक्ष द्या, जेव्हा ख्रिस्तविरोधक...ओह ती—ती प्रकटीकरणे मिळाली जी त्या टांगलेल्या अग्नीच्या चेंडूच्या उपस्थित असता त्या खोलीत मिळाली...ओह भावा! जरी मी ते पाहिले आहे बालपणापासून, प्रत्येक वेळी ते माझ्याजवळ येत गेले. त्याने मला चेतावणी दिली आहे. तो मला जवळजवळ बेशुध्द अवस्थेत नेतो. तुम्ही कधी त्याचा अनुभव करु शकत नाहीत. ते मला भयभीत करते.

113 आता लक्ष द्या, जसे ख्रिस्तविरोधक आपल्या सेवकाईच्या (चार) पशुवर स्वार होऊन पुढे निघून जातो, तसेच, परमेश्वर आपल्या एका प्राण्याला त्याचा सामना करण्यासाठी पाठवितो. समजले? आता पाहा, प्रत्येक वेळी ख्रिस्तविरोधक आपल्या घोड्यावर (पशुवर स्वार) होऊन त्याची घोषणा करण्याकरिता पुढे निघून जातो. देव ही आपला प्राणी पाठवितो त्यांच्याशी सामना करण्यासाठी तेव्हा तो त्या प्राण्यावर असे.

114 आता, शास्त्रलेख सांगतो, "जेव्हा शत्रू महापुरासारखा येतो, तेव्हा देवाचा आत्मा त्याच्याविरुध्द झेंडा उभारतो."

115 आणि म्हणून जेव्हा शत्रू ख्रिस्तविरोधक म्हणून बाहेर जातो. देवही एक प्रकारचे सामर्थ्य त्याचा मुकाबला करण्यासाठी पाठवितो. आणि मग जेव्हा ते…

116 तो पुन्हा एकदा बाहेर निघून गेला एका वेगळ्या रंगात, लाल रंगाच्या घोडेस्वार, दुसरे सामर्थ्य, अजून एक सेवकाई; देवही त्या मागे अजून एक पाठवितो, त्याचा प्रतिकार करण्यासाठी, की मंडळीला राखावे.

117 पुन्हा, त्याने तिसरा पाठविला, देवाने सुध्दा त्याचा प्राणी पाठविला, तिसरा प्राणी आला आणि घोषणा केली.

118 त्याने चौथा पाठविला; देवाने त्याचा ही चौथा पाठविला. आणि नंतर त्यावेळी ख्रिस्तविरोधकाचा अंत झाला, आणि मंडळी युगेही समाप्त झाली. लक्ष द्या. आता, ओह, हे खरेच चांगले आहे!

119 आता, आम्ही पाहतो की सैतान आपल्या चार—चार वेगवेगळे पशूंवर आला, त्याचा अर्थ कोणत्या शक्तीने ते प्रगट केले गेले…किंवा कोणते सामर्थ्य त्याने जगाला प्रगट केले, आणि कशाप्रकारे त्या फिकट घोड्याचा "मृत्युत" अंत होतो.

120 आता, आपण लक्ष लावू या देवाच्या सामर्थ्याकडे, जे त्या प्राण्यांकडे होते, जे प्रतिकार करण्यासाठी आहेत.

121 देवाचा पहिला प्राणी, जो त्या ख्रिस्तविरोधकाला सामोरे जाण्यास बाहेर निघून जातो, ख्रिस्तविरोधकाचा आत्मा जेव्हा तो फक्त त्याच्या शिकवणुकीत होता. आता आठवण ठेवा, जेव्हा ख्रिस्तविरोधक प्रथम स्वार झाला, तो आपल्या शिकवणुकीच्या पहिल्या सेवेत होता. ख्रिस्तविरोधक स्वार झाला, पहिल्यांदा, तेव्हा तो शिकवणुकीच्या सेवकाईत होता. आता पाहा, कोणी एक त्याला सामोरे जाण्यास जातो. तो सिंह आहे, यहुदा वंशाचा सिंह जो वचन आहे. जेव्हा त्याची खोटी शिकवणुक पुढे येते, वचन त्याला सामोरे येते.

122 ह्याचं कारणामुळे आमच्याकडे इरेनिसय, आणि पॉलीकार्प, आणि—आणि—आणि—आणि ते व्यक्ती होते, त्यांत संत मार्टिनही होता.

123 जेव्हा तो ख्रिस्तविरोधक त्या खोट्या शिकवणुकीद्वारे स्वार झाला, देवानेही आपली शिकवणुक पाठविली, जे वचन, यहुदा वंशाचा सिंह, जो वचन आहे पवित्र आत्म्याच्या रुपात प्रकट झाला. आणि पवित्र आत्मा जो वचन आहे स्वतःला प्रगट करतो!

124 ह्याचं कारणामुळे सुरुवातीच्या मंडळीत आरोग्य मिळे, आणि चमत्कार, आणि दृष्टांत, आणि सामर्थ्य घडत होते, कारण तो जीवंत शब्द, यहुदा वंशाच्या रुपात होता, जो त्याला सामोरे जाण्यासाठी स्वार होता. आमेन! आता तुम्हाला कळले काय? त्याने त्याचे सामर्थ्य पाठविले जो ख्रिस्तविरोधक, देवाने त्याचा पाठविला, जो शब्द. ख्रिस्तविरोधक, खोटी शिकवणुक; याचा प्रतिकार करण्यासाठी! त्याबरोबर खरी शिकवणुक ही चालली. आता, ही तर पहिली होती, आता ही तर पहिली मंडळी होती, जी प्रेषितीय मंडळी होती, जी त्याचा प्रतिकार करण्यासाठी पुढे निघून गेली.

125 आता, ख्रिस्तविरोधकाने त्याचा दुसरा पशु पाठविला, तो लाल घोडा होता, ज्यावर तो स्वार होता...यासाठी की पृथ्वीवरुन शांती (आणि) हरण केली जावी, आणि—आणि लोक लढाई करोत.

126 आता, हा दुसरा त्याचा प्रतिकार करण्यास जातो, जो गोऱ्हा प्राणी होता. बैल म्हणजे श्रम, एक ओझे वाहणारा प्राणी.

127 आणि आता आम्ही एका मिनिटासाठी थांबू शकतो, यासाठी की मी हे तुम्हाला दाखविण्यासाठी निश्चित व्हावे. आता हे असे होऊ शकते की ते तुम्हाला कोड्यात टाकू शकते. परंतु आपण थुवतीरा येथे पाहू. आता दृष्टी लावा आणि पाहा की ही मंडळी एक—एक—एक परिश्रम करणारी आहे की नाही, तुम्ही पाहा.

> *थुवतीरा येथील मंडळीच्या दूताला लिही. ज्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे आहेत आणि ज्याचे पाय सोनपितळेसारखे आहेत, तो देवाचा पुत्र म्हणतो.*
>
> *तुझी कृत्ये मला ठाऊक आहेत...*

128 पाहा, आता सगळी कृत्ये बनली आहेत, पाहा, कारण तेच ते होते जे त्याच्याबरोबर स्वार झाले होते.

> *...आणि तुझी प्रिती, विश्वास, सेवा व धीर* (पाहा, ही फक्त...) *ही मला ठाऊक आहेत आणि तुझी शेवटची कृत्ये* (पुन्हा, दुसऱ्यांदा, "तुझी कृत्ये") *पहिल्या कृत्यांपेक्षा अधिक आहेत.*

129 पाहा, ते हे प्रदर्शित करते की, या थुवतीरा युगात, जेव्हा ख्रिस्तविरोधक जेव्हा निश्चिंत झाला आणि थुवतीरा युगात आला, तेव्हा ही लहान मंडळी काहीच करु शकत नव्हती, परंतु फक्त—फक्त परिश्रम.

130 आणि बैलाविषयी एक अजून गोष्ट आहे, की तो बलिदानाचा प्राणी आहे. समजले? ह्या अंधकाराच्या युगांत या हजार वर्षांमध्ये कॅथलिक तत्वप्रणालीने जगाला आपल्या अधिपत्यात घेतले. आणि ते त्यामध्ये चालत गेले, होय कि नाही, त्यांनी मृत्युची परवा केली नाही. जरी तो मृत्यु का असेना, त्यांना त्याने काही फरक पडला नाही ते गेले आणि मरण पावलेच. का? कारण त्या काळाचा तो आत्माच तसा होता.

131 त्याच कारणांमुळे, त्यामुळेच ईरेनियस, त्यामुळेच पॉलिकार्प, जॉन, पॉल हे महान आणि पराक्रमी पुरुष त्या काळात त्यांचा सामना करण्यासाठी होते.

132 पौलाने हे पाहिले. तो म्हणाला, "मला माहित आहे की मी गेल्यानंतर तुम्हांमध्ये लांडगे शिरतील, बंधुजनच, आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील." तुम्ही त्या शिस्तप्रिय, लहान, वयस्कर प्रेषिताकडे, पाहा, जो तेथे उभा आहे त्याची पाठ तर पुर्णतः फटक्यांची होती, त्याच्या नेत्रांतून अश्रू वाहत होते. परंतु तो त्यांच्यापेक्षा पुढचे पाहू शकत होता...त्या दुर्बीणींतून जी दाखवित होती, ते त्याद्वारे 12 करोड प्रकाशवर्षांच्या पलिकडून पाहू शकत होते. तो सरळ त्या अनंततेत पाहू शकत होता. तेथे त्या स्थितीत तो होता. आणि त्याने त्याची भविष्यवाणी केली होती व म्हटले होते की हे घडेलच. आणि जे त्याने सांगितले होते ते दुसऱ्या युगामध्ये सुध्दा झाले होते. आता याकडे लक्ष द्या, असा तो होता.

133 त्यानंतर, फक्त योहानच असा एक होता जो सर्वाधिक जिवंत राहीला. आणि संत योहान जो पवित्र आत्म्याने अभिषिक्त होता. जेव्हा त्याने ती सर्व पवित्र पत्रे एकत्र जोडण्याचा प्रयत्न केला आणि त्याने ते सर्व एकत्रितरित्या जोडले आणि एक बायबल बनविले, रोमी

साम्राज्याने त्याला पकडून त्याला पात्म नावाच्या बेटावर टाकले. तो तेथे पात्म नावाच्या बेटावर देवाच्या वचनामुळे होता. पोलीकार्प हा त्याला भाषांतरासाठी मदत करीत होता.

134 मी कधी एके दिवशी ते पत्र वाचले होते. जे मरियेने स्वतः पॉलिकार्पला लिहीले होते. आणि वादविवाद...करीत होती, ती त्याच्याशी वादविवाद करीत नव्हती; परंतु त्याची वाखाणणी करीत होती. की तो एक धाडसी पुरुष असून जो येशू ख्रिस्ताची शिकवण शिकविल व स्विकारील. जो तिच्यापासून जन्मला होता, जो देवाचा होता. मरियेचा स्वतःचा हा लेख जो तिने पॉलिकार्पला लिहीला होता.

135 पॉलिकार्पला सिंहाला खाण्यास दिले गेले होते, तुम्हाला हे माहित आहे. नाही त्याला जाळण्यात आले होते. आणि त्यांना त्याच्यासाठी उशीर झाला होता की त्या रिंगणात त्या सिंहापुढे पोलीकार्पला खाण्यासाठी सोडावे. आणि त्यासाठी त्यांनी एक स्नानगृह, जो तेथे जूने स्नानगृह होता, ते तोडून टाकले आणि त्या रिंगणात त्याला ठेवले. आणि—आणि जाळून टाकले.

136 आणि तो परतत, असता रस्त्यावर तो आपली मान खाली घालून चालत होता. एक रोमी शताधिपतीने म्हटले, "तू वयस्कर मनुष्य आहेस, आणि प्रतिष्ठीत आहेस. का बरे तू ह्या गोष्टींचा नकार करीत नाही?"

137 त्याने आपली दृष्टी स्वर्गाकडे लावून निरखू लागला. आणि एक वाणी कुठूनतरी बोलली. ते समजू शकले नाहीत कुठून आवाज आला. म्हणून म्हणाली, "पॉलीकार्प तू भिऊ नकोस. मी तुझ्याबरोबर आहे." हो, का असे झाले? कारण तो त्या वचनावर उभा राहिला होता.

138 आणि जेव्हा त्यांनी त्याला जाळावे, म्हणून त्याच्यावर लाकडांचे ओंडके रचायला सुरुवात केली, तेव्हा स्वर्गिय संगीत खाली उतरुन आले. आणि—आणि कुठेतरी स्वर्गदूतांनी ते स्वर्गिय गीत गाईले. आणि त्याने एकदा देखिल आपले डोळे त्याच्यावर वटारले नाहीत जे त्याच्यावर हसत होते.

139 ते धैर्यवान पुरुष होते. ते असे मनुष्य होते जे वचनासाठी उभे राहू शकत होते. त्या काळांमध्ये रक्तसाक्षी झालेले, यांनी भयंकर पीडा व दुःख भोगले. परंतु ते काय होते? ते प्रेरणेच्या अधिन होते, परमेश्वराचा आत्मा, सामर्थ्यात ते होते. मी...

140 मंडळी, हे विसरु नका. आणि तुम्ही बंधुजन जे टेप ऐकता, माझी इच्छा आहे, की तुम्ही याचे परिक्षण करावे. कोणी व्यक्ती ही कार्ये कसे काय करु शकते हे ज्या कार्यासाठी त्याला परमेश्वराकडून सामर्थ्य प्रदान केले गेले आहे? आता मी ह्या विषयी समजवण्यासाठी या बॉक्सला येथे ठेवून दर्शवित आहे. जर परमेश्वर त्यांच्यामध्ये काही निश्चित आत्मा पाठवितो, त्याचद्वारे ते कार्य करु शकतात, तो आत्मा आहे जो त्यांच्यामध्ये काम करतो. आता आम्ही तुमच्यापुढे सिध्द करतो की मंडळीच्या इतिहासाद्वारे, आणि शिक्क्याच्या फोडण्याद्वारे, आणि ज्या सामर्थ्याने ते फोडले; आणि पाहा, मंडळीने तंतोतंत त्या अभिषेकाला प्रतिक्रीया दिली आणि ते त्याशिवाय काहीही करु शकत नव्हते.

141 आता, आम्ही पाहिले, कि प्रथम प्राणी गर्जला तो सिंह होता, ज्याने ते शुध्द व मिलावट विरहीत वचन दर्शविले.

142 दुसऱ्या युगात, थुवतीरा, बैल होता. आणि तो ओझे वाहणारा...ओझे वाहणारा प्राणी. क्षमा असावी. आणि तो बलिदानाचाही प्राणी होता. आणिही खरेच अगदी बिचारी मंडळी नाही काय? रोम हजार वर्षांच्या अंधार युगात स्थायिक झाले, आणि जे कोणीही रोमन

चर्चच्या गोष्टींचा अंगीकार करत नव्हते, त्यांना लगेच ठार मारण्यात येत होते. त्यांना परिश्रम करावे लागले, एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी जात होते.

143 तुम्ही जे विश्वबंधुत्व संस्थेचे सदस्य, मी तुमचे ध्यान आकर्षित करु इच्छीतो. तुम्हाला त्या क्रुसाच्या चिन्हाची आठवण आहे काय? आता तुम्ही जाणता मी काय म्हणत आहे.

144 आता लक्ष द्या, जर तुम्ही—जर तुम्ही लक्ष द्याल, बायबलला बांधून आणि जपून ठेवीत होते. समजले? आणि त्यांना एकमेकांमध्ये परिश्रम करायला लागत होते. आणि तो बैल होता जो परिश्रम करीत होता. आणि जेव्हा हा समय येतो...आम्ही ते गेल्या रात्री वाचले होते. पाहा, जेव्हा या गोष्टी पुढे गेल्या, तेव्हा ते बलिदान आले आणि त्यांना बलिदानासाठी जावे लागले होते.

तो म्हणाला, "तू द्राक्षारस आणि तेल यांची हानी करु नकोस"

145 त्यांनी का केले होते? ते स्वेच्छेने त्यात चालत गेले आणि मेले. त्यांनी कधीही मृत्युची परवा केले नव्हती, कारण त्या मंडळी युगाचा आत्मा हा परिश्रम आणि बलिदान होणे हा होता. आणि ते त्या काळाचे परमेश्वराच्या खऱ्या आत्म्याने अभिषेक मिळवून जेवढे मोकळेपणाने मरण्यासाठी जाऊ शकत होते ते गेले आणि योध्याप्रमाणे ते मेले आणि बलिदान केले, हजारों हजार वेळा असे झाले आणि त्याच्यामध्ये सहाकोटी ऐंशी लाखाची नोंद ही सापडते.

146 बैल, बलिदान झाले ओह! तुम्ही हे समजला आहात काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] ठीक आहे. ठीक आहे. आता पाहा, बलिदानच त्या काळात परिश्रम करु शकत होता, आणि त्या हजार वर्षांसाठी त्या मोठ्या विरोधकाचा सामना करु शकत असते

147 आता, हा तिसरा पशु जो त्या सैतानातून बाहेर निघाला, तो तो काळा घोडा होता. समजले?

148 आता, तो तिसरा पशु जो बाहेर आला, तेव्हा देवाकडचे सामर्थ्य त्याच्याशी लढण्यास आले, त्या काळ्या घोड्याच्या सामर्थ्याचा सामना करण्यासाठी, तो मनुष्य होता, चलाख, हुशार जो देवाच्या ज्ञानाकडून होता. तुम्ही जाणता की एक मनुष्य जो बुध्दीमान आहे, कोणत्याही प्राण्यापेक्षा. समजले? तो हुशार आहे तो प्राण्यांना ठार मारुन पाडतो. तो चलाख व चतुर आहे. समजले? आणि तो...

149 आता अंधाराच्या युगातून, एक अजून काळ निघत होता– आता या अंधकाराच्या काळाच्या दुसऱ्या बाजूला एक अजून काळ निघून येत होता–जेव्हा तो काळा घोडेस्वार चालला होता, जेव्हा त्यांनी—त्यांनी—त्यांनी—त्यांनी बलिदान आणि जे सर्व काही त्यांनी केले होते त्याबद्दाल पैसा आकारला होता. आणि फक्त पैसा आहे, तुम्ही जाणता की तो कसा होता.

150 आता, जो प्राणी, काळ्या घोड्याशी सामना करण्यासाठी आला, त्याचे तोंड मनुष्यासारखे होते तो तिक्ष्णबुध्दी, हुशार, शिक्षण घेतलेला, चलाख, चांगला आणि त्या युगाच्या आत्म्याने अभिषिक्त असा होता. काय तुम्ही त्यावर लक्ष दिले काय! आता तो परमेश्वराच्या बुध्दीच्या चलाखीने त्याचा सामना करण्यास आला. तो काळ सुधारकांचा काळ होता. ज्यामध्ये मार्टिन लुथर, जॉन वेस्ली आणि अन्यही सुधारक होते. पाहा हे सुधारकांचे युग होते. ज्वींगली, नौक्स, कॅलवीन, आणि अजून सर्व सुधारक त्याचा सामना करण्यासाठी बाहेर निघाले. हे चतुर पणाचे युग होते. आता, तुम्ही पाहा, अंधकाराच्या

युगापासून ते सुधारकांच्या काळापर्यंत, त्या बाजूने पाहा, हे अगदी मनुष्याच्या चतुरपणाचे ते युग होते.

151 काय तुम्ही आपली खिडकी थोडीशी खाली उतरवाल! मी विश्वास करतो की लोकांना एक प्रकारे आत गर्मी होत आहे, जर तुम्ही ती खिडकी थोडीशी खाली ओढाल! कारण, मला समजते, की जर मला येथे उभे राहून प्रचार करतात गर्मी होत आहे तर तुम्हाला तेथे, अधिक जास्त गर्मी होत असणारच.

152 बरे, लक्ष द्या, ती मनुष्याची चतुराई होती. आता, तुम्हाला समजले काय?

153 ज्या तिसऱ्या पशुला सैतानाने पाठविले होते, तो सुध्दा चालाख होता, पाहा, “रुपयाला शेरभर गहू आणि रुपयाला तीन शेर जव.” समजले? बापरे! पाहा? पैसे प्राप्त करण्याची योजना, चतुराई या जगाचे सोने मिळवावे म्हणून आणि धनसंपत्ती जी त्यात आणली गेली. हेच ते होते जे पूर्तता करते. हेच कारण होते की ज्यामुळे त्यांनी प्रार्थनेसाठी पैसे आकारण्यास सुरुवात केली. आणि...एक जागा बनविली ज्याला मृतात्म्याच्या पापक्षालनाचे ठिकाण म्हणतात, आणि त्यांतून त्यांच्या पूर्वजांना प्रार्थनेच्याद्वारे बाहेर काढू या कारणासाठी पैसे आकारले गेले. आणि ओह, लोकांना आपल्या संपत्तीचे आणि सर्वांचे इच्छापत्र करावे लागले होते. चर्च आणि राज्य हे दोन्हीही एक होते आणि चर्च मालमत्ता हडप करीत असे.

154 आणि काय आपण हे पाहत नाही का, की या दिवसांत आताही काही सुवार्तीकांवर तोच अभिषेक आहे जो त्यांच्यावर होता? ते वयस्कर लोकांना त्यांचे निवृत्त वेतन आणि त्याच्या घरांचे लेखी करारनामाद्वारे त्यांना मिळण्यासाठी ते करण्यास भाग पाडत. पाहा, भावांनो मी—मी या यांविषयावर येऊ इच्छित नाही. मी तर फक्त मागे वळून पाहतो यासाठी की मी कुठे जात आहे हे पाहावे. आता लक्ष द्या, जे ते लोक करतात हा तर त्यांचा मामला आहे. तो त्यांचा मामला आहे. त्याचे—त्याचे—त्याचे माझ्याशी काही घेणे–देणे नाहीए. मी तर फक्त यासाठी जे येथे आहे त्यासाठी जबाबदार आहे.

155 आता लक्ष द्या, जो प्राणी त्याच्याशी संघर्ष करण्यासाठी आला होता, तो मनुष्य होता. आम्ही सर्व त्या प्राण्याला ज्याचे तोंड मनुष्यांचे होते, त्या मनुष्याच्या सामर्थ्याला ओळखतो, त्याने आपल्या बुध्दीच्याद्वारे त्या त्या ख्रिस्तप्रकाश वेफरची भाकर जी मार्टिन लुथरच्या हातात होती त्याने ओळखले होते, जेव्हा तो त्या पायऱ्यावर चढत होता...

156 ते म्हणतात, “हे येशू ख्रिस्ताचे रक्त आहे, हे येशू ख्रिस्ताचे शरीर आहे.”

157 आणि लुथरने ते जमिनीवर फेकले होते, आणि म्हटले होते, “ही तर भाकर आणि द्राक्षारस आहे. हे ख्रिस्ताचे शरीर नाहीए, कारण त्याला उंच करण्यात आले आणि तो देवाच्या उजव्या हातावर बसला आणि तो मध्यस्थी करतो.” पाहा, मनुष्य आणि त्याचे ज्ञान.

158 आणि मग जेव्हा जॉन वेस्ली आला, त्यानंतर ज्वींगली आणि कॅलवीन आला.

159 आणि ते चर्चला सुरक्षिततेच्या विषयावरुन ह्या अवस्थेत घेऊन गेले जेथे त्यांना संजीवनाची काही गरज भासली नाही. “जे काही होणार होते ते आता होत राहू दे.” असेच सर्व काही होते. आणि ते त्याच्या मर्जीस येई तसे जीवन व्यतीत करीत होते. लुथरन मंडळी ही फार विकृत अवस्थेत आहे, आणि तशीच ॲगलिकन मंडळी सुध्दा! बापरे! संपूर्ण देश भ्रष्ट झाला होता जसा आज आहे तसाच. मंडळी विकृत झाली होती. जेव्हा राजा हेन्री आवा इंग्लंडमध्ये आला, आणि त्यानंतर जे रक्त बंबाळ मरिया, आणि सर्व काही. जेव्हा या घटना घडल्या होत्या, तेव्हा, मंडळी ही फारच हिंसा आणि भ्रष्टाचाराने

पूर्ण झाली होती. अनेक लोक ख्रिस्तीत्वाचा दावा करित होते, परंतु ते चार किंवा पाच पत्नींबरोबर राहात होते, किंवा ते जे इच्छित होते ते ते करीत होते, आणि अशा प्रकारे अश्लिलता चालली होती.

160 जॉन वेस्ली, वचनाचा अभ्यास करीत होता, आणि वचनावर दृष्टी लावून होता, तेव्हा त्याला हे प्रगट करण्यात आले की येशू ख्रिस्ताचे रक्त विश्वासी व्यक्तीला पवित्र करते. आणि...तेव्हा त्याने काय केले? तो एक अजून सुधारक बाहेर निघून आला, त्याने आपल्या दिवसांत जगाला वाचविले, जसे लुथरने आपल्या समयात जगाला वाचविले होते. समजले? ते काय होते? ते त्या प्राण्याचे सामर्थ्य होते जे बाहेर आले होते.

161 तर मनुष्याला समजण्याचे ज्ञान होते, ज्याने असे सांगितले होते, की ह्या गोष्टी चुकीच्या आहेत. “हे येशू ख्रिस्ताचे रक्त नाहीए, ते येशू ख्रिस्ताचे शरीर नाहीए. ते केवळ शरीराला दर्शवित होते.” समजले?

162 हा कॅथलिक आणि प्रोटेस्टंट यांच्यामध्ये आता देखिल वाद आहे. फक्त हीच एक गोष्ट आहे ज्यावर ते दोघेही एकमत होऊ शकत नाही. त्या परिषदेंमध्ये जी त्याची आहे, ही एक गोष्ट सोडून बाकी सगळ्यात एकमत होऊ शकतात. आता लक्ष द्या, परंतु ते—ते यावर एकमत नाही होऊ शकत [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर तीन वेळा थोपावतात—सम्पा.] पाहा?

163 एक म्हणतो, “ते रक्त आहे आणि ते शब्दश: रक्त आहे, धर्मगुरुला हे सामर्थ्य आहे तो भाकरीचे रुपांतर ख्रिस्ताच्या शरीरात करावे.” तुम्हांला माहीत आहे या चर्चमध्ये त्यांचे छोटेसे साक्रामेन्त वेगळे बनविलेले आहे. हेच कारण आहे की ते चिन्ह बनवितात तुम्ही जाणता की हेच कारण आहे की ते निधर्मी मुर्तीपुजकासारखे पुजा अर्चा करतात, तेव्हा ते त्याचे चिन्ह बनवितात, आणि ते त्यापुढे वाकतात, आणि आपल्या टोपीसुध्दा वाकवितात. ते असे त्या इमारतीसाठी नाही करीत, परंतु ते त्या ख्रिस्तप्रसाद वेफरच्या भाकरीसाठी त्या साक्रामेंतमध्ये ठेवतात. आणि ध्यान द्या, सैतानाने त्यांना धुर्ततेने जखडून ठेवले आहे!

164 परंतु, पाहा, त्यावेळी परमेश्वराने त्या मनुष्य प्राण्यामध्ये मनुष्यावर समजण्याचा आत्मा पाठविला यासाठी की तो समजू शकेल की हे सर्व खोटे आहे. आता, तिसऱ्या पशुचा सामना करण्यासाठी तो होता, ज्याने मंडळीला फार भ्रष्ट केले होते, कारण तो स्वार होता आणि तो भयंकर स्थितीमध्ये होता. ते सुधारक, त्यांनी त्या सुधारकाच्या युगांत काय केले मग? त्यांनी मंडळीला त्या निधर्मी मुर्तीपुजकाच्या विधीतून देवाकडे परत वळविले. समजले? त्यासाठी पशू स्वार निघाला होता. आणि तेथे मनुष्य जो चालाख त्यालाही आपले काम करायचे होते.

165 आता, तिसरे वचन वाचा आणि...एका मिनिटासाठी प्रकटीकरण 3:2 वाचूया, आता मी काही कारणासाठी येथे रेखांकित केलेले आहे. प्रकटीकरण 3:2 लुथरन युगासाठी हे सुधारकांच्या युगाला लागू होते.

166 त्यांनी काय केले होते, ते संघटीत झाले होते. जशी लुथरने त्याच्या चर्चची सुरुवात केली तेव्हा ते संघटीत झाले. हे खरे आहे, तसेच वेस्लीने केले. तेच पेन्टेकॉस्टलने केले. अगदी बरोबर, ते संघटीत झाले. आणि त्यांनी काय केले? त्यांनी तीच प्रणाली घेतली ज्यांतून ते बाहेर आले होते. समजले?

167 आता प्रकटीकरणावर लक्ष द्या, येथे सार्दिस मंडळीबद्दल बोलत आहे. “सार्दिस येथील मंडळीच्या दूताला लिही.” हे पहिले वचन आहे. समजले? ठिक आहे.

*जागृत हो, आणि जे मरणाच्या पंथास लागले आहे ते सावरुन धर.*

168 ते म्हणजे, "जे वचन शिकविण्यात आले", समजले, ज्या गोष्टी शिल्लक राहिल्या आहेत.

*...जे मरणाच्या पंथास लागले आहेत...*

169 ते फिरुन एक संघटनेत रोमन कॅथलिक चर्चसारखेच ज्यांतून ते बाहेर आले होते, त्याची सुरुवात करण्यास तयार झाले होते. समजले?

*...कारण तुझी कृत्ये माझ्या देवाच्या दृष्टीने पूर्ण अशी माझ्या पाहण्यात आली नाही.*

170 अगदी असेच तुमच्याही बरोबर आहे...तो परत निघून जातो. काय तुम्हाला दिसत नाही की का बरे संघटनेची प्रणाली चुकीची आहे? कोणी यांची सुरुवात केली होती? काय परमेश्वराने काय? प्रेषितांनी काय? रोमन कॅथलिक चर्चने याची सुरुवात केली. आता कोणीही ह्याविषयी वेगळ्या गोष्टी बोलो. इतिहासात त्यापेक्षा वेगळे काहीही नाही. ते म्हणतात, की रोमन कॅथलिक चर्च ही माता आहे, आणि ती आहेच. परंतु त्यांनी चर्चला संस्था बनविले आहे आणि त्यासाठी त्यांनी एक प्रणाली, त्याचा प्रमुख मस्तक मनुष्य बनला. आणि आम्ही एका मनुष्याला घेऊन तसे नाही करत, जसे त्यांनी केले होते, आम्ही लोकांची परिषद घेतो आणि त्यांना एकत्रित करतो, आणि मग वास्तविकरित्या तुम्ही गोंधळात पडता. हे खरे आहे. काहीही असो, ती परिषद कशी करु शकते?

171 हे असे आहे, जसे आम्ही विचार करतो की लोकशाही सत्ता ही बरोबर आहे. मी ही विश्वास करतो, परंतु ती कधीच योग्यरितीने काम करु शकत नाही. करुच शकत नाही. जेव्हा रिकी लोकांचा समुह येथे आहे जो चालवू पाहतो, तर कसे बरे तुम्ही जगात चांगले मिळवण्यास जाल? तुम्ही चांगले मिळवू शकणार नाही. लक्ष द्या, खरी गोष्ट तर एक देवाचे भय धरणारा राजा हवा.

172 आता लक्ष द्या त्या प्राण्याकडे, तिसरा प्राणी, ही मनुष्याची चलाखी होती. आणि तो त्या सुधारकांचे चित्र दर्शवितो जे पुढे जातात.

173 ते त्या मुर्तीला घेऊन म्हणतात, "*ही* ती भाकर आहे." [भाऊ ब्रॅन्हम चारवेळा आपल्या हातांनी टाळ्या वाजवितात—सम्पा.] "*हा* द्राक्षारस आहे." [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हातांनी दोन वेळा टाळ्या वाजवतात.] पाहा. ख्रिस्तविरोधकाकडे अजून ही काही आहे जे ख्रिस्तीत्वाचे चिन्ह दर्शवू शकेल. तुम्ही पाहता त्याच्याकडे हे असलेच पाहीजे कारण तो एक "विरोधी" आहे. आणि मग, जर त्याच्याकडे कोणत्या गोष्टीचा विरोध आहे...

174 आता पाहा, जर तो सरळपणे येऊन म्हणतो, "ओह, मी बुध्द आहे." बरे, त्याने काही फरक पडत नाही. ते सर्व तसेच करतात. ते तर सुरुवातीपासूनच विधर्मी मुर्तीपूजक आहेत.

175 परंतु ख्रिस्तविरोधक हा धुर्त आहे. त्याच्याजवळ सर्व प्रकारच्या गोष्टी आहेत ज्या ख्रिस्तीत्वाला दर्शवितात. परंतु ते पूर्णतः विरोधात्मक आहे, ते वचनाच्या मूळ शिकवणुकीविरुध्द, दुसऱ्या बाजूला नेणारा आहे. पाहा, तेच आहेत जे त्याला ख्रिस्तविरोधी बनविते. समजले?

176 म्हणून, सुधारक, तेव्हा त्या प्राण्याच्या स्वरुपात त्याचा सामना करण्यास जातात!

177 आता, तुम्ही हे विसरु नका, तुम्ही हे विसरु नका. [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर चार वेळा थोपवतात—सम्पा.] समजले? तुमच्या आयुष्याच्या चार दिवसात हे लक्षात ठेवा! समजले? हे प्राणी अगदी बरोबर आहेत. हे प्रभू परमेश्वर असे म्हणतो हे आहे. समजले?

लक्षात घ्या, मुर्तीपुजा घेऊन आली...

178 जो मनुष्य प्राणी देवाच्या सामर्थ्याने पुढे गेला, देवाने त्याला जे ज्ञान दिले त्याद्वारे त्याने मंडळीला मुर्तीपूजेतून बाहेर काढले व देवाकडे आणले. परंतु...

179 आम्हाला असे आढळते की त्याच मंडळी युगात जेव्हा त्यांनी सांप्रदायिक मंडळी बनविण्यास सुरुवात केली, तेव्हा त्यांनीही अगदी तेच काम केले जे सुरुवातीस रोमने केले होते; आणि आता तो त्या मंडळीच्या मुली बनविण्यास जात आहे. आणि ती काय म्हणते?

180 त्याने सांगितले, "आता तू आहेस...मी तुला पूर्ण असे पाहिले नाही! आणि तुला सामर्थ्यवान झाले पाहीजे ते सामर्थ्य जे शिल्लक राहीले आहे." आता प्रकटीकरण 3:3 मध्ये त्यांना चेतावणी देतो ती ऐका. आम्ही पाहूया बरे मला वाटते ते वचन मला काही मिनिटांपूर्वी मिळाले होते.

> *म्हणून तू कसे स्विकारले व ऐकले ह्याची आठवण कर. ते जतन करुन ठेव व पश्चाताप कर.*

181 दुसऱ्या शब्दांत त्याने सांगितले, "लक्षात ठेव की तू या प्रकारच्या भ्रष्टतेतून बाहेर निघून आला आहेस." समजले? आणि येथे पाहा.

> *...कारण तू जागृत झाला नाहीस तर मी चोरासारखा येईन* (ओह) *मी कोणत्या घटकेस तुझ्यावर चालून येईन हे तुला मुळीच कळणार नाही.*

182 त्याही पुढे, तो समयीला त्याच्या ठिकाणावरुन हटविण्यासाठी येतो, पाहा, म्हणून तेच ते होते. ती समयी काय आहे? मंडळीसाठी प्रकाश.

183 आणि ती त्या विधर्मी मुर्तीपुजकाच्या अंधकारमय संघटनेच्या प्रणालीमध्ये वर परत निघून गेली ज्यांतून ती बाहेर निघून आली होती. आणि ती आजही त्यामध्ये आहे. आणि ते प्रामाणिक हृदयी लोक हे विचार करीत आहेत की हे सत्य आहे. परंतु ती सुध्दा कॅथलिक मंडळीसारखीच आहे. आणि प्रोटेस्टंट लोक कॅथलिकांवर हसतात, जेव्हा त्यांच्यातलेच प्रत्येक सहातला एक आणि अर्धे डजन दुसऱ्यातले वचनाप्रमाणे ते सर्व सारखेच आहेत. मनुष्याचे ज्ञान!

184 आता लक्ष द्या, मला हे फार आवडते! आता तो त्यांना चेतावणी देताना ऐकणे मला आवडते. आता, आता आम्ही...तुम्ही...सर्वजण पूर्णतः सहमत आहात? आता, जर नसाल तर मला प्रश्न लिहा. ते प्राणी प्रत्येक युगात तंतोतंत ओळखण्यात आले, जसे येथे बायबलमध्ये ते ओळखण्यात आले आहेत. अगदी तेच काय ते त्यांनी केले. इतिहास दर्शवितो की त्यांनी काय केले. आम्ही येथे त्यांविषयावर पाहिले आहे आणि पाहिले आहे की त्यांनी काय केले.

185 आणि, येथे ते प्राणी आहेत. मी—मी—मी हे प्रथम जाणत नव्हतो. मी तर तेथे बसलो होतो. जसे तुम्ही मला आता पाहता तशाच हालचालीत मी ते पाहू शकतो. समजले? आणि त्याला तर ठीक व्हायला हवे होते कारण ते बायबलशी जुळते म्हणून तुम्ही त्याला सत्य सांगण्याव्यतिरिक्त आणि काही कसे सांगाल?

186 लक्ष द्या, आता, चौथा प्राणी जो अंतिम प्राणी त्या ख्रिस्तविरोधकाला सामोरे जाण्यास पुढे जातो. तुम्ही तयार आहात काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] तो शेवटचा प्राणी किंवा ते शेवटचे सामर्थ्य जे ख्रिस्तविरोधकाचे जे परमेश्वराच्या शिक्षणाविरुध्द आहे त्याचा सामना करण्यासाठी पाठविला होता तो तर गरुड होता. समजले? तो चौथा जिवंत प्राणी हा गरुड होता. आता, तुम्ही युगांचा अभ्यास करा, शास्त्रलेखाचा अभ्यास करा. तो गरुडच आहे! आणि बायबलमध्ये सापडते की शेवटचे युग हे गरुड आहे. आणि परमेश्वर आपल्या संदेष्ट्याकरिता गरुडासारखा आहे.

समजले? आता पाहा, शेवटचे युग गरुडाचे युग, एक—एक सत्य वचनाला प्रगट करणारा काळ. समजले?

187 परमेश्वर कोणतेही कार्य करण्यापूर्वी, तो गरुड पाठवितो जसे त्याने ते नोहाच्या दिवसांत केले होते. जेव्हा त्याने इस्त्राएलांना बाहेर काढले, आणि फारोचे सैनिक जाण्यास तयार होते तेव्हा त्याने गरुड पाठविला. प्रत्येकवेळी, त्याने शेवटच्यावेळी, प्रत्येक वेळेला गरुड पाठविला आहे.

188 आणि येथे परत त्याने आपला गरुड पाठविला आहे. ही गोष्ट वचनाशी तंतोतंत जुळते. म्हणून तुम्ही त्याला दुसरे काहीतरी कसे बनवाल? तो आपला गरुड पाठवितो. (का?) सत्य प्रगट करणाऱ्याला पाठवितो जे सर्व युगांत घसरत गेले होते.

189 म्हणून कसे बरे तो बैल, किंवा तो मनुष्य, किंवा—किंवा जो पशु स्वार होता, हे जगाला कसे प्रगट होऊ शकेल, जितपर्यंत गरुड नाही येत? आणि त्या प्राण्यांचे आपापले स्थान होते ते देवभक्त होते, ते प्राणी परमेश्वराकडून पाठविलेले होते आणि ते तसेच होते जसे कोणीही असू शकतो.

190 सिंह हा मूळ प्राणी होता. तेथेच तो ख्रिस्तविरोधक सामना करण्यासाठी येतो.

191 मग त्याने अजून एक सामर्थ्याचा उदय केला, परमेश्वराने दुसरेही सामर्थ्य सामना करण्यास पाठविले.

192 मग त्याने एक अजून सामर्थ्य उभारलं आणि परमेश्वराने त्या सामर्थ्याचा सामना करण्यासाठी आपले एक अजून सामर्थ्य पाठविले.

193 आणि मग शेवटी परमेश्वर आपल्या अंतिम सामर्थ्याच्या रुपात गरुडाला खाली घेऊन येतो. यासाठी की "पुत्रांना मुळ विश्वासाकडे, पित्यांच्या मूळ विश्वासाकडे वळवावे." गरुडाचे युग! तुम्ही लक्ष द्या की त्यानंतर अजून कोणीही प्राणी पाठविलेला नाही. परमेश्वराकडून पाठविलेला तोच शेवटचा आहे. तोच अंत आहे. आता, जर तुम्ही प्रकटीकरण 10:1–7 वचने घ्याल. मी त्याचा उल्लेख मागे केलेला आहे. लक्षात ठेवा. शेवटच्या दूताच्या युगात काय होणार होते? परमेश्वराचे संपूर्ण रहस्य हे प्रगट होईल. "गरुड" आमेन!

194 आता तुम्ही त्या चार पशुचे स्वार पाहिले. ते संपूर्णतः बरोबर आहे. काय तुम्ही त्याचा विश्वास करता? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा] आणि येथे आता प्रत्येक युग आणि प्रत्येक सामर्थ्य जे त्या मागे स्वार झाले होते. आणि त्याविषयी शास्त्रलेख आहे जो दाखवितो की त्या शत्रूच्या स्वाराने काय केले? ते या शिक्क्यांत प्रगट झाली आहेत. आणि आता हे सुध्दा प्रगट झाले आहे की प्रत्येक प्राणी, सामर्थ्य जे देवाने पाठविले त्याने त्यावर गरुडाच्या समयापर्यंत त्या बिंदुवर आक्रमण केले. आता पाहा, जर हा अंताचा समय आहे जेव्हा एक गरुड येईल. हे खरे आहे. आता हे लक्षात ठेवा.

195 आता पाहा, ज्या दिवसात सिंह मूळ वचनात आला होता. त्यावेळी जवळजवळ शंभरपैकी एकानेच सिंहाचे ऐकले होते.

196 त्या दिवसात जेव्हा बैल आला होता. त्यांतील फक्त थोड्याशा लोकांनी बैलाचा संदेश ऐकला होता.

197 त्या दिवसांत जेव्हा मनुष्य आला, तेव्हा त्याने मनुष्यांमध्ये एक काम केले होते, आणि तुम्ही जाणता की तो खूप चालाख होता. त्याने एका लहान समुदायाला बाहेर काढून आणले होते.

198 आणि त्यांनी काय केले होते? सैतानाने त्याला पाहिले होते, म्हणून त्याने त्यांना पुन्हा परत पाठविले आणि त्यांचा त्याच्यात विवाह केला.

199 आणि लक्षात ठेवा, जेव्हा शेवटी गरुड आला तर शंभरमधील एक टक्काच त्याचे ऐकतील. हे गरुडाचे युग आहे. तुम्ही त्या सर्व दुसऱ्या स्वारांना स्मरणात ठेवा. आणि येथपर्यंत की येशूने सुध्दा भविष्यवाणी केली होती की, "जर त्याने आपल्या येण्याचे दिवस कमी केले नसते, तर कोणीही देह रॅपचरसाठी वाचला नसता." ...?...शास्त्रलेख असे म्हणतो ना? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] तुम्ही पाहा, आम्ही कुठे आहोत, भावा बहिणींनो तुम्ही नाही पाहत की आपण कुठे आहोत? ["आमेन."] पाहा, की आम्ही कुठे आहोत.

200 देवा, मी फार आनंदीत आहे, मला—मला—मला नाही माहीत की काय करावे! असे नाहीए की फक्त येथे उभे राहून बोलत आहे. मी सुध्दा येथे तुम्हा लोकांसारखा आहे. मी सुध्दा तुमच्यामध्ये आहे. पाहा, तो मी तुम्हामध्ये आहे. पाहा, मी आहे. माझे एक कुटूंब आहे. माझे भाऊ बहिण आहेत ज्याच्यावर मी प्रेम करतो. आणि स्वर्गिय परमेश्वर खाली येऊन आणि—आणि या गोष्टी आपल्या वचनाद्वारे आणि दृष्टांताने तीस वर्षांपासून प्रगट करीत आला आहेत. आणि त्याने हे सिध्द केले आहे की हे सत्य आहे. आम्ही या स्थितीत आहोत. आम्ही...आम्ही येऊन पोहचलो आहोत. बस हेच आहे. वैज्ञानिक संशोधनाने ते सिध्द करुन दाखविले आहे. वचनाच्या प्रकटीकरणाने ते सिध्द केले आहे. आणि आम्ही येथे आहोत. आणि हे प्रकटीकरण देवापासून येते, आणि ते सत्य आहे!

201 काय तुम्ही या गोष्टी समजल्या काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] मी थोडा आश्चर्यचकित झालो की काय तुम्ही त्याला समजले आहात काय? पाहा? होय, महाशय! मग मला रविवारी तुम्हाला ते सांगण्याची गरज पडणार नाही. लक्ष द्या, लक्ष द्या, किती आश्चर्यजनक! आता तुम्ही लक्ष द्या.

202 आणि मग वेळेनुसार जेव्हा परमेश्वर पृथ्वीवर महापूराच्या अगोदर वाचविणारा होता तेव्हा त्याने एक गरुड पाठविला.

आणि ज्यावेळी तो इस्त्राएल मुक्त करणार होता. त्याने एक गरुड पाठविला.

203 काय तुम्ही त्याचा विश्वास करता, की पात्म बेटावर, योहानावर जेव्हा एक अशी वेळ येते जेव्हा तो या संदेशाचा जो एवढा पूर्ण होता की तो विश्वास करु शकत नव्हता, कारण तो त्याला एका स्वर्गदूताद्वारे दिला जात होता, तुम्हाला माहीत आहे? स्वर्गदूत हा संदेशवाहक आहे. परंतु तुम्ही जाणता काय की एक संदेशवाहक हा संदेष्टा होता? तुम्ही त्यावर विश्वास करता काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] आपण ते सिध्द करुन पाहुया. प्रकटीकरण 22, पाहूया की तो गरुड आहे. होय. पाहा, तो...तो होता खात्रीशिरपणे तो एक स्वर्गदूत, तो एक संदेशवाहक आहे, परंतु तो एक संदेष्टा होता, ज्याने हे संपूर्ण प्रकटीकरणाचे पुस्तक त्याला प्रगट केले होते.

204 प्रकटीकरण, 22 अध्याय आणि 19वे वचन, मला वाटते हे बरोबर आहे काय मी ते तेथे लिहीलेले आहे...22:19, माझे कदाचित चुकीचे असेल. [कोणीतरी म्हणाला, "ते 22:9 असेल"—सम्पा.] 22:9 होय, तेच ते आहे. मी 22:9 मध्ये पाहत होतो. हे बरोबर आहे. ओह, होय, येथेच.

*परंतु तो मला म्हणाला, असे करु नको, मी तुझ्या सोबतीचा, तुझे बंधु संदेष्टे...*

205 पाहा, योहानाने येथे काय पाहीले.

*...मी योहानाने ह्या गोष्टी पाहील्या आणि त्याविषयी ऐकले.*

206 आता तो येथे बंद करताना. हा शेवटचा अध्याय आहे.

*...आणि...हे ऐकणारा व पाहणारा मी योहान आहे. जेव्हा मी ऐकले व पाहिले तेव्हा हे मला दाखविणाऱ्या देवदूताला नमन करण्यासाठी मी त्याच्या पाया पडलो.*

207 आणि "तो," मग, "दूत," समजले.

*मग तो मला म्हणाला, असे करु नको...*

208 कोणत्याही खऱ्या संदेष्ट्याची उपासना केली जाऊ नये, किंवा कोणत्याही प्रकारच्या संदेशवाहकाची, समजले. ती फक्त देवाला एकट्यालाच मिळावी.

*परंतु तो मला म्हणाला, असे करु नको, मी तुझ्या सोबतीचा, तुझे बंधु संदेष्टे व ह्या पुस्तकांतील वचने पाळणारे लोक ह्यांच्या सोबतीचा दास आहे. नमन देवाला कर.*

209 पाहा? आता, ते पुस्तक फार महत्त्वाचे आहे, कारण ते देवाचे वचन आहे. आता पाहा, आणि जेव्हा देवाचे वचन हे पुढे आणले गेले, ते संदेष्ट्याद्वारे आणले गेले पाहिजे, कारण तोच तो आहे ज्याच्याजवळ देवाचे वचन येते.

210 मी यावर प्रश्न अपेक्षित आहे जो तुम्ही या बॉक्समध्ये टाकावा. तुम्ही जाणता मला वाटते मी फक्त त्यावर थोडा विचार करीन. मी फक्त असा विचार केला होता की यामध्ये या विषयी काही प्रश्न असेल. मला—मला असे वाटले की त्या बॉक्समध्ये मला काही प्रश्न सापडेल. समजले?

211 परमेश्वराचे हर एक वचन आणले जाते. बायबल या पध्दतीला कधीच बदलत नाही. ते कायम असेच राहीले आहे. ते संदेष्ट्याकडे यावयास हवे, तेच आम्ही यावे अशी अपेक्षा करीत आहो, आता लक्ष द्या. प्रकटीकरण 10:1,7.

212 आता आपण 9वे वचन पुन्हा वाचूया. आता आम्हाला मिळाले. आता, आम्ही... आम्ही...त्या वचनाकडे जाण्याअगोदर, मला तुम्हाला काही विचारण्यास वाटते.

213 शिक्के आम्ही सोडून जाण्याअगोदर, काय तुम्ही ह्याविषयी पूर्णपणे समजला आहात? आता लक्षात ठेवा, गरुडानंतर आणि कोणते सामर्थ्य येत नाही. प्रत्येकवेळी ख्रिस्तविरोधक जेव्हा कधी काही गोष्टी पाठवितो, तेव्हा परमेश्वर त्याचा सामना करण्यासाठी एक सामर्थ्य पाठवितो. मग तो अजूनही सामर्थ्य पाठवितो. तेव्हा परमेश्वर त्याचा सामना करण्यासाठी अजून काही पाठवितो. समजले? आणि मग जेव्हा तो गरुडापर्यंत येतो, जे त्याचे वचन होते. तो शेवटी अगदी तसाच होता जसा तो आरंभी होता.

214 आता पाहा. काय. हा एक संदेष्टा नाही आहे ज्याच्या येण्याची आम्ही वाट पाहत आहोत कोणी मनुष्य ज्याच्या—ज्याच्यावर अभिषेक आहे. एलियाच्या आत्म्यासारखा अभिषेक आहे? तो एलिया नसणार परंतु तो पुरुष जो येईल त्याच्यासारखा असेल. आणि जो पुरुष पाठविला जाईल त्याची हीच सेवकाई असेल, की तो ह्या सांप्रदायिक मंडळ्याच्या गोंधळाद्वारे विश्वासांतून पडलेल्या लोकांना परत पित्याच्या मूळ विश्वासाकडे वळविल. आता, जर तो बायबलला सुयोग्यरितीने क्रमवार नाही करीत तर मला—मला नाही माहीत की तो काय करतो. मी—मी—मी त्याच्याविषयी याहून अधिक असे काहीही सांगू शकत नाही, कारण त्याविषयी तर एवढेच आहे. हे सत्य आहे. तुम्ही फक्त या. त्यामध्ये तुम्ही काहीही घेऊ शकता आणि त्याला ओढू-ताणू शकता. समजले? म्हणूनच त्याला तर त्याच पध्दतीने असले पाहिजे.

215 आता लक्ष द्या, आता 9व्या वचनात “वेदीखालील आत्मे.” आता, येथे जेथे मला पुष्कळ असहमती मिळणार आहे या गोष्टींवर. परंतु तुम्ही जरा एका मिनिटासाठी पाहा. आणि फक्त...समजले? मलाही तसेच वाटले होते, परंतु ते यारितीने आले नव्हते. मी कायम याविषयी विचार केला होता. की वेदीखालील हे आत्मे सुरुवातीच्या मंडळीतील रक्त साक्षी झालेले असावेत. आणि मी याविषयी निश्चित आहे की डॉ. अरिया स्मिथ आणि त्यांच्यातील सर्वजण असेच सांगतात. समजले? परंतु मी सुध्दा तसाच विचार केला होता. परंतु जेव्हा पवित्र आत्म्याने मला यावर दृष्टांत दाखविला तेव्हा हे तसे नाही– ते ते प्राण नव्हते.

आता, आता तुम्ही म्हणता, “बरे, ठीक आहे, मी याविषयी काही जाणत नाही.”

216 बरे, आता, एक मिनिटात, आम्ही हे पाहू. पाहा, हे वधू म्हटलेल्या मंडळीचे जीव नाहीत. आम्ही विचार केला होता की हे वधुरुपी मंडळी, ते प्राण जे वेदीखाली प्रतिक्षा करीत होते आणि मोठ्या शब्दात ओरडत होते, “हे प्रभू अजून किती वेळ?” मी ते परत वाचू इच्छितो, आता, यासाठी की आम्ही ते बरोबररित्या पाहू.

*त्याने पाचवा शिक्का फोडला तेव्हा मी वेदीखाली आत्मे पाहिले, ते आत्मे देवाच्या वचनामुळे व त्यांनी जी साक्ष दिली होती तिच्यामुळे जिवे मारलेल्या लोकांचे होते.*

217 पाहा, “देवाच्या वचनामुळे, आणि जी साक्ष त्यांनी दिली होती.” आता, तुम्ही आपल्या जागेवरुन हालू नका—नका. फक्त एका मिनिटासाठी येथे पाहा.

*ते मोठ्याने ओरडून म्हणाले...हे स्वामी...तू पवित्र व सत्य आहेस, तू कोठपर्यंत?...*(पाहा?)*...न्यायनिवाडा करणार नाहीस आणि पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांपासून आमच्या रक्ताचा सूड घेणार नाहीस?*

*तेव्हा त्या प्रत्येकास एक एक शुभ्र झगा देण्यात आला आणि त्यांस असे सांगण्यात आले की, तुमच्या सोबतीचे दास व—व...तुमचे बंधु तुम्हासारखे जीवे मारले जाणार, त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत तुम्ही आणखी थोडावेळ विश्रांती घ्या.*

218 आणि आता आपण लक्ष द्या, तर तुम्हाला कळेल की ज्या समयी हा पाचवा शिक्का उघडतो त्यावेळी वधुरुपी मंडळी गेलेली असते. शेवटी ते प्राण जे वेदीखाली आहेत, ते प्रारंभी मंडळीच्या रक्त साक्षीचे प्राण नाही होऊ शकत.

219 आता, कृपा करुन लक्ष द्या, कारण हा एक मोठा विवाद...विवाद आहे, म्हणून माझी इच्छा आहे की तुम्ही लक्षपुर्वक ऐकावे. आणि तुमच्याकडे लिहीण्यासाठी पाने आणि पेन्सिल घ्या. आता, मी इच्छितो की तुम्ही यावर लक्ष द्यावे.

220 आता, आता ते प्राण नाही होऊ शकत. कारण, मंडळी अर्थात वधुचे, नितीमान व रक्तसाक्षी प्राण पाचव्या शिक्क्याच्या उघडण्याच्या अगोदरच ती उचलली गेलेली असते, म्हणून हे ते प्राण नाहीयेत जे वेदीच्या खाली आहेत. ते तर वधुबरोबर गौरवात असतील. आता पाहा, ते तर प्रकटीकरणाच्या चौथ्या अध्यायातच ते रॅपचरमध्ये घेतले जातात. त्यानंतर प्रकटीकरणाच्या चौथ्या अध्यायांतच वरती उचलले गेले होते.

221 आता, मग ते जीव कोण आहेत? पुढे हीच गोष्ट येते की जर ते सुरुवातीच्या मंडळीतील नाहीत. तर ते कोण आहेत? हे इस्त्राएल आहेत जे राष्ट्राच्या स्वरुपात वाचले जातात, ते सर्व पहिल्यापासूनच पूर्वनियोजीत आहेत. ते इस्त्राएल आहेत. तेच इस्त्राएली आहेत.

222 तुम्ही म्हणाल, “ओह, जरा एक मिनिट थांबा. ते इस्त्राएली नाही होऊ शकत.” ओह, खरेच, ते उध्दार पावलेले आहेत.

223 येथे, एक मिनिटातच ते ठरवू. माझ्याकडे चार ते पाच शास्त्रलेख आहेत. मी एक घेतो. रोमकरांस पत्र पाहूया, आणि शोधूया की ते आहेत का...रोमकरांस पत्र हे पुस्तक घेऊ या, आणि त्याच्या 11व्या अध्यायाकडे जाऊया आणि आम्हाला सापडेल. आपण ते वाचूया, आणि मग आम्ही स्वतः ह्याविषयी जाणून घेऊ. रोमकरांस पत्र 11वा अध्याय, 25 आणि 26 वचन आता पौल काय म्हणतो ते ऐका.

224 आणि पौल म्हणतो, “जर कोणी दूत का असेना, जर त्यांनी दुसरे शुभवर्तमान प्रचार केले,” (काय?) “तर तो शापभ्रष्ट असो.” दृष्टी लावा.

> *बंधुजनहो, तुम्ही आपणाला शहाणे समजू नये म्हणून ह्या रहस्याविषयी तुम्ही अजाण असावे अशी माझी इच्छा नाही* (तेच ते आहेत) *ते रहस्य हे की, परराष्ट्रीयांचा भरणा आत येईपर्यंत इस्त्राएल लोक अंशतः कोडगे झालेले आहेत.*

225 शेवटची परराष्ट्रीय वधू ही वधू म्हणून आत आणली जाईल, इस्त्राएलाला आंधळेपण त्या कारणाने आले आहे.

> *ह्या रितीने सर्व इस्त्राएल लोकांचे तारण होईल, शास्त्रांत असे लिहीलेले आहे. मुक्त करणारा सीयोनांतून येईल, तो याकोबापासून अभक्ती दूर करील.*

226 ठीक आहे! आता, ते इस्त्राएली आहे, जे त्या वेदीखाली आहेत. ध्यान द्या, इस्त्राएल हे आंधळे करण्यात आले यामागे उद्देश की आम्ही वाचले जावे. तुम्ही विश्वास करता काय? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] आता, त्यांना कोणी आंधळे केले? देवाने. त्याच्या स्वतःच्या मुलांना आंधळे केले.

227 ह्यामध्ये काही आश्चर्य नाहीये, की येशू, क्रुसाजवळ उभा होता, आणि ते यहुदी त्याच्या रक्तासाठी मोठ्यामोठ्याने ओरड करीत होते. ते त्याचे स्वतःची मुले होते. आणि तो वचन होता. तो स्वत: वचन होता. आणि येथे, तो हे जाणून होता की त्या लोकांनी त्याला आनंदाने ग्रहण केले असते. आणि त्याच कारणामुळे त्याने त्यांना आंधळे केले होते; म्हणून ते त्याला ओळखू शकले नाहीत. तो अशा लीन प्रकारे आला आणि त्याने त्यांना आंधळे केले, यासाठी की त्यांनी त्याचा स्विकार करु नये. समजले? शास्त्रलेखात म्हटले होते, ते असेच करतील. आणि त्याने त्यांना आंधळे केले. आंधळे केले होते! येशूला त्यांची फारच करुणा वाटली, जसे त्याने म्हटले, “पित्या, त्यांना क्षमा कर, ते काय करीत आहेत ते त्यांना माहीत नाही.” समजले? ते आंधळे होते. पौल म्हणाला ते आमच्या कारणांसाठी आंधळे केले गेले.

228 लक्ष द्या, आता माझी इच्छा आहे की तुम्ही हे लक्षपुर्वक पाहावे, “त्यांना झगे देण्यात आले.” त्यांच्याकडे ते नव्हते. त्यांना ते देण्यात आले, पांढरे झगे, त्या प्रत्येकांना देण्यात आले. आता, संतजनांना ते आता आहेच, यापूर्वी आहे, त्यांना तो आता मिळतो. परंतु, तेथे “त्यांना झगे देण्यात येतात” आणि संताकडे त्यांचे आहेत, आणि ते निघूनही गेले. समजले? समजले? परंतु त्यांच्याकडे नव्हते...

229 पाहा, त्याच्याकडे काही शक्यता नव्हती. कारण ते देवाकडून आंधळे करण्यात आले; त्यांच्या स्वतःच्या पित्याकडून; यासाठी की देवाची कृपा पूर्ण होऊ शकेल; अशा प्रकारे परराष्ट्रीयांतून वधू घेऊ शकेल. हे खरे आहे ना? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

230 मला तुम्हाला येथे योसेफामध्ये एक खुपच सुंदर प्रतिक दाखवू द्या. योसेफ एक आत्मिक व्यक्ति, एक गरुड होता. तो आपल्या भावांच्यामध्ये उत्पन्न झालेला जशी की एक खरी मंडळी दुसऱ्यांमध्ये उत्पन्न होते. आणि तो स्वप्नांचा अर्थ सांगू शकत होता. तसेच दृष्टांतही पाहत होता. आणि ते सगळे त्याचा द्वेष करीत असत. परंतु त्याचे वडील त्याच्यावर प्रेम करीत होते.

231 लक्ष द्या. नंतर त्याला बाहेर केले गेले, त्याला त्याच्या वडिलांनी नाहीतर. त्याच्या भावांनी बाहेर केले होते, आणि त्याला चांदीच्या जवळजवळ तीस नाण्याला विकले होते. त्यांनी त्याला विहिरीत टाकले होते, आणि मेला असे ते समजले होते.

232 त्याला वरती काढण्यात आले, आणि फारोच्या उजवीकडे तो बसविण्यात आला. आणि या कारणांमुळे त्याला त्याच्याच भावांनी बाहेर काढून टाकले होते. त्याला आपल्या लोकांतून नाही, परंतु एक परराष्ट्रीय वधु दिली गेली. आणि तेथे त्याद्वारे एफ्राईम आणि मनश्शे हे जन्म पावले, जे इस्त्राएलाला जोडले गेले.

233 जसे इस्त्राएलाने आपले हाथ विरुध्द दिशेत, करुन त्यांना आशीर्वादीत केले होते, आणि असे करुन आशिर्वाद जेष्ठाकडून, कनिष्ठाकडे देण्यास आला. समजले? त्याने आपले हात क्रॉस करुन लहान मुलावर ठेवला, ज्याचा अर्थ असा होतो की एक लहान मंडळी येणार आहे. “आई म्हटलेली मंडळी सुर्यामध्ये उभे आहे; आणि त्या बाळाला जन्म दिला होता.” आता लक्ष द्या, त्याला प्राप्त करण्याच्या उद्देशाने इस्त्राएलाने आपले हात क्रॉस केले होते, आणि ते दर्शक होते. आणि योसेफ...

त्या मुलांना, परराष्ट्रीय आई होती.

234 इस्त्राएली वधू, जी रुढीप्रिय इस्त्राएलांतून त्यावेळी, इस्त्राएलाचे हात क्रॉस करुन परमेश्वराचा आशिर्वाद पवित्र आत्मा, ख्रिस्ती लोकांकडे दिला गेला. त्याने म्हटले होते, “देवाने माझे हात क्रॉस केले.” त्याला त्याजशी काही कर्तव्य नव्हते.

235 लक्ष द्या. की जेव्हा योसेफाला त्याच्या स्वतःच्या भावांनी, आपल्या लोकांतून नाकारले होते, तेव्हा त्याने एक परराष्ट्रीय वधू घेतली होती. तसेच तंतोतंत येशूने ही केले यहुद्यांकडून नाकारला गेला, आणि त्याने परराष्ट्रीय वधु घेतली.

236 आता आम्ही येथे काही वाचूया. मी येथे प्रेषितांची कृत्ये पुस्तकातून 15व्या अध्यायातून एक लेख लिहीलेला आहे. आणि ओह, हा वचनाचा लेख त्याच प्रकारचा ओह जो आम्ही कसेही करुन शिकविला पाहिजे. आता, मला असे वाटते की मला अधिकार आहे, प्रेषित कृत्ये 15:14 वाचावा. ठीक आहे. मला आशा आहे की हे आता योग्य आहे. ठीक आहे. “शिमोनाने सांगितले होते की कसा परमेश्वर नाही...” 13व्या वचनापासून सुरुवात करुया.

*मग त्याचे भाषण संपल्यावर याकोब म्हणाला...*

237 आता तुम्ही पाहा, काय घडले होते, ते परराष्ट्रीयांत गेले होते. समजले? आणि गडबड गोंधळ चालला होता कारण ते यहुदी होते? समजले?

*मग त्याचे भाषण संपल्यावर याकोब म्हणाला; बंधुजनहो माझे ऐका.*

*परराष्ट्रीयांतून आपल्या नावाकरिता काही लोक काढून घ्यावे म्हणून देवाने त्यांची भेट कशी घेतली, हे शिमोनाने* (तो शिमोन पेत्र) *सांगितले आहे. आणि*

238 हा! पाहा, माझ्या बायकोचे नाव ब्रॉय होते. जेव्हा मी तिला घेतले, ती ब्रॅन्हम झाली. समजले?

239 येशू आपली मंडळी बाहेर काढतो, किंवा त्याची वधू परराष्ट्रीयांतून बाहेर काढतो. हे शास्त्रवचन आहे, दर्शकाच्या स्वरुपात, जसा योसेफ होता.

240 आता लक्ष द्या याकडे, आता, जे जीव वेदीखाली होते. ठीक आहे..."हे जीव" "जे वेदीखाली होते." समजत आहात, का बरे ते हुतात्मे झाले पापी मनुष्यांकडून जसा आईशमॅन. समजले? ते करोडो यहुदी त्यावरच स्थिर राहीले होते, ते यहुदीच बनून राहीले होते.

241 आता, लक्षात असू द्या, ते काय आहे? "ते देवाच्या वचनासाठी ठार मारण्यात आले," ख्रिस्ताकरिता ते साक्षी नव्हते. तुम्हाला हे समजले काय?

242 परंतु तुम्ही हे लक्षात ठेवा की मंडळीसुध्दा आत आली आहे. मंडळीचे देखिल हुतात्मे जे परमेश्वराचे वचन आणि येशू ख्रिस्ताच्या साक्षीसाठी रक्त साक्षी झाले येथे उपस्थित लोकांतून किती लोकांविषयी माहीत आहे...[मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] ओह, ठीक आहे.

243 आता पाहा, की त्यांच्याकडे येशू ख्रिस्ताची साक्ष नव्हती.

> *...ते आत्मे देवाच्या वचनांमुळे व त्यांनी जी साक्ष दिली होती, तिच्यामुळे जीवे मारलेल्या लोकांचे होते.*

244 ते यहुदी आहेत! आणि हिटलरने त्यांचा द्वेष केला, तसेच आईशमॅनने देखील केला, तसेच स्टॅलिनने देखिल केला. आणि जगातल्या बाकीच्यांनीही. समजले? परंतु ते त्यावर निष्ठावंत राहिले की ते काय विश्वास करीत होते. आणि त्यांनी त्यांना ठार मारले कारण ते यहुदी होते.

245 काय तुम्हाला माहीत आहे की मार्टिन लुथरकडे सुध्दा अशीच कल्पना होती? हे सत्य आहे. त्याने म्हटले होते, "सर्व यहुदी बाहेर काढले पाहिजेत, ते ख्रिस्त विरोधक आहेत." समजले? परंतु तो तर एका वेगळ्या कालखंडात होता, आणि तो पाहू शकला नाही, वचन पाहू शकला नाही.

246 आता वचनाची सत्यता पुढे येते. तुम्ही इस्त्राएलला कसे कायम आंधळे ठेऊ शकता? नाहीच ठेऊ शकत. नाही.

247 ओह, कसा तो संदेष्टा तेथे त्या दिवशी उभा राहून म्हणाला, "इस्त्राएल, तू एकश्रृंगी घोड्याप्रमाणे दिसतोस"? जेव्हा ते हे दाखविण्याचा प्रयत्न करीत होते जो सर्वात वाईट भाग होता. तो म्हणाला, "का," तो म्हणाला होता, "जो कोणी तुला आशिर्वाद देईल ते आशीर्वादीत होईल आणि जो कोणी तुला शाप देईल तो शापीत होईल." हे खरे आहे. ओह, माणसा! तू हे कसे करशील?

248 एक वेळी जेव्हा संदेष्ट्याने यहुदी लोकांसाठी अंधारमय गोष्टी येताना पाहिली होती, तेव्हा त्यांनी विचार केला होता की परमेश्वर त्यांना विसरलेला आहे. तो व्यक्ती तेथे उभा राहीला होता, आणि परमेश्वराचे वचन त्याच्यावर ओतले जात होते, तेव्हा त्याने म्हटले होते, "ओह प्रभू, का तू आपल्या लोकांना सोडून देशील काय?"

परमेश्वर म्हणाला, "तेथे तुझ्याजवळ काय पडलेले आहे?"

त्याने म्हटले, "एक मापनसूत्र काठी आहे."

249 तो म्हणाला, "ती आकाशापर्यंत किती उंच आहे? मोजमाप कर." ओह. "समुद्र किती खोल आहे?"

तो म्हणाला, "मला ते नाही मोजवत."

250 तो म्हणाला, "मला ही ते करता येणार नाही, इस्त्राएलला मी कधीच विसरणार नाही." नाही, महाशय. तो कधीच तिला विसरणार नाही.

251 त्याला आपल्या स्वतःच्या मुलाला आंधळे करावे लागले. आता, तुम्ही याविषयी विचार करा. त्याने आम्हाला एक संधी दिली, ह्यासाठी आपल्याच स्वतःच्या मुलाला आंधळं केले. आणि आम्ही त्यालाही नाकारतो. आता, काय आपल्याला त्याविषयी कमीपणाचा विचार नाही येत, जसे दहा गॅलन वजनी टोप लावून त्या कॉक्रीटच्या खाली तेथे रांगत जावे, आणि त्याला कधीही स्पर्श न करावा. तुम्ही जाणता तसे करणे खूप सुक्ष्म होईल. बापरे! होय.

252 "ते परमेश्वराच्या वचनासाठी पकडले गेले होते." ते यहुदी होते. त्यांचे स्वतःचे नियम होते, ते त्यावर बनून राहीले. आता, तुम्ही आठवण करा, समजले? ते त्यावर स्थिर होते. आणि ते यहुदी होते आणि त्यांना नियम होते. आणि ते नियम देवाचे वचन होते, आणि ते त्यावर स्थिर होते. हे खरे आहे. "आणि त्यांनी जी साक्ष राखली त्यामुळे त्यांना शहीद व्हावे लागले." आणि येथे जीव वेदीखाली आहेत, जेव्हा मंडळीवर निघून गेलेली असते.

253 आता पाहा. त्यांनी तर त्यांच्या आंधळेपणात, त्याच्या मसिहाला रक्तसाक्षी केले, आणि आता ते कापणी करीत आहेत. त्यांना त्याची जाणीव झाली आहे. तो निघून गेल्यावर, त्यांना ते कळून चुकले. त्यांनी त्याला मग पाहिले, जेव्हा ते देवाच्या वेदीकडे आले. परंतु आता देवाची कृपा त्यांच्यासाठी आहे.

254 पाहा. आता, ते कोणत्याही रितीने संतजन नाही येत, कारण त्यांच्याकडे सुरुवातीपासूनच झगे आहेत. परंतु येथे जे ते लोक आहेत, "ते वेदीच्या खाली जाणारे जीव, जे परमेश्वराच्या वचनामुळे त्यांनी साक्ष दिली होती त्यामुळे मारले गेले होते," ते परमेश्वराचे लोक असल्यामुळे, यहुदी असल्यामुळे

255 परंतु आता, पाहा, देवाची कृपा त्यांच्याकडे आली. आणि येशूने त्यांना प्रत्येकाला पांढरा शुभ्र झगा दिला (बापरे, पाहा, मंडळी निघून गेल्यानंतर) कारण ते आपल्या कार्यांशी निष्ठावंत राहिले. आणि ते आंधळे करण्यात आले, आणि त्यांना माहीत ही नाही. त्यांना माहीतही नव्हते. ते केवळ आपली भूमिका बजावत होते जी देवाने त्यांच्यासाठी तो असावा असे नेमले होते. आणि येथे, येथे योहान पाहतो की जीव वेदीखाली आहेत. आता पाहा, तो ते जीव पाहतो. पाहा, तो त्यांना काय पुकारतो.

ते म्हणतात, "कोठवर प्रभू?"

पाहा, आणखी थोडा वेळ. समजले?

256 जसे जसे आम्ही, त्याचा खालपर्यंत अभ्यास करु आम्ही ह्या शास्त्रभागांतून पाहूया आता. त्यांना ह्याची जाणीव झाली की त्यांनी त्यांच्या मसिहाला ठार मारले. समजले? आणि ते त्यांना समजलेच नाही, परंतु मग त्यांना ते जाणवले. त्यांना—त्यांना आपल्या त्या वाईट करण्याबद्दल त्यांना मरावे लागले. आणि पाहा, त्यांच्याकडे काय कार्य करण्यासाठी होते! पाहा. ते खूनाचे दोषी होते, त्यामुळे त्यांचाही खून करण्यात आला होता. पाहा? ते ओरडले की, "त्याचे रक्त आमच्यावर पडो." समजले? हे खरे आहे. आणि ते आंधळे करण्यात आले होते.

257 आता, जर त्यांना आंधळे केले गेले नसते; परमेश्वराने म्हटले, "त्यांना एकटेच राहू द्या. ते योग्य नाहीत." परंतु त्यांना परमेश्वराकडून आंधळे केल्यामुळे, त्याची कृपा त्यांच्यापर्यंत पोहचली आमेन! त्या अद्भूत कृपेविषयी बोला! आणि त्यांच्यातील

प्रत्येकजणाला एक झगा द्या. कारण पूर्ण इस्त्राएल वाचविले जाईल! प्रत्येकजणाने त्याचे नाव लिहीले आहे. ते बरोबर आहे. येशूने त्यांना झगे दिले.

258 जसे योसेफाने त्याच्या भावाशी केले; एक प्रतिछाया. पाहा, जेव्हा योसेफ तेथे उभा राहतो, आणि जेव्हा तो शेवटी...तो तेथे त्याची ओळख वेदीद्वारे, त्याची स्वतःची वेदी, त्याच्या राजवाड्यात, त्याच्या राजासनाजवळ देतो. तो म्हणाला, "सर्वांनी मला एकटे सोडावे." त्याची पत्नी महालात होती; जेथे वधू असेल.

259 आणि तो त्यांना म्हणाला, तो म्हणाला, "तुम्ही मला ओळखले नाही काय?" तो आता इब्री बोलत होता. "मी तुमचा भाऊ, योसेफ आहे." ओह, माझ्या देवा!

ते म्हणाले, "आता, तु आम्हाला बंदी करणार."

260 तो म्हणाला, "एक मिनीट थांबा. एक मिनीट थांबा. देवाने हे उद्देशाने केले आहे. तुम्हाला मला टाकण्यास लाविले, ह्यासाठी तुमचे प्राण वाचवावे." महिमा! तुम्ही अगदी बरोबर आहात. म्हणाला, तुम्ही संताप करुन घेऊ नका. स्मरण करा, योसेफाने तसे म्हटले? म्हणाला, "तुम्ही संताप करुन घेऊ नका. आता सर्वकाही चांगले आहे. हे समाप्त झाले आहे. देवाने मला येथे तुमच्यापुढे पाठविले आहे."

261 तुम्हाला माहीत आहे, बायबल सांगते जेव्हा ते त्याला येताना पाहतील ते त्याला म्हणतील, "म्हणतील, आम्हाला ठाऊक आहे की, तु मसीहा आहेस. परंतु, परंतु, त्या जखमांच्या व्रणाचे काय?" समजले?

262 त्याने म्हटले, "ओह, मला ते माझ्या मित्राच्या घरी मिळाले." मित्रांनो?

263 आणि तेव्हा जेव्हा त्यांना ते कळले, तेच शेष उरले आहेत, एक लक्ष चव्वेचाळीस हजार, बायबल म्हणते की ते वेगळे होतील, दूसऱ्या घरांतून एका घराकडे वेगळे होतील. आणि ते कित्येक रडतील, आणि विलाप करतील, आणि जमिनीवर वर खाली करु लागले; म्हणाले, "आम्ही ते कसे केले? आम्ही ते कसे केले? आम्ही आमच्या स्वत:च्या मसीहाला का वधस्तंभावर खिळले." बायबल सांगते, ते असे रडतील जसे एकूलत्या एका पुत्रासाठी रडतील; "आम्ही ते कसे केले?"

264 ते यहूदी ते—ते जगातली सर्वात धार्मिक लोक आहेत, देवाचे निवडलेले आहेत. परंतु त्याने आपल्याला घेण्यासाठी त्यांना आंधळे केले, आणि आम्ही त्याला नाकारले. परराष्ट्रीय मंडळीचा न्याय काय आहे! तेथे तुम्ही आहात. समजले? देवाद्वारे त्यांना उद्देशाने आंधळे करण्यात आले, ह्यासाठी की तो आपल्याला येशूची वधू म्हणून घेऊ शकेल त्यांना बाहेर काढील...समजले? आणि त्याचे पूर्व– चित्र आणि सर्व काही केले.

265 आता तुम्हाला समजले ते जीव कोण आहेत? ते शहीद संतजन नाहीत. ते ह्या समयी गेले आहेत ते बरोबर आहे. लक्ष द्या, ते तर गेले आहेत. समजले?

266 म्हणून, ह्यातील प्रत्येक जणाला श्वेत झगा देण्यात आला. आणि आता मी इच्छितो की तुम्ही लक्ष द्यावे. परंतु आता देवाची कृपा त्यांच्यावर ओतली आहे. येशू त्या प्रत्येकांना श्वेत झगा देतो. जसा योसेफाने त्याची कृपा त्याच्या भावांना दिली.

267 आता लक्ष द्या. जरी त्यांनी योसेफापासून सुटका करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्याची कृपा त्यांच्यापर्यंत पोहचली समजले? "ओह, ते सर्व ठीक आहे. ते सर्व बरोबर आहे. तुम्हाला तसे करायचे नव्हते. परंतु, पाहा, ते परमेश्वर करीत होता. समजले? देवाने तुम्हाला ते सर्व करु दिले ह्यासाठी तो मला बाहेर काढू शकेल आणि मला येथे खाली घेऊन आला. ह्यासाठी मी लोकांचे, ह्या परराष्ट्रीयांचे, जेथून मी माझी पत्नी आणली आहे. त्यांचे प्राण वाचवावे. मला पत्नी मिळाली नसती जर—जर मी तेथेच राहिलो असतो.

आता मी माझ्या पत्नीवर प्रेम करतो. तिने मला येथेही लेकरे दिली आहेत." आणि म्हणाला, "मी—मी...आणि आता—आता मी तुम्हा सर्वांना घेण्यासाठी येत आहे तुम्हा सर्वांना चांगले ते मिळणार आहे. मी तुम्हाला येथे खाली आणण्यास येत आहे. आपण सर्व एक मोठ्या परिवारासारखे राहू." पाहिले? समजले? त्याने म्हटले, "एक गोष्ट मला तुम्हांस विचारायची आहे. माझा म्हातारा बाप अजून जीवंत आहे काय?" आहे!

268 आणि त्याच्याकडे पाहा, लहान बन्यामीनासह काय केले, जे एक लक्ष चव्वेचाळीस हजार जणांची प्रतिछाया होता? जसे आपण ते नंतर पाहू. पाहा त्याने काय केले? तो त्वरीत बन्यामिनाकडे गेला, त्याच्या गळ्यात गळा घालून रडू लागला. त्याचा लहान भाऊ ज्याचा कुटूंबात जन्म तो गेल्यानंतर त्याच्या आईद्वारे झाला होता, पहिली मंडळी, रुढीप्रिय कट्टर मंडळी. एक लक्ष चव्वेचाळीस हजार यहूदी त्याच्या अनुपस्थित जन्माला आले होते, जेव्हा तो त्याची परराष्ट्रीय वधू आणण्यासाठी दूर गेला होता. ओह, माझ्या देवा! हे तुमच्या आत काहीतरी करीत नाही. तेथे ते आहे. म्हणून तुम्ही पाहा ते कोण आहेत?

269 आता लक्ष द्या, जरी त्यांनी योसेफापासून सुटका करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याची कृपा त्यांच्यापर्यंत पोहचली.

270 जरी त्यांनी येशूपासून सुटका करण्याचा प्रयत्न केला, तरीही तो त्यांच्याकडे आला (कारण ते आंधळे झाले होते) आणि प्रत्येकजणांना त्यांना पांढरा झगा दिला. तो त्यांना कसेही करुन घरी घेऊन जाणार. त्याने काहीही फरक पडत नाही, कारण त्याने म्हटले आहे, "मी त्या सर्वांना कसेही करुन वाचवीन." समजले?

आता वचन 10, लक्ष द्या, त्यांनी "सुडासाठी" सांगितले. समजले?

271 आता, जर ती वधू असती, तर ती स्तेफनासारखी असती. "पित्या, त्यांना क्षमा कर," तुम्हाला माहीत आहे. समजले?

272 परंतु ते यहूदी आहेत जे आत आले आहेत. ते "सूड" मागतात. पुन्हा लक्ष द्या, पाहा, पुन्हा तो म्हणाला. लक्ष द्या...तो म्हणाला, "हे तुझे भाऊ आहेत" यहुदी आहेत... आता त्यांना सूड हवा आहे. ते म्हणाले, "ओह, आम्ही घेणार आहोत...आमची इच्छा आहे की तू आमचा सूड घे."

273 त्याने म्हटले, "फक्त थोडा वेळ, आता फक्त थोडा वेळ." मला येथे हे वाचू द्या, तुम्ही लक्ष द्या. हे 10 वे वचन आहे. ठीक आहे.

> *ते मोठ्याने ओरडून म्हणाले, हे स्वामी' तू पवित्र व सत्य आहेस तू कोठपर्यंत न्यायनिवाडा करणार नाहीस आणि पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांपासून आमच्या रक्ताचा सूड घेणार नाहीस?*
>
> *आणि तेव्हा त्या प्रत्येकास एकएक शुभ्र झगा देण्यात आला आणि त्यांस असे सांगण्यात आले की त्यांनी आणखी...थोडा वेळ विश्रांती घ्यावी समजले,* (काय?) *थोडा वेळ, तुमच्या सोबतीचे दास...*

274 समजले? आता हे काय आहे? संदेष्टे आता इस्त्राएलला प्रचार करीत आहे. समजले?

> *...तुमच्या सोबतीचे दास...तुमच्या सोबतीचे दास...तुमच्या सोबतीचे दास आणि तुमचे बंधू तुम्हासारखे जीवे मारले जाणार...*

275 पाहा, जे त्यासाठी पूर्वीच नेमले आहेत. तुम्हाला समजले?

> *...तुम्हांसारखे जीवे मारले जाणार, त्यांची संख्या पूर्ण होईपर्यंत.*

276 पाहा, दुसऱ्या शब्दात, ते त्याकरिता पूर्वीच नेमले होते. हे शास्त्रलेख आहेत की त्यांना हे करावे लागले. "आणि आणखी थोडा वेळ विश्रांती घ्या. आता तुम्हाला तुमचे झगे मिळाले आहेत; तुम्ही घरी जात आहात, आणि फक्त थोडा वेळ तेथे बसा, पाहा, आणखी थोडा वेळ. थांबा."

277 आता, लक्ष द्या. आता लक्ष द्या, "तुमचे भाऊ." "तुमच्या भावांचा वध अजून बाकी आहे." ज्याचा अर्थ एक लक्ष चव्वेचाळीस हजार महासंकटामध्ये बोलावले जाणार आहेत. एक लक्ष चव्वेचाळीस हजार बोलावले जाणार आहेत.

278 कदाचित आमच्याकडे समय असता. आपणाला हे कदाचित उद्या रात्री मिळेल, जर प्रभूची इच्छा असेल, तर आपण...दूसऱ्या शिक्क्यांकडे जाण्याअगोदर, समजले?

279 आता, तुम्ही ह्यावरही लक्ष द्या, ते ख्रिस्तविरोधका द्वारे शहीद होणार आहेत. आपण ह्याचे अध्ययन केले; आणि त्याच्या शेवटच्या स्वारीकडे लक्ष द्या, जेथे तो यहुद्याबरोबरचा करार मोडतो—मोडतो. आणि तेथे ती जाते. समजले?

280 हे यहुदी, एक लक्ष आणि चव्वेचाळीस हजार, प्रकटीकरणाच्या दोन साक्षीदाराद्वारे बोलावले जातील. आता, तुम्ही लक्षात ठेवा, ते संदेश देतील.

281 तुम्ही ते वाचले आहे. किती जणांनी ते वाचले आहे? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] निश्चितच आम्ही सर्व त्या वचनाच्या वाचनाद्वारे परिचीत आहोत.

282 आणि, ते भविष्यवाणी करतील, हे दोन साक्षीदार दानीएलाचा सत्तर आठवड्याच्या अर्धसप्तकात भविष्यवाणी करितील. ते अंतिम साडेतीन वर्ष आहेत.

283 स्मरण करा. आपण दानिएलाच्या सत्तर सप्तकांचा कसा अभ्यास केला? आणि मी म्हणालो होतो जेव्हा आपण शिक्क्यांचा अभ्यास करु. मला ठाऊक नाही का, परंतु मला वाटले...कोणीतरी सांगितले आपल्याला त्याची आवश्यकता भासेल, आणि येथे आपण. ती होय. समजले?

284 दानिएलाच्या समयाकडे लक्ष द्या. आता स्मरण करा, दानिएलाला हे सांगण्यात आले होते की, "मसीहा येईल," "राजकुमार," किंबहुना "मसीहा," आणि, "तो भविष्यवाणी करील. इस्त्राएलाकडे सत्तर सप्तके बाकी आहेत. आणि सत्तराव्या सप्तकाच्या मध्यात, मसीहा वधला जाईल आणि नित्य अर्पण बंद होईल." हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] "परंतु तेथे अजूनही साडेतीन सप्तके बाकी आहेत."

ह्या काळात, तो परराष्ट्रीय वधुला घेईल.

285 आता, ती वर जाते. आणि जेव्हा वधू जाते, दोन संदेष्टे इस्त्राएलकडे उदयास येतील. समजले?

286 आणि ते प्राण जे शहीद झाले आहेत, आता, तेथे असतील खरे, शुध्द यहुदी, ज्यांची नावे त्या पुस्तकात लिहीलेली आहेत, जे योग्य जीवन जगले आहेत आणि योग्य गोष्ट केली आहे, त्यांनी बिलकुल यहुदी मतानुसार जीवन व्यतीत केले आहे. ते आईशमन आणि इतर पुष्कळांद्वारे शहीद झाले होते. त्यांच्यातील दहा लाख प्रामाणिक लोकांना, तेथे जर्मन लोकांनी बंदूकीने मारले, आणि त्यांची हत्या केली, आणि त्यांना जीवे मारले आणि त्यांना कुंपणावर टांगले, आणि त्यांना जाळले, आणि त्यांची राख केली, आणि इतर सर्वगोष्टी केल्या. त्या उदासिन, किंवा क्रुर, भुकेलेला हिटलर, आणि स्टॅलिन, आणि मुसोलिनी आणि त्या सर्व लोकांनी यहुद्यांचा द्वेष केला!

287 मला वाटते, की ह्या देशाला ज्याने एकत्र—एकत्र ठेवलेले आहे, त्यांतील हे एक कारण आहे, कारण त्यांनी सदैव यहूद्यांचा आदर केला आहे, ते बरोबर आहे, त्यांना आश्रय दिला आहे. तुम्ही यहुद्यांचा सन्मान करा, आणि देव तुमचा सन्मान करील.

288 आता, तेथे यहुद्यांचा एक समुह होता जे विश्वासघातकी होते, जसे परराष्ट्रीय आहेत.

289 परंतु खरा यहुदी, परमेश्वराने त्याचे नाव जगाच्या स्थापनेअगोदर पुस्तकात लिहीलेले आहे. आणि येथे तो त्या समयी मारला गेला. आणि स्मरण करा, त्याविषयी आता विचार करा, हे किती परिपूर्ण आहे. त्यानंतर दशलक्ष यहुदी, निर्दोष लोकांना ह्या समयात जगातील राष्ट्रांद्वारे कापले गेले, येथे बायबल सांगते, ह्या समयी, ते प्रत्येकजण वेदीखाली आहेत, त्यांना कळले की काय घडले आहे, आणि त्यांना शुभ्र झगे देण्यात आले.

290 ते म्हणाले, “अच्छा, का? काय आपण परत ह्यावेळी राज्यात परत जाऊ शकतो?” तुम्हाला माहीत आहे, यहुदी राज्य पृथ्वीवर स्थापले जाणार आहे. योहानाने म्हटले की तेथे ते राज्य होते, पाहा. जे राज्य स्थापित होणार आहे.

आता, हे राज्य सुवार्तेचे आहे, तुम्हाला समजले.

291 परंतु यहुद्यांच्या राज्याचा प्रचार ह्या—ह्या दोन संदेष्ट्याद्वारे होईल, म्हणून येथे पृथ्वीवरील राज्याकडे लक्ष द्या.

292 “स्वर्गाच्या राज्याचा प्रचार झाला आहे.” ...यहुद्यांद्वारे...मला म्हणायचे आहे, “परराष्ट्रीयांसाठी.”

293 येथे पृथ्वीवर देवाचे राज्य हजार वर्षाच्या काळात स्थापित होणार आहे, मग त्याच्या हजार वर्षाचा काळ यहुदीयाचा होणार.

294 आता लक्ष द्या. आता येथे लक्ष द्या, पाहा जेव्हा ते—पाहा जेव्हा ते प्रचार करीत आहे.

295 ह्या—ह्या संदेष्ट्यांचा दृश्यात उदय होण्याआधी, यहूदी ज्यांना आइशमन आणि इतरांच्या अधीपत्याखाली मरावे लागले होते आणि त्यांच्यातील प्रत्येक जणाला अगाऊच नेमलेले होते, त्यांना शुभ्र झगा देण्यात आला (कृपेद्वारे) त्यांच्यातील प्रत्येक जणाला शुभ्र झगा देण्यात आला. लक्ष द्या.

आता काय घडते? जसे हे घडले...

296 मी मागील घड्याळाकडे पाहत आहे, आणि मला ठाऊक आहे, आपल्याला उशीर होत आहे. परंतु माझी इच्छा नाही की...पाहा, मी—मी...तेथे उभे असलेल्या बिचाऱ्या लोकांना पाहात आहे. भावांनो, परमेश्वर तुमचे सहाय्य करो. माझी आशा आहे की तुम्हा प्रत्येक जणाला त्या दिवशी शुभ्र झगा देण्यात येईल. तुम्ही जे तेथे उभे राहून मागे-पुढे होत आहे. पायांना कष्ट देत आहेत. आणि तुमच्यातील काही जणांनी संपूर्ण दिवस काम केले आहे. मला ठाऊक आहे ते काय आहे. आणि येथे पाहा...काही बिचाऱ्या नाजूक वृध्द स्त्रीया तेथे उभ्या आहे. मी पाहिले की काही ह्या पुरुषांनी त्यांच्या जागा त्या स्त्रीयांना दिल्या; आणि इतर काही जणांनी त्या बिचाऱ्या आईंना ज्या बाळाबरोबर आहेत. आणि मी—मी—मी—मी ते सर्व पाहीले आहे, पाहा, आणि मला खात्री आहे की तो हे पाहातो.लक्ष द्या. परंतु मी तुम्हाला खूप वेळ थांबवू इच्छित नाही. जर मी तुम्हाला हा संदेश समजवू शकलो, तेच सर्व मी करु इच्छितो, पाहा.

297 आता ह्या यहुद्यांकडे लक्ष द्या. मला हे करावे लागेल, ह्यासाठी तुम्हाला ह्या शिक्यांचे प्रकटीकरण समजावे; पाहा, ते काय आहेत, वेदीखालील आत्मे; आणि ते कोण आहेत. आता लक्ष द्या.

298 आता दानीएलाच्या समयी, सत्तराव्या आठवड्याच्या अर्धसप्तकास. आता लक्षात ठेवा, “मसीहा मध्यात छेदला जाणार होता.” तो मध्य आहे. बरे, सातचे अर्धे किती? [मंडळी म्हणते, “साडेतीन वर्षे”—सम्पा.] साडेतीन वर्षे ख्रिस्ताने किती वेळ प्रचार केला? [“साडेतीन वर्षे.”] ते बरोबर आहे. आता, “परंतु त्या लोकांसाठी ते अजून ठरवायचे आहे.” (काय?) “दूसरे साडेतीन वर्षे.”

299 आता, ह्या समयामध्ये काय घडते ते पाहा, सात मंडळ्याच्या युगामधील परराष्ट्रीय वधू निवडली जाते, आणि वर घेतली जाते.

300 आणि जेव्हा ह्या सर्व यहुदी त्यांच्या अंधत्वामुळे जे शहीद झाले होते हे अशाप्रकारे केले. ते वेदीखाली ते आहेत, देव तेथे येतो आणि म्हणतो, “तुम्ही पाहिले ते काय होते? आता मी तुम्हाला प्रत्येकाला एक शुभ्र झगा देतो.”

ते म्हणतात, “किती वेळ, प्रभू? आता आम्ही त्यात जाणार आहोत का?”

301 म्हटले, “नाही, नाही, नाही, नाही. तुमच्या सोबतीचे दास यहूदी, आणखी थोडा वेळ सहन करावे लागेल. ते शहीद होतील जसे तुम्ही शहीद झाले होते. ते श्वापद जेव्हा त्याचा करार मोडते, तो त्यांचा वध करील.”

302 आता लक्ष द्या. आणि आता एकदा लक्ष द्या…आता लक्षात ठेवा, हे संदेष्टे प्रकटीकरण 11 प्रमाणे भविष्यवाणी करणार आहेत. तुम्ही, तुम्ही तुमचे हात वर करा; ज्यांनी ते वाचले होते. समजले? आणि त्यांना अधिकार देण्यात आला.

303 आणि जर प्रभूची इच्छा असली तर आपण पाहणार आहेत, की ते कोण आहेत, एक मिनीट थांबा. आता लक्ष द्या हे संदेष्टे कोण आहेत. आणि आता बायबल येथे त्याविषयी सांगते. निश्चितच तो ह्याविषयी सांगतो. निश्चितच! समजले?

304 आता, लक्ष द्या. ह्या साडेतीन सप्तकाच्यामध्ये पाहा, ते भविष्यवाणी करीत आहेत आणि प्रकटीकरणात येथे सांगितले आहे की…आणि ते—ते एक हजार दोनशे साठ दिवस संदेश देतील. जर…

305 आता साधारण यहूदी कॅलेंडर, देवाचा कॅलेंडरचा साधारण काळ, एका महिन्यात तीस दिवस. रोमी कॅलेंडर मिश्र आहे. नियमीत कॅलेंडरमध्ये एक महिना तीस दिवसांचा असतो.

306 आता, जर तुम्ही तीस दिवस घेतले, आणि त्यात साडे तीन वर्षांनी गुणाकार केला, आणि पाहा तीस दिवस आणि ठीक आहे, तुम्हाला किती मिळतात. एक हजार तीनशे आणि…किंवा दोनशे साठ दिवस. “एक हजार दोनशे (साठ दिवस),” बरोबर साडे तीन वर्षे.

307 आता, तुम्ही पाहा, त्या संदर्भात काहीच चुक नाही. हे एक—एक दुसऱ्याशी बिलकुल ठीक असे जोडलेले आहे ते एकत्रित होत आहे. सारखे एकत्र जोडलेले आहेत. पाहा, ते दोन संदेष्टे यहुद्यांना साडेतीन वर्षे संदेश देतात. त्यामध्ये एक लक्ष चव्वेचाळीस हजार बोलावले जातील.

308 आणि ह्यानंतर, तुम्ही लक्ष द्या की हे दोन संदेष्टे निश्चित मोशे आणि एलिया आहेत. पाहिले? समजले? आता…त्यांच्या सेवकाईकडे पाहा. आता पाहा हे संदेष्टे काय करतात. “त्यांना अधिकार आहेत की ते त्यांच्याप्रमाणे पृथ्वीवर पीडा पाठवू शकतात.” ते कोणी

केले होते? मोशेने “त्यांना बंद करण्याचा अधिकार आहे; आणि त्यांच्या सेवकाईच्या दिवसात पाऊस पडणार नाही.” कोणी साडेतीन वर्षांसाठी आकाश बंद केले होते? [मंडळी म्हणते, “एलिया”—सम्पा.] तेथे ते आहेत. पाहा...

309 पाहा, एक मनुष्य, जेव्हा तो मरतो, तो त्याची स्थिती बदलत नाही तो त्याचा मुखवटा बदलत नाही. पाहा, जेव्हा—जेव्हा अगोदर...

310 जेव्हा शौल पतित झाला, आणि तेथे देशामध्ये कोणी संदेष्टे नव्हते, तो समजू शकत नव्हता की काय करावे—की काय करावे. तो त्याच्या विरुध्द होता. तो युध्द करण्यास जात होता. तो एन्दोरच्या भूतविद्याप्रविण स्त्रीकडे गेला.

311 आता, फक्त बैलांचे आणि बकऱ्यांचे रक्त होते, ती हे करु शकत होती. आणि तीने शमुवेलाच्या आत्म्याला बोलावले.

312 आणि जेव्हा शमुवेल वर आला, तो तेथे त्याचा संदेष्ट्याचा झगा घालून उभा होता. तितकेच नाही, परंतु अजूनही एक संदेष्टाच होता. तो म्हणाला, “तू मला वर बोलावून माझ्या शांतीचा भंग का केला,” पाहा, त्याने म्हटले, “परमेश्वर तुझा त्याग करुन तुझा शत्रू झाला आहे?” त्याने म्हटले, “उद्या रात्री ह्या वेळेपर्यंत तुझा युध्दात पराभव होणार आहे. आणि ह्या समयी, उद्या रात्री, तू माझ्याबरोबर असशील” आणि अगदी तेच घडले. समजले? केवळ आताच नाही...तो अजूनही एक संदेष्टा होता. समजले?

313 आणि हे दोन पुरुष अजूनही संदेष्टे आहेत. जर प्रभूची इच्छा असेल तर काही मिनीटात, आपण ह्यामध्ये खोलवर पाहणार आहोत. समजले?

314 ओह, माझ्या देवा, मी त्या वचनावर किती प्रेम करितो! ह्यात आश्चर्य नाही. “मनुष्य केवळ भाकरीने जगणार नाही. प्रत्येक वचन जे परमेश्वराच्या मुखांतून निघते!”

315 हे दोन संदेष्टे, त्यांच्या कार्यपध्दती नुसार ज्यांची पुन्हा पुनरावृत्ती होणार आहे, ते मोशे व एलीया आहे. ती त्यांची सेवकाई सदैव राहिली आहे. आता लक्ष द्या. बिलकुल असेच त्यांनी केले होते. त्याने त्यांना बदलले नाही. लक्षात ठेवा, हे पुरुष कधीच मेले नाहीत. तुम्ही जर एक मिनिटासाठी लक्ष द्या.

316 आता आपण दुसरीकडे जाण्याअगोदर, गोंधळू नका, तुम्ही एलीयाच्या पाचव्या सेवकाईत त्याच्या चौथ्या सेवकाईमध्ये गोंधळ करु नका. मी तुम्हाला सांगत आलो, परराष्ट्रीय मंडळी एलीयाची वाट पाहत आहे. बरोबर आहे.

317 आणि येथे तो यहुद्यांबरोबर आहे. लक्षात ठेवा, की तो चार वेळा येऊ शकत नाही. अंक चार शत्रूचा अंक आहे. त्याला पाचव्या वेळेस यावे लागणार आहे.

318 पहिल्या वेळेला तो आला, तो स्वतः एलीया होता, दुसऱ्या वेळेस तो आला, तो अलीशा होता. त्यानंतर तो आला, तो (काय?) बाप्तिस्मा करणारा योहान होता. त्यानंतर तो येतो, सातवा दूत म्हणून येतो. आणि पाचव्या वेळी तो येतो, तो मोशेबरोबर प्रचार करता करता पलिकडे जातो. निश्चितच. होय, महाशय. त्याविषयी तुम्ही गोंधळात पडू नका.

319 पाच, जर तुम्हाला—तुम्हाला बायबलची अंकावली माहीत असेल तर, पाच हा अंक श्रमाची कृपा आहे. आणि तेच काय ते त्याने केले आहे. आता पाहा, तुम्ही जाणू इच्छिता की ती कुठे आहे. येशू श्रमाची कृपा होता काय? येशू (J-e-s-u-s) पाच अक्षरे, श्रम (L-a-b-o-r) ह्याची पाच अक्षरे आहेत हे बरोबर आहे? श्रम, तुमच्यावरील प्रेमाखातिर—खातिर त्याने श्रम घेतले. आणि जर तुम्ही त्याच्याकडे येता, तर तुम्ही कसे येता, कशाद्वारे येता? त्याच्या श्रमावर (L-a-b-o-r) विश्वास (F-a-i-t-

h) करण्याद्वारे, ते बरोबर आहे काय? श्रम हा विश्वासणाऱ्यांसाठी कृपेचा क्रमांक आहे, हे खरे आहे.

320 लक्ष द्या, पहिला एलीया, तो स्वतः होता. दुसरा एलीया अलिशा होता. तिसरा योहान होता. चौथा मलाखी 4 आणि प्रकटीकरण 10:7 प्रमाणे मंडळीसाठी सातवा दूत किंवा अंतिम संदेष्टा होता. आता, पाचव्यांदा, तो यहुद्यांसाठी, एक लक्ष चव्वेचाळीस हजार यहुद्यांसाठी, मंडळी वर उचलली गेल्यानंतर, एक संदेष्टा आहे.

321 मला—मला—मला हे जर मजेशीर वाटते, पाहा. समजले? पाहा, जर काही विचार करतील...पाहा मी तुम्हाला आता हे समजावू इच्छितो. जर काही जण अजूनही विचार करतात की मलाखी 4 "लोकांची पुर्नउभारणी," ही तीच गोष्ट आहे. जी त्याने तेथे यहुद्यांशी केली आणि वाटते की हे सर्व तेच आहे, मला एक मिनीट ही गोष्ट तुम्हासाठी स्पष्ट करु द्या. पाहा, ते तुमच्यासाठी जरा गोंधळाचे होईल. कारण, स्मरण करा, मलाखी 4 सांगते, "वडिलांचा विश्वास वळवील...किंवा पुत्रांना त्यांच्या वडिलांकडे वळवील." पहा, वडिलांकडे वळवील!

322 आता मला तुम्हाला ह्या सेवकाईतील फरक दाखवू दे. जर तो पुत्रांचा विश्वास परत वडिलांकडे वळविण्यासाठी आला आहे, तर तो ख्रिस्ताला नाकारील. तो पुन्हा नियमशास्त्राकडे जाईल. ते बरोबर आहे? वडिलांनी नियमशास्त्र पाळले आहे. तुम्हाला हे समजले? [मंडळी म्हणते, "आमेन"–सम्पा.]

323 लक्ष द्या, जेव्हा अलीशा, जेव्हा तो मलाखी 4 मध्ये त्याची सेवकाई पूर्ण करण्यासाठी आला, पाहा जसे मलाखी 4 मध्ये, एलीया स्वतः होता.

324 परंतु जेव्हा तो प्रकटीकरण 11 मध्ये यहुद्यांकडे येतो, त्याच्याबरोबर मोशे आहे. [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हाताने एकत्र दोनदा टाळी वाजवतो—सम्पा.] म्हणून, तेथे जराही गोंधळ नाही. समजले? लक्षात आले? [मंडळी म्हणते, "आमेन."]

325 जेव्हा मलाखी 4चा अलीशा येतो, तो स्वतः एकटा येतो, येथे केवळ एलीया सेवकाई करील. एलिया आणि मोशे करणार नाही. "एलीया" येईल. परंतु जो आत्मा एलीयावर होता, तोच आत्मा मंडळीच्या काळाच्या शेवटच्या समयात येईल. "पुत्रांचा विश्वास परत वडिलांच्या मूळ विश्वासाकडे आणील," प्रेषितांच्या विश्वासाकडे तुम्ही पुन्हा वळणार आहात. आणि ख्रिस्त विरोधकाने त्या सर्वांना खेचले होते. "पुन्हा वळविणे," हा वचन इतर सर्व वचनांनी मेळ खाते. पाहा. तो स्वतः येतो. समजले?

326 परंतु, जेव्हा तो मंडळीसाठी येतो, बायबल...किंवा एक लक्ष चव्वेचाळीस हजारांकडे येतो, बायबल स्पष्टपणे सांगते की ते दोघे, तेथे एक नाही दोघे येतात. ते दोघे! आणि त्याची पहिली सेवकाई, यहुद्यांसाठी नव्हती. आणि जर त्याची सेवकाई यहुद्यांसाठी असती, तर त्याने त्यांना पुन्हा नियमशास्त्राकडे नेले असते. परंतु तो एक लक्ष चव्वेचाळीस हजार लोकांना ख्रिस्ताचा प्रचार करण्यासाठी येतो, आमेन, "तेथे तो आहे, तो मसीहा छेदला गेला होता," आमेन! हे तसेच आहे. म्हणून त्यात जराही गोंधळून जाऊ नका. हा गोंधळ नाही. वचन जराही खोटे बोलत नाही.

327 महिमा! ओह, जेव्हा मी ते पाहीले, मी उड्या मारीत होतो! मी म्हणालो, "धन्यवाद, प्रभू," जेव्हा मी पाहात होतो ते कसे झाले होते. पाहिले की एलीया पहिल्या युगात एकटाच बाहेर येतो, आणि तो एकटाच आला होता. तेव्हा जेव्हा मी त्याला पुन्हा दुसरीकडून येताना पाहीले, जेव्हा ते घडले तेथे दोघेजण होते. मी म्हणालो, "हे असेच आहे. प्रभू असेच करतो. आमेन! मी हे आता पाहतो! हालेलुयाह!" ते अगदी बरोबर आहे.

328 जर मी हे सांगितले नसते, तर कोणीतरी ह्यामुळे जर, गोंधळले नाही. परंतु त्याने—त्याने मला ते सांगण्यास सांगितले म्हणून त्याचा उल्लेख केला.

329 लक्ष द्या, हे पुरुष त्यांच्या मूळ सेवकाईकडून भविष्यातील सेवकाईसाठी देवाकडून त्यांना जीवंत ठेवण्यात आले, कारण त्यांनी त्यांची सेवकाई चांगल्याप्रकारे केली होती. समजले? जरा विचार करा, एलीयाचा आत्मा पाचवेळा सेवकाई करतो. मोशे दोनदा सेवकाई करतो; काय? त्यांना सेवकाईसाठी जीवंत ठेवले.

330 त्यांच्यातील एकही जण आता मृत नाही; तुम्ही ह्यावर विश्वास ठेवीत नाही काय. ते दोघे रुपांतराच्या डोंगरावर येशूशी बोलताना जीवंत दिसले होते. परंतु, लक्षात ठेवा, त्यांना मेले पाहीजे.

331 आता, आता, वास्तवात मोशे मेला होता. परंतु तो उठला, कारण तो ख्रिस्ताची अचूक छाया होता. समजले? त्याला कोठे गाडले. हे अजूनही कोणाला ठाऊक नाही. देवदूत त्याला उचलण्याकरिता आले. समजले? त्याच्याकडे शववाहक दूत होते. होय. का? कोणीही मर्त्य मनुष्य त्याला घेऊन जाऊ शकत नव्हते जेथे तो जात होता. तो फक्त कार्य करीत गेला, तेच सर्व आहे. त्याच्याकडे दूत, शववाहक होते, पाहा, कारण त्यांनी त्याला तेथे नेले, जेथे तो असावयास हवा होता. कोणालाही ते माहीत नाही.

332 अगदी सैतानालाही, माहीत नव्हते. त्याने आद्यदेवदूताशी वाद घातला. ते बरोबर आहे. तो समजू शकला नाही की मोशेला काय झाले. “मी त्याला तेथे थरथरताना पाहिले. आणि तो देशाकडे पाहात होता. आणि मागे त्या लेकरांकडे पाहात होता, आणि इत्यादी मी त्याला थरथरताना पाहीले. परंतु त्याने खडकावर पाय ठेवला, आणि ती शेवटची वेळ होती जेव्हा मी त्याला पाहीले.”

333 तोच तो खडक आहे! तोच खडक आहे! मलाही माझ्या जीवनाच्या अंतापर्यंत त्या खडकावर उभे राहू दे! होय, महाशय! आता...माझा कृष्णवर्णीय भाऊ जो येथे येत असे आणि एक लहान गाणे गात असे, “जर मला शक्य असले, मी निश्चितच त्या खडकावर उभे राहीन जेथे मोशे उभा राहिला होता.” होय, महाशय! ओह, तो तोच खडक आहे ज्यावर मी देखील उभे राहू इच्छितो. विश्वासाद्वारे मी तेथे उभा आहे.

334 परंतु एलीयाचे स्मरण करा, तो अगदी थकला होता, कारण त्याच्यापुढे खूप काम होते. [भाऊ ब्रॅन्हम थांबतात, मंडळी हसते—सम्पा.] म्हणून तो अद्भूत रितीने गेला होता. आणि परमेश्वराने त्याला घरी नेण्यासाठी स्वारी पाठवली होती. एक रथ पाठवला होता. हे बरोबर आहे काय? [“आमेन.”] त्याला वर घेतले. तो कधीच मेला नव्हता, कारण त्याने त्याला जीवंत राखले. त्याच्याकडे त्याच्यासाठी भविष्यात एक कार्य होते. त्याला एक पुरुषास अभिषिक्त करायचा आहे. पाहा, जो त्याच्या आत्म्याने येईल.

335 परंतु त्यांनी मृत्यूची चव घेतली पाहीजे. आता प्रकटीकरण 11 वा अध्याय आपण जाऊया, मी कसेही करुन ह्यावर आहे. आपण प्रकटीकरण 11 मध्ये पाहूया. लक्ष द्या आणि पाहा की ते दोघे मारले गेले नाहीत. होय, महाशय. त्या दोघांनाही मृत्यूची चव घ्यावी लागेल. होय, महाशय. त्याची सेवकाई संपल्यावर, ते मृत्यूची चव घेतात. प्रकटीकरण 11 आणि आपण 7व्या वचनापासून सुरुवात करुया.

> *त्यांनी आपली साक्ष देणे समाप्त केल्यावर अथांग डोहांतून...वर येणारे श्वापद त्यांच्याबरोबर लढाई करील...*

336 ओह, माझ्या देवा, तो ह्याचा सामना करु शकत नाही, ते देववेडे लोक पुन्हा आले आहेत, पाहा. सर्व ठीक आहे. सर्व ठीक आहे.

*...अथांग डोहातून...त्यांच्याबरोबर लढाई करील आणि त्यास जिंकून जीवे मारील.*

337 परंतु लक्ष द्या काय घडते. ते आता पूर्ण प्रतिछाया आहे.

*आणि आध्यात्मिक दृष्टीने सदोम व मिसर म्हटलेले असे मोठे नगर...आणि त्यांत त्यांच्या प्रभूला वधस्तंभावर खिळण्यात आले होते. त्या रस्त्यावर त्याची प्रेते पडून राहतील.* (पाहा, यरुशलेम)

338 आता त्यांना मृत्यूची चव घ्यावी लागेल, (नाही का, त्यांना?) ते बरोबर आहे, त्यांची सेवकाई संपल्यानंतर.

339 का? सातव्या दूताची सेवकाई, सातव्या दूताची सेवकाई, सातव्या दूतासाठी एलीयाची सेवकाई, सातव्या दूतासाठी, नाही...का नाही, का असू शकत नाही, मी सांगण्याचा प्रयत्न करतो की जर मोशे अमर आहे, तो सातव्या दूताची सेवकाई का करु शकत नाही, जशी एलीयाने केली पाहीजे? त्यांनी असे का केले नाही. परमेश्वराने फक्त मोशेला का पाठवले नाही, का नाही म्हणाला, "एलिया तू—तू इतके परिश्रम घेऊन कार्य केले आहे...आणि सर्व गोष्टी, मला—मला वाटते मी फक्त मोशेलाच खाली पाठवतो"? का?

340 मोशेच्या सेवकाईकडे पाहा. एलीया हा सर्व राष्ट्रांसाठी संदेष्टा होता; परंतु मोशे फक्त यहुद्यांसाठी नियमशास्त्र देणारा होता. आमेन. मोशे येथे सांगण्यासाठी आहे...तो एलीयाबरोबर येतो ह्याचे कारण हे आहे की...यहूदी म्हणतात, "थांबा, आम्ही अजूनही येथे नियमशास्त्र पाळत आहोत." परंतु मोशे येथे स्वतः उभा आहे. आणि येथे एलीया त्याच्याबरोबर उभा आहे. ओह! समजले? तो केवळ यहुद्यांकडे आला. समजले? मोशे केवळ यहुद्यांकडे गेला, एलीया संदेष्टा सर्व राष्ट्रांसाठी होता. परंतु मोशे यहुद्यांसाठी एक संदेष्टा आणि नियमशास्त्र देणारा बनला. समजले? नियमशास्त्रच मोशेचा संदेश होता.

341 परंतु एलीयाचा संदेश काय होता? आखुड केस कापलेल्या स्त्रीयांना, संप्रदायांना; होय, महाशय. आणि त्याने खरोखरी त्यांचे तुकडे-तुकडे केले. त्याने चेहऱ्याला रंगविणाऱ्या स्त्रीयांना सांगितले, "तुम्हाला कुत्र्यांना खावयास देण्यात येईल." त्याने खरोखरीच त्याचे तुकडे केले.

342 आणि नंतर जेव्हा त्याचा आत्मा योहानावर आला, तो तो दणदण पावले टाकीत रानांतून बाहेर आला आणि त्याने तीच गोष्ट केली. बरोबर आहे. म्हणाला, "तुम्ही असा विचार करु नका की आम्ही हे आहोत किंवा *ते* आहोत. परमेश्वर ह्या दगडांपासून अब्राहामाची मुले निर्माण करण्यास समर्थ आहे."

343 थेट हेरोदीयाकडे गेला, म्हणाला, "आणि तू मला असे सांगतो की तू तुझ्या भावाच्या बायकोशी लग्न केले आहे...?" "तू आपल्या भावाची बायको ठेवावी हे सशास्त्र नाही." ओह, भाऊ! त्याने तिला निश्चितच सांगितले.

344 लक्षात ठेवा, की त्या प्राण्यांना त्या एक लक्ष चव्वेचाळीस हजारांसाठी आणखी थोडा वेळ विश्रांती घ्यावी लागणार आहे...जे शहीद होणार आहे. काय हे असे नाही काय. हे बायबलला एकत्र ठेवते.

345 आता माझा समय संपलेला आहे. जर मला येथून लवकर बाहेर येता आले असते. परंतु, मला तुला काही आणखी लहान गोष्टी सांगायच्या आहेत, जर तुम्ही ऐकण्यास उभे राहू शकता. [मंडळी म्हणते, "तुम्ही बोलत राहा!"—सम्पा.] मला ठाऊक आहे की गर्मी आहे. आणि मला घाम येत आहे.

346 परंतु, लक्षपूर्वक ऐका, मला तुम्हाला काही सांगायचे आहे. हे इतके चांगले आहे, माझ्या हृदयात जळत आहे. माझी आशा आहे की तुम्ही ते विसरला नाहीत, पाहा मला हे तुम्हाला त्याच्या उपस्थितीत सांगू द्या. फार दिवस झाले नाही, जेव्हा त्याने त्याच्या कृपद्वारे मला माझ्या लोकांना शुभ्र झगे घातलेले पाहू दिले. तुम्हाला ते लक्षात आहे? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] तुम्हाला ती गोष्ट लक्षात आहे का? फार काळ झाला नाही स्मरण करा. ["आमेन."] परराष्ट्रीय वधू, आता तेथे आहे. त्या सर्वांनी झगे घातलेले होते.

347 मी उठलो होतो. मी एका सभेमध्ये होतो. ह्या गोष्टीस अंदाजे एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ झाला. मी एके सकाळी जागा झालो आणि मी उठलो आणि मी माझ्या पत्नीला म्हणालो, "प्रिये?" तीने हालचाल केली नाही. मुले...उठण्याच्या बेतात होती. आणि मला त्यांना घेऊन शाळेत एका जुन्या ठिकाणी जायचे होते. बरे, मी—मी बिछान्यावर उठून बसलो, आणि पलंगावर टेकलो. तुम्हाला ठाऊक आहे कसे. मी बसलो आणि माझे डोके पलंगावर टेकून बसलो. आमच्याकडे जुन्या पध्दतीचा पलंग आहे. आणि म्हणून मी तेथे *ह्या* प्रकारे आधार घेऊन बसलो होतो.

348 आणि मला वाटले, "मुला, तू अगोदरच त्रेपन्न वर्षांचा झाला आहे. जर तुला परमेश्वरासाठी काही करायचे आहे, तू ते आता कर हे योग्य होईल, कारण काही वेळानंतर तू खूप म्हातारा होशील." पाहा.

349 आणि मी विचार केला, "तुम्हाला ठाऊक आहे, आता ते योग्य आहे." मी विचार केला, "मुला, तुला ठाऊक आहे, मी जास्त दूर नाही. मला लवकरच जावे लागणार आहे. माझे वय एक वर्ष अधिक आहे जितके माझे वडील जीवंत होते." समजले? मी विचार केला, "मला फार लवकर जावे लागेल. मी हे पाहतोय. आणि येथे मी देवासाठी अजून काहीही केलेले नाही." मला वाटते, "मला नेहमीच परमेश्वरासाठी काहीतरी करायचे होते. जर मला परमेश्वरासाठी काही करायचे आहे, तर मला ते करण्यासाठी त्वरा केली पाहीजे. आणि मला ठाऊक नाही की मी ते कसे करणार आहे."

350 मी विचार केला, "हे मनुष्या, मी त्याचे आगमन पाहण्याची आशा करतो. मला भूत किंवा आत्मा बनायचे नाही."

351 पाहा, मी भूताला नेहमीच घाबरत होतो. आणि आता, तुम्हाला ठाऊक आहे अशाप्रकारचा...मी नेहमीच विचार करीत होतो की जसे जर मला भाऊ नेविलला भेटायचे असेल, तर ते एक सभोवती फिरणारा लहानसा ढग असतील आणि मी म्हणेन, "हॅलो, भाऊ नेव्हिल." आणि तो म्हणेल, "हॅलो, भाऊ ब्रॅन्हम," दुसऱ्या कोणत्या चेतनेद्वारे तो बोलेल कारण तो बोलू शकत नाही. परंतु मला ते ठाऊक आहे की तो भाऊ नेव्हील होता. होय. मला त्याच्याशी हात मिळवायला वाटेल जसे मी नेहमीच करितो. कारण, मी एक मनुष्य असल्याकारणाने मला असे वाटत होते. पाहा, मला त्याच्याशी हात मिळवायचा होता. परंतु त्याच्याकडे हात नाहीत. तो तर तेथे कबरेत कूजला असेल. समजले?

352 नी विचार केला, "मी आशा करितो मला त्यांतून जावे लागणार नाही." आता, मी...आता मी तुम्हाला एक सत्य सांगणार आहे. मी—मी मरण्यासाठी घाबरत होतो. मी ह्यासाठी घाबरत नव्हतो की माझा नाश होईल, परंतु मला आत्मा बनायचे नव्हते. मला मनुष्यच राहायचे होते. पाहा, मला स्वर्गरोहणासाठी थांबायचे होते. मला तसेच राहायचे होते. मला आत्मा बनुन इथे तेथे फिरायचे नव्हते. मी तसा विचार करीत तेथे पडलो होतो.

353 आणि अचानक तेथे काहीतरी घडले. [भाऊ ब्रॅन्हम, एकदा टिचकी वाजवतात—सम्पा.]

354 आता तुम्हाला ठाऊक आहे आणि तुम्ही सर्व दृष्टांताविषयी परिचीत आहात. आणि जर तो एक दृष्टांत होता. पाहा, त्याच्यासारखा दृष्टांत कधीच झाला नाही. आणि मला ते दृष्टांत तेव्हापासून होतात जेव्हा मी एक लहान मुलगा होतो.

355 आणि अचानक काहीतरी घडले. मला, स्वतःला असे भासले की मी सोडून जात आहे. वाटले, "ओह–ओह." आणि मला—मला वाटले, "मी—मी तर अगोदरच मेलो आहे, पाहा आणि मी—मी गेलो आहे." समजले?

356 आणि मी अशा स्थितीत पोहचलो, "मला वाटले की मी मागे पाहीन." तो इतका खरा होतो, मित्रांनो, जसा मी येथे उभा आहे. समजले? आणि मी पाहण्यासाठी मागे वळलो आणि तेथे मी पलंगावर पडलेलो होतो. आणि मी तेथे माझ्या पत्नीच्या बाजूला पडलेलो होतो.

357 आणि मला वाटले, "अच्छा, तो कदाचित हृदयविकाराचा झटका होता." समजले? मला वाटले, "पाहा, मी लगेच मेलो," जो जाण्याचा एक उत्तम मार्ग असेल. म्हणून मी विचार केला, "तो हृदय विकाराचा एक झटका होता. मला काही वेदना सहन कराव्या लागल्या नाही." मी पाहीले मी विचार केला, मला वाटले, "अच्छा आता हे अगदी विचित्र आहे. तेथे मी पडलेलो आहे, आणि येथे मी उभा आहे."

358 म्हणून मी वळलो ते असे दिसत होते जणू काही मोठे—असे दिसत होते जणू काही मोठे शेत किंवा काहीतरी पसरलेल्या नीळ्या गवताचे मोठे शेत. आणि—आणि मी म्हणालो, "बरे मला आश्चर्य वाटते की हे काय आहे?"

359 आणि अचानक, जसे मी पाहीले, हजारो हजार तरुण स्त्रीया, सर्व शुभ्र झगे घातलेल्या त्यांच्या कंबरेपर्यंत लांब केस असलेल्या अनवाणी येथे आल्या आणि त्या थेट माझ्याकडे धावत येत आहेत. मी विचार केला, "आता हे काय आहे?"

360 मी सभोवती वळलो, मागे *तेथे* पाहीले, आणि तेथे मी होतो, आणि *ह्या* दिशेला वर पाहिले. तेथे त्या आल्या मी माझे बोट चावलो. "मी—मी—मो—मी झोपेत नव्हतो." परंतु मी समजू शकत होतो. आणि मी म्हटले, "तेव्हा काहीतरी येथे मजेशीर गोष्ट आहे."

361 आणि त्या सर्व स्त्रीया धावत आल्या. आणि—आणि अशा सुंदर स्त्रीया मी कधीच पाहील्या नव्हत्या! आणि त्या सर्व माझ्याकडे धावत आल्या. आणि जेव्हा त्या सर्व माझ्याकडे आल्या...

362 तुम्हाला माहीत आहे मी कशा प्रकारचा आहे...लोक मला म्हणतात की स्त्रीयांचा द्वेष करणारा आहे, परंतु मी—मी नाही, पाहा. परंतु, मी असा विचार करतो, एक चांगली स्त्री एक...हिरा आहे. परंतु मला वाटते, ती स्त्री जी चांगली नाही. जसे शलमोन म्हणतो, "तुमच्या रक्तात पाणी आहे." म्हणून मी निश्चितच बदफेली स्त्री किंवा चलाख स्त्रीयांच्या—च्या कामाचा उपयोगी नाही.

363 आणि म्हणून त्या सर्व स्त्रीया आल्या. त्या त्यांचे हात माझ्या भोवती घालू लागल्या. आता, ते नेहमीपेक्षा वेगळे होते. तुम्हाला ठाऊक आहे मी त्यासाठी उभा राहणार नाही. आता, पाहा मला येथे सांगावे लागत आहे की, मी—मी मिश्र लोकांच्या मध्ये आहे. परंतु, त्या, त्या स्त्रीया होत्या. त्या स्त्रीया होत्या आणि त्या—त्या प्रत्येक जणांनी मला आलींगन दिले, आणि त्या म्हणाल्या, "आमचा—आमचा मौल्यवान भाऊ!" आणि एक मला आलींगन देत होती, आणि त्या नंतर दूसरीने मला आलींगन दिले.

364 मी तेथे उभा राहून, पाहत होतो. मी विचार केला, “आता, हे काय आहे?” समजले? आणि त्या तेथे उभ्या होत्या. मला वाटले, “हे काय घडले?” मी पुन्हा खाली पाहीले. मी *तेथे* खाली पडलेलो होतो; आणि *येथे* मी उभा होतो. मी विचार केला, “आता, हे फार विचित्र आहे. मला—मला ते समजत नाही.”

365 आणि त्या स्त्रीया उंच स्वराने बोलावीत होत्या, “ओह, आमचा बहुमोल भाऊ,” आणि मला आलींगन देत होत्या. आता, त्या प्रत्येक भावनामध्ये, स्त्रीया होत्या.

366 आता, बहिणींनो, मी हे सांगतो म्हणून मला क्षमा करा, कारण...परंतु तुम्ही तुमच्या डॉक्टरांचे ऐका. आणि जर आपल्यामध्ये शुध्द मन नाही, तर आपण ख्रिस्ती नाहीत. मी पर्वा करीत नाही की...

367 मी सदैव शुध्द जीवन जगलो आहे. परमेश्वराला ते ठाऊक आहे. जेव्हा मी एक लहान मुलगा होतो, प्रभूच्या दूताने मला सांगितले की माझे शरीर, धुम्रपान, किंवा दारुने अपवित्र करु नकोस. आणि ते माझ्या जीवनात खरे ठरले आहे. परमेश्वराच्या कृपेने, मी ते पवित्र ठेवले. जेव्हा मी पापी होतो, तेव्हा मी स्त्रीयांच्या सभोवती फिरत नव्हतो. आणि म्हणून...

368 परंतु कोणताही पुरुष जेव्हा एखाद्या स्त्रीला आपल्या हाताने आलींगन देतो, तो पुरुषांच्या पेशींनी बनला असल्याने, आणि ती स्त्रीपेशींनी बनलेली असल्याने, तेथे संवेदना असते. मला माहीत नाही. तुम्ही कोण आहात. आता, मला सांगू नका की तुम्ही तसे नाहीत, जर तुम्ही एक निरोगी व्यक्ती आहात.

369 परंतु तेथे तुमच्यात अशा प्रकारच्या संवेदना नसतात. कारण तेथे अशा पेशी नसतात, भिन्न प्रकारच्या नसतात. तेथे तुम्ही कधीच पाप करणार नाही. तेथे एक परिवर्तन होते. तेथे आणखी काही नाही परंतु त्या स्त्रीयांमध्ये फक्त एक बंधू प्रीती होती.

370 जरी, कृपेत त्यांनी पाहीले; मला वाटले की एक—एक स्त्री, एक चांगली स्त्री, जी स्वत:ला चांगल्या प्रकारे ठेवते, आणि स्त्रीसारखी चालते, ती पृथ्वीवर एका—एका मौल्यवान खड्यासारखी उदाहरण आहे. जे काही आकर्षक आहे, ते मला—मला आवडते. मला वाटते, एक—एक स्त्री जी तिची जागा पकडते, आणि एक स्त्री बनण्याचा प्रयत्न करते. ती सन्मानास पात्र आहे. मी ह्यावर विश्वास ठेवतो. आणि मला वाटते जी अशी नाही, ती अगदी अशी आहे, जसे ख्रिस्त आणि ख्रिस्तविरोधी, तीच गोष्ट आहे.

371 मला—मला जे काही नैसर्गिक आहे ते आवडते. जसे सुंदर घोडा, किंवा काहीही, तो अगदी खऱ्या सुंदर घोड्याच्या स्थितीत उभा राहतो असा त्याचा पुतळा. किंवा अशी कुठलीही गोष्ट, सुंदर डोंगर, सुंदर स्त्री, सुंदर पुरुष. कुठलीही गोष्ट ती आपल्या स्थितीत उभी आहे जसे परमेश्वराने तीला बनवले आहे, मी सदैव त्याची प्रशंसा करतो.

372 आणि त्या परिपुर्ण होत्या. परंतु त्यांनी कितीही मला हाताने आलींगन दिले, त्याच्याशी काही कर्तव्य नाही, आणि त्या स्त्रीया होत्या, तुम्हाला समजते, परंतु तेथे पाप कधीच असू शकत नाही. पुरुष ग्रंथी आणि स्त्री ग्रंथी, दोन्हीही समाप्त झालेल्या असतील. [भाऊ ब्रॅन्हम एकदा टाळ्या वाजवतात—सम्पा.] प्रभूचा धन्यवाद होवो! त्या पूर्ण रितीने माझ्या बहिणी होत्या.

373 मी पाहीले. आणि मी सुरुवात केली...मी—मी माझ्या हातांकडे पाहिले आणि मी पाहिले ते सर्व इतके तरुणांसारखे होते आणि मी पाहिले, मी देखील तरुण होतो. आणि...

374 आणि माझे केस एका तरुणासारखे होते; न्हाव्याने माझ्या केसांवर कार्बोलिक आम्ल टाकले होते आणि माझे सर्व केस गेले होते जेव्हा मी लहान मुलगा होतो. आणि ती

माझ्यासाठी नेहमीच एक—एक चिंतेची बाब झाली, की मला—मला—मला खुप लवकर सर्दी होत असे, कारण माझा टाळू अजूनही नाजूक आहे. आणि केसांची मूळे अजूनही तेथे आहेत, परंतु ते कार्बोलिक आम्लामुळे जळलेली होती, आणि पाहा, त्यावर कधीच केस उगवू शकत नाही.

375 आणि मी, माझी पत्नी...गेलेलो खूप वर्षांपूर्वी, आणि माझ्या पत्नीने माझ्यासाठी केसांचा टोप आणला, ह्यासाठी की त्याद्वारे मी माझे डोके झाकू शकेल. परंतु मला नेहमीच तो घालण्यासाठी लाज वाटत होती, कारण तो जणूकाही खोटा असल्याचा दिसत होता. आणि मला काहीही बनावटी करायचे नव्हते.

376 आणि म्हणून मी विचार केला, "मी माझ्या डोक्यावर फक्त टोपी घालेन." मग मी तसे थोडावेळ केले. तुम्हाला माहीत आहे. त्यांनी काय केले? त्यांना मला 'बिशप' संबोधायचे होते. तेव्हा मी म्हणालो, मला वाटते की...समजले? मी फक्त म्हणालो, "मी ती काढून ठेवतो."

377 म्हणून मला खूप सर्दी झाली, आणि तसे होऊ देतो...परंतु, आता, तुम्ही युवकांनी त्या खिडक्या उंच केल्या आहेत, त्यामुळे थोडीशी हवा चारही बाजूंनी येते, मला ते समजले आहे.

378 आणि मी एका डॉक्टरकडे गेलो आणि त्याला विचारले, तो ह्याविषयी काय विचार करतो. त्याने म्हटले, "पाहा, तुझे—तुझे वरचे छिद्र उघडलेले आहे. जेव्हा प्रचार करतेवेळी, तुम्हाला घाम येतो आणि येणारी हवा येथे चिकट पदार्थात सर्दीचे जंतू घेऊन येते आणि ते तुमच्या घशापर्यंत येतात. दुसऱ्या दिवशी तुमचा घसा बसतो. हे असे आहे."

379 आणि—आणि म्हणून, तुम्ही ज्यांना केस आहेत, तुम्हाला ठाऊक नाही की तुम्ही केस असल्यामुळे किती आभारी असले पाहीजे. हे बरोबर आहे. समजले?

380 ठीक आहे, आता, मला कळले की ह्यानंतर मी—मी जाणार आहे...ह्या दिवसांतील एके दिवशी जर मला दात मिळाले नाही, तर मला त्यांतील काही मिळणार आहेत, आणि, किंवा त्याच्याशिवाय राहावे लागणार आहे.

381 म्हणून जर एखादा व्यक्ती—जर एखादा व्यक्ती...मी त्या मनुष्यासाठी असा विचार करणार नाही ते अधिक आहे, तो मनुष्य केसांचा टोप घालू इच्छितो, त्या स्त्री पेक्षा जी असे उंदीर किंवा उंदरांचे बनलेल्या अंबाड्यांनी आपले केस श्रृंगारते. समजले? परंतु—परंतु अर्थात, जर तुम्ही ते करता, तर ते ह्यावर अवलंबून आहे की तुम्ही ते कशासाठी करता. समजले? ते ह्या गोष्टीवर अवलंबून आहे की तुम्ही ते कशासाठी करता. आणि म्हणून...

382 परंतु, जेव्हा, मी तेथे उभा होतो, मला असा अनुभव आला, आणि माझे केस मला पुन्हा मिळाले होते. माझ्या प्रभू! मी तरुण होतो. आणि ह्या, हे सर्व तरुण आणि मी विचार केला, "अच्छा, हे विचित्र नाही काय! येथे ते आहेत." आणि त्या सर्व धावत होत्या...

383 आणि मी पाहीले आणि मी—मी होपला येताना पाहीले. तिने पाहीले...तुम्हाला माहीत आहे, ती वयाच्या बावीसाव्या वर्षी मेली. ती अजून तितकीच सुंदर होती जशी अगोदर होती. तुमच्यातील पुष्कळांच्या ती लक्षात आहे; ते मोठे काळे डोळे. ती जर्मनीची होती. तिचे काळे केस तिच्या पाठीवर लटकत होते. मी विचार केला "आता, जेव्हा ती येथे येईल, ती म्हणेल—ती म्हणेल की 'बील' मला ठाऊक होते ती असे म्हणेल. मला ठाऊक आहे की जेव्हा ती येथे येईल ती म्हणेल, 'बील.'"

384 मी पाहत होतो. आणि त्या स्त्रीयांतील प्रत्येक जण येत होती आणि मला आलींगन देऊन म्हणत होती, "ओह, मौल्यवान भाऊ, तुला पाहून आम्हाला फार आनंद होत

आहे!" मला वाटले...प्रत्येक जणांनी सारखाच पोषाख परिधान केला होता. परंतु त्यांचे केस वेगळे होते, तुम्हाला ठाऊक आहे, कोणाचे लाल केस आणि कोणाचे काळे केस, आणि कोणाचे तपकीरी केस होते. आणि—आणि त्या येत होत्या, परंतु त्या सर्व तरुण होत्या.

385 आणि जेव्हा ती माझ्याकडे आली, मी विचार केला, "मी फक्त पाहणार आहे, की ती काय म्हणते."

386 आणि तीने वर माझ्याकडे पाहीले, आणि ती म्हणाली, "ओह, आमचा बहुमुल्य भाऊ!" तीने मला आलींगन दिले आणि ती निघून गेली. काही दुसऱ्या स्त्रीया आल्या, आणि मग त्यांनी मला आलींगन दिले.

387 आणि मी एक आवाज ऐकला. आणि *ह्या* बाजूला पाहीले, आणि येथे एक पुरुषांचा समुह आला तरुण पुरुषांचा, सर्व अंदाजे वीस वर्ष वयाचे होते. त्याचे केस काळे आणि सोनेरी होते. आणि त्या सर्वांनी शुभ्र झगे घातले होते. आणि ते अनवाणी होते. आणि ते धावत माझ्याकडे आले आणि मला आलींगन देऊन बोलू लागले. "बहुमुल्य बंधू!"

388 मी विचार केला, आणि मी मागे वळलो, आणि तेथे मी अजूनही बिछान्यावर पडलेलो होतो. आणि मला वाटले, हे आता अजब आहे.

389 आणि तेव्हा एक वाणी माझ्याशी बोलू लागली. मी तशी वाणी पाहिली नव्हती. ती म्हणाली, "तू एकत्रित झाला आहेस. तू—तू तुझ्या लोकांना भेटला आहेस." आणि तेव्हा काही जणांनी मला वर उचलले, मला वर उंच मोठ्या वस्तूवर *अशा* तऱ्हेने बसविले.

मी विचारले, "तुम्ही तसे का केले?"

ते म्हणाले, "पृथ्वीवर तू एक नेता होता."

आणि मी म्हणालो, "ठीक आहे, मला—मला हे समजत नाही."

390 आणि ती वाणी माझ्याशी बोलत होती. मी ती वाणी कधीच पाहू शकलो नव्हतो. आता, ती वाणी माझ्यापेक्षा जरा वर होती, आणि माझ्याशी बोलत होती.

391 मी म्हणालो, "अच्छा, जर मी—जर मी मृत्यू पावलो आहे, तर मी येशूला पाहू इच्छितो." मी म्हणालो, "तो इतका अधिक होता...तो माझे संपूर्ण जीवन होता. मी त्याला पाहू इच्छितो."

आणि म्हणून तो म्हणाला, "तू त्याला आता पाहू शकत नाही. तो आणखी उंचावर आहे."

392 पाहा, ते वेदीच्या खालचे स्थान होते, पाहा, ते सहावे आय्याम होते, जेथे मनुष्य जातात. पाहा ते सातवे आय्याम नव्हते, जेथे परमेश्वर असतो, सातवे आय्याम. सहावे आय्याम!

393 आणि ते—आणि ते सर्व तेथे होते, आणि ते माझ्याजवळ येते होते. आणि मी म्हणालो...असे भासत होते जणूकाही तेथे लाखो लोक होते. मी त्यांना कधीही पाहीले नव्हते...आणि जेव्हा मी तेथे बसलेलो होतो, ह्या स्त्रीया आणि पुरुष येत आहेत आणि मला आलींगन देत होते, आणि मला "भाऊ" म्हणून बोलावीत होते. आणि मी तेथे बसलेलो आहे.

394 आणि तेव्हा ती वाणी बोलली, "तू तुझ्या लोकांशी भेटला आहे, जसा याकोब त्याच्या लोकांना भेटला होता."

मी म्हटले, "हे सर्व, माझे लोक? हे सर्व ब्रॅन्हम आहेत काय?"

त्याने म्हटले, “नाही. ते तुझ्याद्वारे ख्रिस्ताकडे वळलेले लोक आहेत.”

395 मी सभोवती पाहीले. आणि येथे एक खरी सुंदर स्त्री धावत आली. ती अगदी त्या स्त्रीयांसारखीच दिसत होती. तिने तिचे हात माझ्यासभोवती घातले. आणि ती म्हणाली, “ओह, माझा बहुमुल्य भाऊ!”

396 मला वाटले, “माझ्या प्रभू! ती एका देवदूताप्रमाणे दिसत होती.” आणि ती निघून गेली.

आणि ती वाणी बोलली, “तू तिला ओळखले. नाहीस काय?”

मी म्हणालो, “नाही, मी ओळखले नाही.”

397 म्हणाली, “तू तिला ख्रिस्ताकडे आणले, जेव्हा तिने नव्वदी ओलांडली होती.” म्हणाली, “तुला माहीत आहे की ती तुझ्याविषयी इतका विचार का करते?”

मी म्हटले, “ती सुंदर मुलगी नव्वदी ओलांडलेली आहे?”

398 “होय,” ती म्हणाली, “ती आता यापुढे कधीही बदलणार नाही.” ती म्हणाली, “तेच कारण आहे, की ती म्हणत आहे, ‘बहुमुल्य बंधु.’”

399 मला वाटले, “ओह, माझ्या प्रभू! आणि मला ह्याची भीती वाटत होती? का, हे लोक खरे आहेत.” ते कोठेही जाणार नव्हते. ते तेथे असल्याकारणाने थकलेले नव्हते.

आणि मी म्हटले, “ठीक आहे, मी येशूला का पाहू शकत नाही?”

400 ती म्हणाली, “तो एके दिवशी येईल. आणि तो तुझ्याकडे प्रथम येईल, आणि मग तुझा न्याय होईल,” ती वाणी म्हणाली, “हे लोक तुझ्याद्वारे बदललेले आहेत. ज्यांचे तू नेतृत्व केले होते.”

401 आणि मी म्हटले, “तुमचा अर्थ मी नेता असल्याकारणाने तो माझा न्याय करील?”

ती म्हणाली, “होय.”

402 आणि मी विचारले, “काय प्रत्येक नेत्याचा अशाप्रकारे न्याय होणार आहे?”

म्हणाली, “होय,”

मी म्हणालो, “पौलाविषयी काय?”

त्याने म्हटले, “त्याचा न्याय त्याच्या लोकांबरोबर होईल.”

403 “अच्छा,” मी म्हटले, “जर त्याचा समुह आत जातो, तर माझाही जाईल, कारण मी त्याच वचनाचा प्रचार केला आहे.” ते बरोबर आहे. मी म्हणालो, “जेथे त्याने येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला, मी देखील घेतला...”

404 आणि लाखोजण एकाच वेळी ओरडून म्हणाले, “आम्ही त्यावरच विश्रांती घेत आहोत!”

405 आणि मी म्हटले, “माझ्या प्रभो! जर मला हे येथे येण्याअगोदर माहीत असते, तर मी लोकांना येथे आणिले असते. ते हे गमावण्याचा धोका पत्करु शकत नाही. का, येथे पाहा!” आणि मग...

406 आणि त्याने म्हटले, “आता, एके दिवशी तो येईल आणि मग...आता, येथे, आपण खात नाही, पित नाही, किंवा झोपतही नाही. आपण सर्व एक समान आहोत.”

407 अच्छा, हे केवळ परिपूर्णच नाही; हे परिपूर्णतेच्या पलिकडचे आहे. हे केवळ अतिउत्कृष्ठच नाही, ते अति उत्कृष्ठतेच्या पलिकडचे आहे. तेथे कोणते नाव असू शकत

नाही...तुम्ही विचार करु शकत नाही...तेथे ते सांगण्यासाठी शब्दकोषांत शब्द नाहीत. तुम्ही पोहचला आहात, हेच सर्व आहे.

408 आणि मला वाटले, “अच्छा, हे, हे परिपूर्ण असेल आणि तर मग ह्यानंतर आपण काय करणार आहोत?”

409 ती वाणी म्हणाली, “तेव्हा जेव्हा येशू येईल, आणि...तो तुझा किंवा तुझ्या सेवकाईचा न्याय करितो, मग आपण पृथ्वीवर जातो आणि आपली शरीरे धारण करितो.” ठीक आहे, मी—मी कधीच त्याविषयी विचार केला नव्हता. हे बिलकुल वचनाप्रमाणे आहे. म्हणाली, “तेव्हा आपण पृथ्वीवर परत जातो आणि आपली शरीरे धारण करतो, तेव्हा आपण खातो. येथे आपण खात नाही, किंवा आपण झोपत नाही.” ती म्हणाली, “आपण तेथे खाली खातो, परंतु आपण परत पृथ्वीवर जातो.”

410 मी विचार केला, “माझ्या प्रभो, हे अद्भूत नाही का! ओह, माझ्या प्रभू! आणि मी त्यासाठी भीत होतो. मी मृत्यूला का भीत होतो. येथे येण्यासाठी? अच्छा, हे परिपूर्ण आहे, अधिक परिपूर्ण, अधिक परिपूर्ण. ओह, हे अद्भूत आहे!”

411 पाहा, आपण अगदी वेदीखाली होतो. समजले? पाहा, ते वेदीखाली त्याच्या येण्याची वाट पाहत होते, की तो त्यांच्याकडे येईल जे झोपी गेलेले होते...आमची शरीरे मातीमध्ये झोपी गेलेली आहेत, तो येईल व आम्हाला पुन्हा उठवील.

412 जसे येशू सुखलोकामधून येतो, आणि अब्राहाम, इसहाक आणि त्या सर्वांना आणतो जे पहिल्या पुनरुत्थानाची वाट पाहत होते, तुम्हाला समजले. ते शहरामध्ये गेले आणि पुष्कळजणांच्या दृष्टीस पडले.

413 हे बिलकुल वचनाप्रमाणे आहे. तो दृष्टांत होता, किंवा जे काही होता, तो पूर्णपणे वचनानुसार होता.

414 आणि मी म्हणालो, “बरे, हे अद्भूत नाही का!” आणि मग मी विचार केला, “ते अदभूत नाही काय...?”

415 मी घोड्याच्या टापांसारखा काहीसा आवाज ऐकला. आणि मी पाहीले. आणि माझा लहान खोगीर घातलेला घोडा, ज्याचे नाव “प्रिन्स” होते, त्याच्यावर स्वार होत असे, मी त्याच्याविषयी इतका विचार करीत होतो. येथे तो माझ्याबाजूला उभा होता, आणि त्याचे डोके माझ्या खांद्यावर ठेवून मला आलींगन देत होता. तुम्हाला ठाऊक आहे, जसे मी त्याला साखर देत असे आणि तो त्याचे...मी माझे हात त्याच्याभोवती टाकले. मी म्हणालो, “प्रिन्स, मला माहीत होते तू येथे असशील.”

मला वाटले काहीतरी माझ्या हाताला चाटत आहे. तेथे माझा जुना अमेरिकन कुत्रा (coon) कुन होता.

416 जेव्हा—जेव्हा श्रीमान शॉर्ट, खाली येथे, त्याला विष घातले, मी शपथ घेतली की मी श्रीमान शॉर्टला त्याकरिता ठार मारेन. मी अंदाजे सोळा वर्षे वयाचा होतो. त्याने त्याला विष दिले, त्याला विषाची गोळी दिली. आणि माझ्या वडिलांनी मला रायफलसहीत पकडले होते, मी सांगितले होते की मी त्याला मारण्यासाठी पोलीस स्टेशनला जात होतो. आणि मी म्हटले, “मी त्याला मारुन टाकेन.” मी म्हणालो, “बरे...” मी कुत्र्याच्या कबरेकडे गेलो. आणि मी त्याला म्हणालो, मी म्हणालो, “फ्रिट्ज तू माझ्या साथीदारासारखा होता. तू मला कपडे घातलेस आणि मला शाळेत नेले. जेव्हा तू म्हातारा होशील मी तुझी काळजी घेणार होतो. आता त्यांनी तुला मारुन टाकले.” मी म्हटले, “फ्रिट्ज, मी तुला वचन देतो की तो जगणार नाही.” मी म्हटले, “मी तुला वचन देतो, तो जगणार नाही. मी कधीतरी

रस्त्यावर चालताना त्याला पकडेन, मग त्याच्यावर धावून जाईन.” आणि “मी त्याला तुझ्यासाठी मारुन टाकीन.”

417 परंतु तुम्हाला माहीत आहे मी काय केले? मी त्या मनुष्याला ख्रिस्ताकडे आणले, त्याला येशूच्या नावाने बाप्तिस्मा दिला, आणि त्याचा मृत्यू झाल्यावर त्याला दफन केले. होय, महाशय. मी त्यानंतर अंदाजे दोन वर्षानंतर ख्रिस्ती झालो. पाहा, नंतर मी ह्या गोष्टी वेगळ्या रितीने पाहील्या मी द्वेषाऐवजी त्याच्यावर प्रेम केले.

418 म्हणून तेव्हा, तरी परंतु, तेथे फ्रिट्ज माझा हात चाटत उभा होता. आणि मी होतो… मी पाहिले.

419 मी रडू शकलो नाही. कोणीच रडू शकले नाही. तेथे सर्वत्र आनंद होता. तुम्ही दुःख करु शकत नव्हते, कारण तेथे सर्वत्र आनंद होता. तुम्ही मरु शकत नव्हते, कारण तेथे सर्वत्र जीवन होते. पाहीले? समजले? म्हातारे होऊ शकत नव्हते, कारण तेथे सर्व तरुण होते. आणि तेच ते आहे…ते परिपूर्ण आहे. मी विचार केला, “ओह, हे अद्भूत नाही काय!” आणि दशलक्ष…ओह माझ्या प्रभू! मी माझ्या घरी होतो.

420 आणि—आणि तेव्हाच मी एक वाणी ऐकली आणि ती वाणी ओरडून म्हणाली, “ज्या सर्वांवर तू प्रेम केलेस…” माझ्या सेवेचे बक्षीस आहे. मला कोणत्या बक्षीसाची गरज नाही. त्याने म्हटले, “ज्या सर्वांवर तू आजपर्यंत प्रेम केले आणि ज्या सर्वांनी आज पर्यंत तुझ्यावर प्रेम केले, परमेश्वराने तुला दिले आहे.”

मी म्हणालो, “प्रभूची स्तुती होवो!”

421 मला मजेशीर वाटले! मी विचार केला, “काय बाब आहे? मला मजेशीर वाटले.” मी भोवती वळलो आणि पाहीले. आणि बिछान्यावर माझे शरीर हलत होते. मी म्हणालो, “ओह, मला निश्चितच परत जायचे नाही. नको, मला जाऊ देऊ नको.”

422 परंतु सुवार्तेचा प्रचार व्हायचा होता, एका सेकंदात मी पुन्हा पलंगावर होतो.

423 त्यानंतर अंदाजे दोन महिनेही झाले नाही…तुम्ही हे ऐकले असेल. तुम्ही हे बिजनेस मेन्स *वॉईस*मध्ये वाचले असेल. पाहा, सुवार्ता सर्व जगभर गेलेली आहे. आणि भाऊ नॉर्मन, मला वाटते ते येथे कुठेतरी ह्या रात्री आहेत. त्यांनी त्याचे भाषांतर करुन ती पत्रके पाठवली आहेत. ती पत्रके सर्व ठिकाणी गेली आहेत. आणि पुष्कळ सेवकांनी त्यावर टिपण्णी लिहीली आहे, आणि म्हटले आहे…

424 माझ्याकडे येथे एक घटना आहे. मी ती तुम्हाला सांगेन. तेथे अर्थात तशा शेकडो आहेत. एक व्यक्ती धावत आला, म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम, तुमचा दृष्टांत बिजनेस मेन्स *वॉईस* पत्रिकेत…”

425 आणि मी टॉमी निकेल्सची प्रशंसा करतो, जरी ते बिजनेस मेन बरोबर नाहीत. मला माहीत नाही का, परंतु तो त्यांच्याबरोबर नाही. परंतु त्याने त्या पत्रिकेत लिहीले जे मी सांगितले त्रैक्यासंबंधित त्या पत्रिकेत त्याने सांगितले, “जेथे…पौल येशूच्या नावाने बाप्तिस्मा द्यायचा आणि लोकांना तसे करण्याची ह्याने आज्ञा दिली, मी ही तसेच केले आहे.” पाहा, त्याने ते जसे होते तसे लिहीले आहे. समजले? आणि म्हणून तेव्हा मी—मी—मी विचार केला, “बापरे!”

426 ह्या सेवकाने त्यात लिहीले म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम, तुमचा दृष्टांत…”

427 हा दृष्टांत असू शकतो. आता मला हे “रुपांतर” आहे असे म्हणायचे नाही. जर पौल…जर मी पहिल्या स्वर्गात उचललो गेलो आणि ते पाहिले, पौलाविषयी काय जो तिसऱ्या स्वर्गापर्यंत उचलला गेला होता? ते काय होते? पौलाने तर म्हटले तो त्याविषयी

बोलूही शकत नाही, जर तो उचलला गेला होता. मला ठाऊक नाही की हे उचलले जाणे होते. मी सांगू शकत नाही. मी तुम्हाला सांगू शकत नाही.

428 परंतु ह्या सेवकाने सांगितले, “भाऊ ब्रॅन्हम, तुमचा दृष्टांत मला अगदी वचनाप्रमाणे वाटला आणि तो पर्यंत बरोबर आहे जोपर्यंत तुम्ही घोड्याविषयी बोलत नाही.” म्हणाला, “एक घोडा स्वर्गामध्ये?” म्हणाला...आता एका धर्मोपदेशकाचे ज्ञान, मत पाहा? समजले? तो म्हणाला, “स्वर्ग हा मनुष्यांसाठी बनवला आहे. घोड्यासाठी नाही.”

429 ठीक आहे, मी खाली बसतो. माझा मुलगा बीली जो येथे आहे, त्याने अंदाजे तीन किंवा चार महिन्यांपूर्वी जुन्या चर्चच्या कार्यालयीन एक पत्र टाकले होते.

430 मी म्हटले, “माझा बहुमुल्य भाऊ, मला तुमचे ज्ञान आणि तुमच्या वचनाच्या ज्ञानावर आश्चर्य वाटते. मी असे म्हणालो नाही की मी स्वर्गात होतो. मी म्हटले की ती स्वर्गासारखी जागा होती, कारण ख्रिस्त त्यापेक्षा वर होता, पाहा. परंतु,” मी म्हणालो, “जर ते कदाचित तुमचे समाधान करील, तर तुम्ही प्रकटीकरण 19 पाहा आणि जेव्हा येशू आकाशांच्या आकाशातून येतो, तो शुभ्र घोड्यावर स्वार होऊन येतो, आणि सर्व संत त्याच्यासह घोड्यावर स्वार होऊन येतात,” बरोबर. पूर्णपणे. हे निश्चितच.

431 आणि तर त्याच स्थानात, तेथे एक असा होता जो गरुडासारखा दिसत होता, आणि एक...बैलासरखा दिसत होता, आणि एक बरे ते घोडे कोठून आले होते जे एलीयाला घेऊन गेले? तुम्ही पाहा, ते हेच दर्शवितात की मानवी मन फक्त दोष लावू इच्छिते. हे बरोबर आहे.

432 आता लक्ष द्या. परंतु मी जरा हा बहुमुल्य, देशभक्त भाऊ योहानाविषयी...विचार करीत होतो. पाहा...मी विचार केला की समाप्त करण्याअगोदर येथे हे सांगणे उपयुक्त होईल; जर योहनाने तेथे पाहिले आणि त्याचे बंधूजन, पाहा, त्याच्या सोबतीच्या दासांना थोडावेळ सहन करावे लागणार मग, पाहा, प्रभू परमेश्वराने मला माझ्या सोबतीच्या दासांना आणि संतजनांना बघण्याची अनुमती दिली जे प्रभूच्या आगमनाची वाट पाहात होते. लक्ष द्या, माझे लोक बलिदानाच्या वेदीखाली नव्हते. परंतु ते शहीद होते जे वेदीखाली होते. समजले? माझे लोक शहीदांच्या वेदीखाली नव्हते.

433 आता माझी इच्छा आहे की तुम्ही फार लक्षपूर्वक ऐकावे. आणि मी प्रामाणिकपणे हे दहा मिनिटात, दहा वाजेपर्यंत समाप्त करीन जर मला सोडावे लागले आणि उद्या समाप्त करावे लागले तरी.

434 पाहा ते माझे नव्हते...जे मला प्रभूने दाखविले ती वधू होती, ती शहीदाच्या खंडाच्या खाली नव्हती, शहीदांच्या बलिदानाच्या वेदीखाली नव्हती. परंतु त्यांना जीवंत वचनाची क्षमा करणारी कृपा ग्रहण केल्याने शुभ्र झगे मिळाले होते. ख्रिस्ताने त्यांना शुभ्र झगा दिला होता. मला वाटत नाही की खोलण्याद्वारे...

435 अथवा किंबहुना हा पाचवा शिक्का उघडण्याद्वारे मला वाटते, म्हणून मी विश्वास करितो, की तो आमच्यासाठी उघडला आहे. मी हे सद्भावनेने, देवासमोर स्पष्ट प्रकटीकरणाने केले आहे. मी असे कधीही केले नाही. की असा विचार करण्याचा प्रयत्न करु, कारण मी नेहमीच संघटनांच्या विरुध्द होतो. हे कधीच त्यांच्यासाठी नव्हते. परंतु आता ते मजसाठी उघडले आहे.

436 आणि मी आणखी दुसऱ्या गोष्टीचा विचार करतो. ह्या दिवसात हा पाचवा शिक्का उघडण्याद्वारे येथे एका शिकवणीत सुधारणा झाली आहे, की मी कदाचित झोपी गेलेल्या जीवाविषयी बोलेन. आता मला वाटते की तेथे काही लोक आहेत जे झोपी गेलेल्या

जीवामध्ये विश्वास करतात, मला वाटते पाचव्या शिक्क्याचा खुलासा हे चुकीचे आहे असे सिध्द करते. ते झोपी गेलेले नाहीच. ते जीवंत आहेत. त्यांचे देह झोपी गेलेले आहेत. परंतु, त्यांचे आत्मे कबरेत नाही, पाहा, ते देवाच्या उपस्थितीमध्ये, वेदीच्या खाली आहेत.

437 येथेच मी एक बहुमुल्य भाऊ, एक शिक्षक ह्याच्याशी असहमत आहे. आणि, मी पाहिले, मला माहीत आहे. त्याचे ही लोक येथे बसलेले आहेत. मला माहीत आहे की तो एक मोठा शिक्षक आहे. तो डॉक्टर आहे. आणि एक––एक दैवीज्ञानाचा डॉक्टर, आणि एक पीएच., एलएल. डी. आणि तो––तो खरोखरीच एक चांगला मनुष्य आहे. मला वाटते तो ह्या समयी जग सोडून गेला आहे. परंतु तो एक चांगला मनुष्य आणि चांगला लेखक होता. आणि तो भाऊ उरीया स्मिथ, *दानीएल आणि प्रकटीकरण* ह्या पुस्तकाचा लेखक आहे. आता, तुम्ही लोकहो जे त्याच्या शिकवणीचे अनुयायी आहात, पाहा, आता मी…हे उद्दामपणे बोलू इच्छित नाही, परंतु मला फक्त…समजले?

438 परंतु, भाऊ स्मिथ, सहमती देण्याचा प्रयत्न करीत होते, पाहा आणि ते झोपी गेलेले जीव ह्यास समर्थन करीत होते, तेथे त्याने, "झोपी गेलेले जीव. असा उल्लेख केला आहे आणि तेथे स्वर्गात बलिदानाची वेदी नाही. तो फक्त स्वर्गातील एकाच वेदीखाली बोलला आहे," ज्यावर तो––तो विश्वास ठेवतो ती म्हणजे, "धूपाची वेदी." परंतु तुम्हा प्रिय लोकांना…आणि मी माझ्या भावाबरोबर असहमत नाही. मी…आशा करितो की पलिकडे त्याला मी भेटेन, पाहा. मी त्या महान शिक्षकाशी असहमत नाही.

439 परंतु फक्त तुम्हाला दाखविण्यासाठी हे कसे चुकीचे आहे. पाहा. हे ते चुकीचे साबीत करते. ह्या अंतिम दिवसात, ह्या शिक्क्याचे उघडणे झोपी गेलेले जीव ह्यातील तश्याचे स्पष्टीकरण करते. समजले? ते प्राण मृत नाही. समजले? लक्ष द्या.

440 आता ह्याकडे लक्ष द्या. आता, जर स्वर्गात बलिदानाची कोणतीही वेदी नाही. तर पापासाठी बलिदान केलेला कोकरा कुठे बसला आहे? तेथे एक स्थान असले पाहिजे जेथे तो वधलेला, रक्तबंबाळ कोकरा तेथे बसला आहे, जेथे रक्त आहे…

441 आता, धूप व सुगंधी पदार्थ होता, ज्यात ते जाळत असत, ज्याविषयी बायबल सांगते की त्या "पवित्र संताच्या प्रार्थना" आहेत. जर तेथे बलिदानाची वेदी नसेल, तर प्रार्थना स्विकारल्या जाऊ शकत नाही. बलिदानाच्या वेदीवरील रक्ताद्वारेच फक्त प्रार्थना देवाकडे पोहचू शकतात.

442 पाहा, भाऊ स्मिथ चुकीचे होते. मी त्याच्याशी असहमत नाही; मला वाटते मी मला स्वतःला बंधूप्रीती आणि त्याच्या महान कार्याबद्दल आदराने स्पष्ट करीत आहे. पाहा. परंतु तो चुकीचा होता.

443 पाचव्या शिक्क्याने आणखी काही गोष्टींचा खुलासा केला आहे. जर तुम्ही त्या समजू शकता. समजले? मी माझ्यासाठी प्रश्नांची वाट पाहत आहे जर मी…ठीक आहे.

444 आता कराराचा कोश वधलेला जखमी रक्तबंबाळ कोकरा प्रायश्चित म्हणून, ह्या सुवासिक प्रार्थनांसाठी कोठे होता?

445 लक्ष द्या, बायबल म्हणते, "जर हे पृथ्वीवरील मंडपरुपी गृह मोडून टाकण्यात आले, तर आम्हासाठी सिध्द करुन ठेवलेले गृह वाट पाहत आहे." तेथेच जेथे मी त्या संतांना पाहीले. समजले?

446 लक्ष द्या जेव्हा एक बाळ…बहीणींनो, ही गोष्ट तरुण युवतींसमोर स्पष्टरितीने सांगण्याबद्दल मला पुन्हा एकदा क्षमा करा. परंतु, पाहा. जेव्हा एक माता गर्भ धारण करते

तेव्हा मांसपेशींचा एक पिंड हलतो आणि उड्या मारतो, आणि तुम्हाला माहीत आहे हा एक स्वाभाविक देह आहे. आणि जसा निसर्ग एक नैसर्गिक शरीर बनवतो…

447 बाळाला जन्म देण्याआधी तुम्ही कधी तुमच्या पत्नीला पाहीले आहे काय? ती नेहमी, त्या अंतिम काळात, खूप दयाळू, मधूर बनते. जर ती तिच्या संपूर्ण जीवनात तशी नसेल, तर ती जेव्हा तशी बनते. काय तुम्ही कधी मातेकडे लक्ष दिले आहे की त्या वेळी तिच्या किती पवित्र किंवा तशा प्रकारच्या भावना असतात?

448 आणि तुम्ही बाहेर कोणा पाप्याला, एका आईचा जे एक—एक गर्भवती आहे तिची मस्करी करताना पाहता. मला वाटते ते हास्यास्पद आहे. ते जीवन जगात येत आहे.

449 परंतु काय तुम्ही लक्ष दिले काय, त्या मातेच्या सभोवती एक मधूर भावना दिसत असते? ते काय आहे? तो एक सुक्ष्म आत्मिक देह आहे, हे एक सुक्ष्म आत्मिक जीवन आहे जो त्या छोट्या देहात, जसा तो जन्माला येतो, येण्याची वाट पाहत असतो. आता तो फक्त एकटाच आहे, परंतु, जेव्हा तो जन्माला येतो; आत्मिक देह नैसर्गिक देहाशी एकत्र मिळतो.

450 आणि, मग बायबल शिकवते की आपण आता परमेश्वरापासून जन्म पावलेले आहोत. आपण पवित्र आत्म्यापासून जन्म पावलेले आहोत, आपल्यामध्ये ख्रिस्त, देवाचा पुत्र आमच्यामध्ये बनवला आहे. आणि जेव्हा हे पृथ्वीवरील शरीर नष्ट होते, हे आत्मिक शरीर पृथ्वीच्या अंर्तभागातून येते, ते ग्रहण करण्यासाठी एक आणखी देह प्रतिक्षा करीत असतो. "जर हे पृथ्वीवरील मंडप टाकले जाते. तेथे एक दुसरे शरीर ते ग्रहण करण्यासाठी असते." हे मर्त्य शरीर अमरत्व परिधान करते. जे पृथ्वीवरील ते गौरवी शरीर धारण करते. काय हे तुम्हाला समजते–मला काय म्हणायचे आहे? तेथे एक नैसर्गिक शरीर आहे. जे पापमय आहे; परंतु ते निर्माण करताना तसेच, एक दूसरे शरीर आहे ज्यात आपण जातो.

451 आणि मी परमेश्वराचा खूप आभारी आहे की मी तुमचा पाळक आणि भाऊ म्हणून, मी त्या लोकांना पाहिले आहे; माझी त्या देहात खूप मदत केली आणि मी त्यांना माझ्या हातांनी स्पर्श केला. ते खरे आहे. लक्ष द्या.

452 लक्ष द्या. मोशे, अलीशाकडे पाहा. मोशे मृत्यू पावला होता, आणि अलीशाला स्वर्गात उचलण्यात आले होते, तो येथे रुपांतराच्या डोंगरावर त्याच्या बोलण्याच्या, ऐकण्याच्या, समजण्याच्या संवेदनासह उभा होता, आणि वधस्तंभावर जाण्याआधी येशूशी बोलला. आता, त्याचा देह कोणत्या प्रकारचा होता?

453 शमूवेलाकडे पाहा, मेल्यानंतर दोन वर्षांनी सुमारे त्या रात्री त्या गुहेत इंदोरच्या भूतविद्याप्रविण स्त्रीद्वारे, परत बोलावला गेला आणि तो शौलाशी भाषेत बोलला शौलाच्या गोष्टी ऐकल्या, प्रतिउत्तर दिले, आणि त्या गोष्टी जाणल्या ज्या होणार होत्या. अजूनही, त्याचा आत्मा बदलला नव्हता. तो एक संदेष्टा होता.

454 जेव्हा एलीयाचा आत्मा मनुष्यावर येतो, तो एलीयासारखाच चालवील. तो रानात जाईल. तो जंगलावर प्रेम करील. तो अनैतिक स्त्रीयांचा द्वेष करील. तो संस्थांच्या विरुध्द असेल. तो कोणालाही दुखवित नाही आणि…तोच त्याचा आत्मा असेल. प्रत्येकवेळी जेव्हा तो आला तो असाच होता.

मोशे तोच व्यक्ती असेल.

आता, आणि प्रकटीकरण 22:8 मध्ये आपल्याला तीच गोष्ट सापडते.

455 आता, हा त्यांचा निर्णय लावण्यासाठी–ह्या शिक्क्याच्या फोडण्याद्वारे हे कळते…ते आत्मे (आता येथे लक्ष द्या.) वेदीखाली आहेत, जे ख्रिस्ताचा मृत्यू आणि मंडळी उचलली

जाण्यापूर्वीच्या समर्पीत आईकमन समुहाद्वारे वधले गेले होते, आणि ते सर्व, खरे यहुदी आहेत ज्यांची नावे त्या पुस्तकात लिहीलेली आहेत. माझ्या बंधू, जर तु वचनानुसार पाहिले, तर तुम्हाला कळेल की ते बोलू शकतात, उंच स्वरात किंचाळू शकतात, ऐकू शकतात, आणि त्या सर्वांना पाच ज्ञानेंद्रीय होती. ते कबरेत झोपी गेलेले नाही. परंतु बेशुध्द आहेत. ते व्यवस्थित शुध्दीवर होते आणि बोलू, ऐकू आणि इतर सर्वगोष्टी करु शकत होते. काय हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] ओह, परमेश्वर आमचे सहाय्य करो!

456 फक्त दोन मिनिटे. आमेन. मला क्षमा करा की मी तुम्हाला अर्धा तास थांबवले नाही, असे सांगू शकत नाही, मला असे सांगावयास नको होते, पाहा, समजले? ते बरोबर आहे, समजले.

457 परंतु; पाहा, हे ते आहे जे माझ्या समजूतीप्रमाणे सर्वोत्कृष्ट आहे, सर्वोत्कृष्ट. आणि ते त्या प्रकटीकरणानुसार आहे जे मला ह्या सकाळी, दिवस उजाडण्याआधी प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे देण्यात आले. हा पाचवा शिक्का उघडला आहे आणि हे इतर चार शिक्क्याबरोबर पूर्णतः जुळत आहे. त्याच्या कृपेद्वारे त्याने ते मला दिले, त्याची कृपा तुमच्या आणि माझ्यावर झाली. आपण त्यासाठी त्याचा धन्यवाद करुया. आणि त्याच्या सहाय्याने...मी त्यानुसार जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करतो, इतरांना त्याच गोष्टी शिकवितो, जोपर्यंत मी त्याला गौरवात भेटत नाही, जेव्हा सर्व गोष्टी समाप्त होतील. मी त्यावर ह्यासाठी प्रेम करतो. आणि हे मला मिळालेल्या सर्वोत्कृष्ट प्रकटीकरणाप्रमाणे आहे.

458 आणि मी खरोखरीच, माझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास करितो की पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या शिक्क्याचे खरे प्रकटीकरण आता आपल्यासाठी उघडले आहे.

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करितो
कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले.

[भाऊ ब्रॅन्हम हळूवारपणे कोणाशी बोलतात—सम्पा.]

कलवरीच्या झाडावर

[भाऊ ब्रॅन्हम गुणगुणण्यास सुरुवात करतात *मी त्याच्यावर प्रेम करितो*.—सम्पा.]

459 आता, शांतपणे, आदराने, परमेश्वरासमोर या! जसे आपण पाहिले की हा शिक्का आपल्यासाठी उघडला आहे, परमेश्वराला त्याच्या स्वतःच्या प्रिय लेकरांना घ्यावे लागले; आणि त्यांचे डोळे आंधळे केले; आणि त्यांना पाठवले, कारण त्याचा स्वतःचा न्याय—न्याय पापांच्या न्यायाची मागणी करतो. एक कायदा दंडाशिवाय कायदा नसतो. आणि तो त्याचे स्वतःचे नियम डावलू शकत नाही, आणि नियमांचे उल्लंघन करुन तरीही तो परमेश्वर राहू शकत नाही.

460 ह्याच कारणासाठी परमेश्वराला मनुष्य बनावे लागले. तो कोणता पर्याय घेऊ शकत नव्हता...ते त्याच्यासाठी कोणी साधारण पुत्र किंवा दुसरे कोणी घेऊ शकत नव्हता; देव दोघेही झाला, येशू पूत्र आणि देव दोन्ही बनला, तो एकच मार्ग होता ज्याद्वारे तो हे न्यायाने करु शकत होता. परमेशवराला स्वतःवर दंड घ्यावा लागला. त्याने हा दंड दुसऱ्या कोणावर, दुसऱ्या मनुष्यावर टाकावा हे योग्य झाले नसते. म्हणून येशू हाच व्यक्ती परमेश्वर होता, जो देहात प्रगट झाला, इम्मानुएल म्हटला गेला.

461 आणि ते करण्यासाठी आणि त्याच्या वधूला घेण्यासाठी आणि हरवलेला इतर परराष्ट्रीय समुहासाठी वाचविण्यासाठी, त्याला त्याच्या स्वतःच्या लेकरांना आंधळे करावे

लागले. आणि मग त्याने त्यांना देहात त्याला नाकारल्याबद्दल दंड दिला. परंतु त्याच्या कृपेने त्यांना झगे दिले. परंतु, पाहा जीवनाचे काय झाले.

462 आणि जर त्याला हे, आम्हाला संधी द्यावी म्हणून करावे लागले, तर आपण प्रेमाने दिलेल्या ह्या संधीला कसे झिडकारु शकतो? जर ह्या भवनात आज रात्री, असे व्यक्ती, तरुण किंवा वृध्द आहेत, ज्यांनी ती संधी झिडकारली, आहे ज्यासाठी देवाने किंमत मोजली आहे, आणि आज रात्री, तुम्हाला ती संधी स्विकारायला आवडेल. जी तुम्हाला एक शहीद म्हणून मिळणार नाही, जे आपल्याला आजपर्यंत कळले आहे, परंतु शुभ्र झगा तुम्हाला देण्यात आला आहे. आणि आता जर परमेश्‍वर तुमच्या ह्रदयात ठोठावीत आहे, तर का त्याचा स्विकार करु नये, [भाऊ ब्रॅन्हम मंचावर तीन वेळा ठोठावतात—सम्पा.]

आता आपण आपली मस्तके पुन्हा एकदा झुकवूया.

463 जर तो व्यक्ती किंवा, ते लोक येथे आहेत, ज्यांची इच्छा आहे किंवा ते सांडलेले–रक्त जे परमेश्‍वराला तुमच्यासाठी सांडावे लागले. कोणत्याही मर्त्य मनुष्याहून अधिक यातना सहन केल्या, त्यावरील विश्वासाच्या आधारावर त्याला स्विकारु इच्छित आहे. असा कोणीही मर्त्य मनुष्य असू शकणार नाही जो अशा यातना सहन करु शकतो. इथपर्यंत की त्याच्या स्वतःच्या पीडेने त्याच्या नसांमध्ये त्याचे पाणी त्याच्या रक्तापासून वेगळे केले. तो कलवरीवर जाण्याआधी, रक्ताचे थेंब त्याच्या शरीरातून येत होते, अशा पीडेने आणि फुटलेल्या अंतःकरणाने त्याला काय करावे लागले. परंतु त्याला ते नाकारणेसुध्दा शक्य होते. परंतु ते त्याने स्वच्छेने तुमच्या आणि माझ्यासाठी केले. काय तुम्ही असे अतुलनीय प्रेम नाकारु शकता?

464 आणि आता ह्या शिक्क्यांच्या घडण्याद्वारे तुम्ही पाहिले आहे; की तुम्ही काय केले आहे, आणि देवाने तुमच्यासाठी काय केले आहे. आणि काय तुम्ही आपले जीवन परमेश्‍वराला समर्पित करण्यासाठी तयार आहात, आणि जर तो तुम्हाला ख्रिस्तविरोधाच्या हातांतून सोडवील ज्यात तुम्ही आता आहात? काय तुम्ही त्याचा प्रस्ताव स्विकाराल, तुमचे हात वर उंचावून व म्हणले, "देवा, ह्याद्वारे मी दर्शवितो. मी तो कृपेचा प्रस्ताव स्विकारतो."

465 "आणि, भाऊ ब्रॅन्हम, मी तुमच्या प्रार्थनांची अभिलाषा करितो, की मी सदैव विश्वासू बनून राहावे."

466 तुमचे हात वर करा, आणि मी प्रार्थना करीन. परमेश्‍वर तुम्हास आशीर्वादीत करो, परमेश्‍वर तुम्हास आशीर्वाद देवो. आता तुम्ही त्याचा स्विकार करा. जोपर्यंत तुम्ही त्याचा स्विकार ह्रदयापासून करीत नाही, तर तुम्ही ते करु नका. आणि जेथे तुम्ही बसलेले आहात, तेथेच त्याचा स्विकार करा, कारण लक्षात ठेवा, तुम्ही तुमचे हात तोपर्यंत वर उचलू शकत नाही, जोपर्यंत कोणी तुम्हाला तसे करण्यास सांगितले नसेल. आणि दुसरे कोणीही ते करु शकत नाही. परंतु परमेश्‍वरानेच तसे केले आहे.

467 म्हणून, आता, जेव्हा तुम्ही वचनाला इतक्या पूर्णतेने उघडताना पाहत आहात! तुम्ही पाहा की मागील काही वीस–तीस वर्षांपासून तसेच सर्व युगाच्या समयात काय घडत आहे. तुम्ही ते पूर्णपणे सिध्द झालेले पाहता. तुम्ही पाहता की वचन बिलकुल काय घडले ते आणि काय घडणार आहे. ते सांगते. तर मग ख्रिस्ताच्या कार्यावरील विश्वासाच्या आधारावर, जेथे तुम्ही आता बसलेले आहात आणि तुमचे हात वर केलेले आहेत, म्हणा, "ह्या मिनिटापासून हा निर्णय घेतला आहे. मी आता ख्रिस्ताला माझा तारणारा म्हणून घेतो. आणि मी माझ्या उर्वरित जीवनात, त्याच्यासाठी जगेन. आणि माझी इच्छा आहे

की परमेश्वराने मला त्याच्या पवित्र आत्म्याने भरावे.” आणि जर तुम्ही येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतलेला नाही, तर तलाव तुमची प्रतिक्षा करीत असेल.

आपण प्रार्थना करुया.

468 प्रभू परमेश्वरा, लोकांमध्ये अनेक हात वर आले आहेत. मला खात्री आहे की तू तो प्रभू येशू आहे ज्याने पुष्कळ वर्षांअगोदर आमच्यासाठी प्रायश्चित केले आणि ह्या शिक्क्यांचे प्रकटीकरण आणि त्या महान घटना ज्या मागील काही वर्षात येथे घडल्या आहेत, हे पाहून, मी माझ्या संपूर्ण अंतःकरणाने विश्वास करतो की दयेचे द्वार बंद होण्यास सुरुवात झाली आहे, आणि तू तुझ्या लोकांना सोडवण्यासाठी तुझ्या प्रवासासाठी सिध्द आहेस. जेव्हा ते स्थान आणि दरवाजा उघडलेला आहे, जसे ते नोहाच्या दिवसात होते, हे मौल्यवान जीव जे ह्या मंडपगृही शरीरात राहत आहे जे कोणत्याही दिवशी मोडले जाणार आहेत, ज्यांनी आतून काही झाल्यामुळे, हे मर्त्य हात उचलले आहेत, कारण त्यांना—त्यांना खात्री आहे आणि त्यांची कबूली आहे की ते विश्वास करतात आणि ते तुझे त्यांना तारणासाठी केलेले विधान स्विकारु इच्छितात, हे बंद शिक्क्याचे पुस्तक उघडल्यावर जे आमच्यासाठी उघडले आहे. प्रभो, त्यांना आजरात्री, येशू ख्रिस्ताच्या नीतीमत्त्वाचा झगा दे, आणि त्यांच्या जीवांना ते वस्त्र घाल, ह्यासाठी की ते त्या दिवशी, तुझ्या समोर ख्रिस्ताच्या रक्याद्वारे, परिपूर्ण उभे राहू शकतील, जो अगदी जवळ आहे.

469 प्रभू परमेश्वरा, जर त्यांनी येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतला नसेल आणि तू ह्याविषयी मला दिलेल्या प्रकटीकरणावर आणि हे पाहून की पौलाने प्रेषितांची कृत्ये 19 अध्यायमध्ये, त्या लोकांना ज्यांचा बाप्तिस्मा, बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाद्वारे झाला होता, त्यांना पवित्र आत्मा मिळण्यासाठी येशू ख्रिस्ताच्या नावाने पुन्हा बाप्तिस्मा देण्याची आज्ञा केली होती. जो मागतो की प्रभू तुझे सत्य त्यांना समजव आणि त्यांनी तुझी आज्ञा पाळावी.

470 आणि तेव्हा त्यांच्या आज्ञापालनाच्या स्विकारण्याद्वारे, आणि त्यांच्या कबुलीच्या आज्ञापालनाद्वारे, आणि पाण्यात येशूच्या नावाने बाप्तिस्मा घेण्याद्वारे, बदल्यात त्यांना त्यांच्या उर्वरित जीवनात, सामर्थ्य, सेवकाईसाठी पवित्र आत्म्याने भर. मी त्यांना तुला परमेश्वराचा अर्पिलेला कोकरा, येशू ख्रिस्ताच्या नावात समर्पित करतो. आमेन. आमेन.

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो,
कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले.
आणि माझे तारण विकत घेतले.
त्या कलवरी झाडावर.

471 आता, तुम्ही ज्यांनी आपले हात वर केले आहेत. आत्म्याच्या आज्ञांचे पालन करा, ते एक प्रायश्चित केलेल्या पाप्यासाठी वचनाची घटनेचे अनुकरण करील. प्रत्येक कृतीत त्याचे अनुकरण करा. आणि स्वर्गीचा परमेश्वर तुमच्या त्याच्यासाठी घेतलेल्या निर्णयासाठी तुम्हाला प्रतिफळ देवो. प्रभो तुम्हास आशीर्वाद देवो.

472 उद्या रात्री, तुम्ही तुमची पेन्सिल आणि पेपर आणा, जशा आज आणल्या होत्या. परमेश्वराच्या इच्छेने आपण येथे ठीक 7.30 वाजता येण्याची आशा करतो. आणि... माझ्यासाठी प्रार्थना करा, की उद्या परमेश्वर सहावा शिक्का मला प्रगट करील, ह्यासाठी मी ते तुम्हाला ते देऊ शकेन जसे मला त्याने ते दिले आहे. तोपर्यंत आपण पुन्हा गाऊया. फक्त गीतांद्वारे नाही परंतु त्याच्या स्तुतीद्वारे की तो आमच्याऐवजी मेला आणि आम्हाला सोडवले. *मी त्याच्यावर प्रेम करतो*. “मी...”

आता येथे तुमचे पाळक आहेत.

...प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो.
कारण त्याने मजवर प्रथम प्रेम केले.

***पाचवा शिक्का*** MAR63-0322

(The Fifth Seal)

***सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र***

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रॅन्हम यांनी शुक्रवारी संध्याकाळी, 22 मार्च, 1963 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रॅन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**छपाईच्या हक्काची सूचना**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org